बंकिम साहित्य

IRBK-0105645

IRBK-0105645

...राम ★ १४

...नरार्ध)

म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय वाङ्मय
क्र. ५६४५

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

सूचना :- खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

30 APR 1975

वर्ग क्र. १६४१ मी वि. .....
वि. ला. वों. .....

नवभारत

IRBK-0105645

IRBK-0105645

: प्रकाशक :
रघुनाथ दिपाजी देसाई,
नवभारत प्रकाशन-संस्था,
६, केळेवाडी, गिरगांव, मुंबई ४.

❀

सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन.

❀

आवृत्ति पहिली,
मार्च १९५६

❀

किंमत दोन रुपये

❀

: मुद्रक :
रघुनाथ दिपाजी देसाई,
न्यू भारत प्रिंटिंग प्रेस,
६, केळेवाडी, गिरगांव, मुंबई ४.

३१३.२९८२८
वा.वा.
१८८७
३.२.६७

सी ता रा म

(उत्तरार्ध)

तृतीय खंड



तृतीय खंड

१

★ तोफेच्या आणि बंदुकीच्या 'ठो ठो' आवाजानें गंगाराम दचकला. त्याला वाटलें, "हें काय, लढाई कोण करतें आहे? डाकिनी तर नव्हे? कीं ती देवता आहे?"

गंगारामनें एका जमादाराला काय चाललें आहे तें पहाण्यासाठी पाठवलें. जमादार बाहेर पडला. त्या दिवशीं किल्ल्याचें फाटक उघडलें गेलें तें हें पहिल्यानेंच!

जमादार परत आला. तो म्हणाला, "मुसलमान लढाई करताहेत."

गंगाराम चिडून म्हणाला, "तें मला माहीत आहे. पण ते कुणाबरोबर लढाई करताहेत?"

जमादार म्हणाला, "कुणाबरोबर नव्हे."

गंगाराम हंसला आणि म्हणाला, "कुणाबरोबर नव्हे म्हणजे काय? मूर्ख आहेस! तोफ कुणाची?"

जमादार म्हणाला, "हुजूर! तोफ कुणाचीच नव्हे!"

गंगाराम आतां अधिकच चिडला. तो म्हणाला, "तोफेचा आवाज ऐकूं येतोय ना तुला?"

जमादार म्हणाला, "हो. तोफेचा आवाज ऐकूं येतोय् खरा."

गंगाराम म्हणाला, " तर मग ? ही तोफ कोण डागतोय् ? "
जमादार म्हणाला " तें कांहीं दिसलं नाही मला. "
गंगाराम म्हणाला, " डोळे कुठं ठेवले होतेस ? "
जमादार म्हणाला, " नाहीं—डोळे बरोबरच होते. "
गंगाराम म्हणाला, " मग तोफ कशी दिसली नाहीं तुला ? "
जमादार म्हणाला, " तोफ दिसली—घाटावरची आहे ती. "
गंगाराम म्हणाला, " होय ना ? मग आवाज कोण काढतो ? "
जमादार म्हणाला, " झाडाच्या फांद्या. "

गंगाराम म्हणाला, " वेड लागलंय् कीं काय तुला? झाडाच्या फांद्या काय तोफा डागतात ? "

जमादार म्हणाला, " तिथं कोणच माणूस दिसला नाहीं. तोफेच्या आजूबाजूला नुसत्या झाडांच्या फांद्या पडलेल्या आहेत तेवढ्याच मला दिसल्या. "

गंगाराम म्हणाला, " तर मग कुणीतरी झाडांच्या फांद्यांच्या आडून तोफ डागतोय् का ? तसं असलं तर तो माणूस मोठा बुद्धिमान् खरा. झाडाच्या आडून मारा करीत असेल तर तो शत्रूच्या शिपायांना दिसायचा नाहीं. पण तूं काय केलंस ? तो कोण आहे, तें तूं जाऊन कां पाहिलं नाहींस ? "

जमादार म्हणाला, " तिथं जाणं शक्य आहे का ? पावसाच्या सरीसारख्या गोळ्या झडताहेत तिथं. "

गंगाराम म्हणाला, " गोळीबाराला जर एवढा भितोस, तर फौजेंत नोकरी करायला आलास कशाला ? "

गंगारामनें आपल्या नोकराला बोलावलें आणि त्या जमादाराची पगडी आणि पोशाख काढून घेण्याचा हुकूम सोडला. लढाई होणें संभवनीय आहे असें पाहून मृण्मयनें कांहीं वेंचक हिंदुस्थानी माणसांना निवडलें होतें आणि त्यांच्यावर किल्ल्याच्या राखणीचें काम सोंपवलें होतें. त्या माणसांपकीं चौघांना बोलावून गंगारामनें हुकूम दिला, " घाटावर जिथं तोफ आहे तिथं जा अन् तोफ डागतोय त्याला पकडून घेऊन या. "

हे चौघे शिपाई त्या तोफेच्या तोंडापाशीं आले तेव्हां लढाई खतम झाली होती. गोळीबारांतून बचावलेले कांहीं मुसलमान शिपाई पळत सुटले होते. ते चौघे

शिपाई तोफेशेजारीं पडलेल्या झाडांच्या फांद्यांतून आंत गेले. तिथें एक माणूस मरून पडलेला त्यांना आढळला. दुसरा जिवंत होता, तो पलिता हातांत घेऊन बसून राहिला होता. तो माणूस चांगलाच जवान होता. तो धोतर नेसून कांचा मारून उभा होता. त्यानें डोक्यावरून हनुवटीपर्यंत एक गळपट्टा बांधला होता. त्याच्या सर्वांगावर बाराची दारू आणि धूळ उडालेली होती.

ते चौघेजण एकदम पुढें सरसावले आणि त्यांनीं त्याला पकडलें. एकानें त्याला विचारलें, "तुम कौन हो रे?"

तो म्हणाला, "कां रे बाबांनों?"

"तूं इथं बसून काय म्हणून ही तोफ डागतोयस?"

"कां रे बाबा, त्यांत काय चुकलं माझं? तुम्ही सामील झालां आहांत का मुसलमानांना?

"अरे मुसलमान आले असते तर आम्ही त्यांना एकदम हुसकून बाहेर काढलं असतं. आधीं तूं कुणाच्या बाजूनं लढतो आहेस तें सांग. चल! हुजूरच्या समोर हजर हो."

"कुठल्या हुजूरच्यासमोर?"

"कोतवाल साहेबांचा हुकूम आहे, आतांच्या आतां तुला हजर झालं पाहिजे त्यांच्यासमोर?"

"ठीक आहे. मी येतों—पण आधीं हे समोरचे लोक निघून जाऊं देत. जोपर्यंत त्यांच्यापैकीं एक तरी माणूस पैलतीरीं दिसतो आहे, तोपर्यंत तुम्ही काय कीं तुमचा कोतवाल काय, कुणीही आलं तरी मीं इथून हलणार नाहीं. तोपर्यंत आधीं हा माणूस इथं मरून पडलाय तो कोण आहे तें पहा. तुमच्या ओळखीचा आहे का तो?"

शिपायांनीं त्याला पाहून घेतलें आणि म्हटलें! "हो. आम्ही याला ओळखतों. हा तर आमचा गोलंदाज प्यारेलाल आहे. हा इथं कुठून आला?"

"तर मग आधीं याला घेऊन किल्ल्यांत जा. मीं येतों तितक्यांत."

शिपाई आपसांत बोलूं लागले. त्यांनीं सर्वानुमतें ठरवलें, "हा माणूस तर चांगला शहाण्यासारखा बोलतोय. आम्हांला काय हुकूम आहे? जो तोफेच्या पाशीं असेल त्याला घेऊन या असा हुकूम आहे ना आम्हांला? तोफेच्यापाशीं आहे हा मुडदा—अलबत यालाच घेऊन गेलं पाहिजे."

पण तें प्रेत होतें. हिंदु शिपाई प्रेताला शिवणार कसे ? पुन्हां सर्वांनीं आपसांत खलबत केलें आणि ठरवलं, कीं डोमाला बोलवायचें. एकजण डोमाला बोलवायला गेला आणि बाकीचे तिघे वाट पहात तिथेंच बसून राहिले.

इकडे तो धूळ आणि गोळीबारानें काळकुट्ट झालेला पुरुष टेहळून पहात होता. सारे मुसलमाग शिपाई पैलतीराला पळून गेले होते. तो त्या शिपायांना म्हणाला, " चला बाबांनो. तुमच्या कोतवाल साहेबांना एकदां सलाम करायला येतों चला."

शिपाई त्या माणसाला पकडून घेऊन निघाले.

किल्ल्याच्या राखणदार शिपायांच्या आसपास घाबरलेले नागरीक वारुळांतून बाहेर येणाऱ्या मुंग्यांसारखे येऊन गोळा झाले होते. तिथेंच दुर्गरक्षक होता. शिपाई त्या माणसाला घेऊन आले आणि त्यांनीं त्याला दुर्गरक्षकाच्या समोर आणून उभें केलें.

त्यावेळीं जमलेल्या साऱ्या लोकांच्या मुखांतून निघणाऱ्या जयध्वनीनें आकाश दणाणून गेलें. सारे सैनिक आणि नागरीक हजारों हजार कंठांनीं एकाच स्वरांत ओरडले, " जय महाराजकी जय ! "

" जय महाराजाधिराजकी जय ! "

" जय श्री सीतारामराय राजाबहादुरकी जय ! "

चंद्रचूड धांवतच आले आणि त्यांनीं त्या धुळीनें माखलेल्या महापुरुषाला कडकडून मिठी मारली. त्या माणसानें चंद्रचूडांची पायधूळ घेऊन त्यांना प्रणाम केला.

चंद्रचूड म्हणाले, " ही एकहाती लढाई मी पाहिली त्याचवेळीं समजलों, कीं तूं आला आहेस. या मनुष्यलोकांत इतकं अचूक गोळीबार करण्याचं कौशल्य दुसऱ्या कुणाच्या ठायीं नाहीं. सध्यां सर्व कांहीं राहूं दे—आधीं या गंगारामला पकडून बांधून आणायचा हुकूम सोड. "

सीतारामला पहातांच गंगाराम हळूच काढता पाय घेऊन पळायच्या विचारांत होता, पण तितक्यांत जल्दी करून शिपायांनी त्याला पकडलें आणि सीतारामच्या हुकमानें कोठडींत बंद करून ठेवलें.

सीतारामनें शिपायांना बोलावून घेऊन किल्ल्याच्या मारगिऱ्यांजवळ असलेल्या एकेक तोफेबरोबर एकेकाला राहण्याचा हुकूम दिला. बाकीच्या कांहींना जरूर

त्या ठिकाणीं पहाऱ्यासाठीं ठेवून मृण्मयची खबर काढण्यासाठीं त्यानें कांहीं शिपाई पाठवले.

स्नानसंध्या उरकल्यावर सीताराम चंद्रचूड ठाकुरांपाशीं आला आणि एकांतांत त्यांचीं खलबतें सुरू झालीं.

चंद्रचूड म्हणाले, " महाराज, तुम्ही केव्हां आलांत तें आम्हांला कांहींच कळलं नाहीं. असे एकटेच कां आलांत ? तुमच्या बरोबरचीं माणसं कुठं आहेत ? वाटेंत कांहीं तसाच विशेष प्रसंग तर घडला नाहीं ? "

सीताराम म्हणाला, " बरोबरच्या लोकांना वाटेंत ठेवून मी एकटाच पुढं आलों. माझ्या गेरहजेरींत नगरीची व्यवस्था कशा रीतीनं ठेवली जाते, तें पहाण्यासाठी वेषांतर करून मीं गेल्या रात्रीं नगरांत आलों होतों. पहातों तों नगर पूर्णपणें रक्षणरहित होतं. तसं कां होतं तें आतां मला थोडं थोडं कळलं. किल्ल्यांत प्रवेश करायला गेलों तेव्हां फाटक बंद होतं. आंत जातां येत नाहीं असं पाहिलं त्यावेळीं पहाट झाली होती म्हणून नदीकांठीं गेलों. तिथं पाहिलं तों मुसलमानांची फौज नदी ओलांडीत होती. किल्याचे राखणदार कसलाच प्रतिकार करीत नाहींत असं जेव्हां मला दिसून आलं, तेव्हां मीही मला करतां येण्याजोगं होतं तें केलं. "

चन्द्रचूड म्हणाले, " मला वाटलंच तें—जें कांही तुम्ही केलं तें तुमच्या-खेरीज दुसऱ्या कुणालाच साधलं नसतं. पण एवढा दारुगोळा तुम्हाला मिळाला कुठून ? "

सीताराम म्हणाला, " ती मदत केली एका देवीनं. तो दारूगोळा आणि एक गोलंदाज आणून दिला तिनं. "

चन्द्रचूड म्हणाले, " देवी ? मला देखील तिनं दर्शन दिलं होतं. ती या नगरीची राजलक्ष्मी होती खास ! आतां कुठं गेली ती ? "

" मला दारूगोळा आणि गोलंदाज देऊन ती अंतर्धान पावली. " सीताराम म्हणाला, " आतां या कांहीं महिन्यांतली खबर मला सांगा. "

चन्द्रचूडांनीं त्यावेळीं त्यांना माहीत असलेली सर्व हकिकत सीतारामला निवेदन केली. शेवटीं त्यांनीं विचारलें, " आतां ज्या कामासाठीं तुम्ही दिल्लीला गेलां होतां, त्याचं काय झालं तें सांगा—"

सीताराम म्हणाला, "तें काम बिनबोभाट झालं. बादशहाला मी एका कामीं उपयोगी पडलों होतों त्यामुळं संतुष्ट होऊन त्यानं बारा जमीदारांचं आधिपत्य मला देऊन महाराजाधिराज अशी पदवी दिली अन् तशी सनदही दिली. दुर्दैवाची गोष्ट ही, कीं याचवेळीं फौजदाराशीं वैर निर्माण झालंय्. फौजदार आहे सुभेदाराच्या हुकमतींत, अन् सुभेदार आहे बादशहाच्या हुकमतींत. अर्थात् फौजदाराशीं विरोध म्हणजे बादशहाशींच विरोध. बादशहानं माझा जो एवढा मानसन्मान केला त्याच्याविरुद्ध शस्त्र उचलणं म्हणजे एकजात कृतघ्नपणा! स्वसंरक्षण करण्याचा अधिकार प्रत्येकाला आहे, पण स्वसंरक्षणाखेरीज इतर कोणत्याही कारणानं फौजदाराशीं लढाई करणं योग्य व्हायचं नाहीं. म्हणून मला वाटतं कीं हा विरोध निर्माण झाला तें माझं दुर्दैव होय!"

"माझ्या दृष्टींनं हें सुदैवच होय!" चंद्रचूड म्हणाले. "साऱ्या हिंदूंचं सुदैव! कारण मुसलमानांची आणि तुमची दोस्ती झाली तर मुसलमानांच्या हातून हिंदूंचं रक्षण कोण करील? हिंदुधर्माला उभं राह्यला जागा कुठं मिळेल? खरोखरच हें सुदैव आहे! हिंदुधर्माचा याचेळीं जो पुनरुद्धार करील त्याच्यासारखा कर्तबगार आणि सौभाग्यशील दुसरा कुणी नाहीं."

सीताराम म्हणाला, "मृण्मयची खबर काय आहे तें कळल्यावांचून पुढले कांहींच बेत करतां यायचे नाहींत."

संध्याकाळीं मृण्मयची खबर कळली. वीरबक्षखां नांवाचा एक फौजदारी सेनापती थोडीबहुत फौज घेऊन येत होता. अर्ध्या वाटेवर मृण्मयची आणि त्याची गांठ पडली आणि दोघांत लढाई जुंपली. मृण्मयनें त्याच्या फौजेचा धुव्वा उडवून लढाईंत त्याचा जीव घेतला. विजयी मृण्मय आपली फौज घेऊन परत यायला निघाला होता—

ती बातमी कळतांच चंद्रचूड सीतारामला म्हणाले, "आतां विचार कसला करतां महाराज? विजयी सैन्य घेऊन याचवेळीं नदीपार व्हा आणि भूषणा नगरी ताब्यांत घ्या."

जयंती म्हणाली, "आतां पाहतेस काय? नवऱ्याला भेटायची वेळ हीच आहे."

श्री म्हणाली, "तेवढ्यासाठीं का मी आलें होतें ?"

जयंती म्हणाली, "साऱ्या मानवजातींत राजर्षि श्रेष्ठ ! राजाला राजर्षि कां करीत नाहींस ?"

श्री म्हणाली, "माझ्याकरवीं होईल का तें ?"

जयंती म्हणाली, "तें काम कुणाकडून होईल तर तें तुझ्याकडूनच—म्हणून म्हणतें, कीं अशीच जा आणि राजा सीतारामला प्रणाम कर."

श्री म्हणाली, "जयंती, भोपळा पाण्यांत तरतो खरा, पण त्याला जर दगड बांधला तर दगड बुडतो आणि भोपळाही बुडतो. पुन्हां बुडून मरूं का मी ?"

जयंती म्हणाली, "तेवढं कौशल्य असलं तर मरावं लागायचं नाहीं. पाणबुडे दगड बांधूनच पाण्यांत उतरतात—ते मरत तर नाहींतच पण समुद्राच्या तळांतली रत्नं घेऊन येतात."

श्री म्हणाली, "तें मला साधेल असं कांहीं वाटत नाहीं. या घटकेला तरी मीं राजाला भेटणार नाहीं. मीं कांहीं दिवस इथं राहीन. मनाचा पडताळा घेईन. अन् जर माझं मन ताब्यांत नाहीं असं मला वाटलं तर त्यांना न भेटतां देशत्याग करीन."

अर्थात् श्रीनें राजाची भेट घेतली नाहीं.

२

भूषणा नगरी जिंकली गेली. लढाईंत सीतारामाचा जय झाला. तुरबखाँ मृण्मयच्या हातीं मारला गेला. या सर्व ऐतिहासिक गोष्टी आहेत. अर्थात् त्या या कथेच्या दृष्टीनें हिशेबांत घेण्याजोग्या नाहींत. त्यांचें सविस्तर वर्णन करून वेळ कशाला घालवायचा ? कथालेखकाचें काम म्हणजे अंतर्विषय उघडे करून दाखवणें. त्यानें बातमीदाराचें काम करायचें नसतें.

भूषणा ताब्यांत आली. बादशाही सनदेच्या जोरावर आणि त्याचप्रमाणें स्वतःच्या बाहुबळावर सिताराम रायनें बंगालमधल्या बारा जमीदारांचें आधिपत्य स्थापन केलें आणि 'महाराजा' पदवी धारण करून राज्यकारभाराची सुरवात केली.

धुवून निघेल तें आधीं पाहिलं पाहिजे. आतां असं कर, जरा उठून बैस. रडायचं बंद कर अन् मन शांत ठेवून सारं कांहीं मला सांगून टाक पाहूं. मी सवत आहें हें क्षणभर विसरून जा. हा काळिमा तुझ्या तोंडाला लागो कीं न लागो, राजांची अब्रू जायचा प्रसंग आलाय. ते जसे तुझे पति, तसेच ते माझेही पति आहेत. या प्रकाराची लाज तुला अधिक वाटायची कीं मला अधिक वाटायची, हें कांहीं क्षुद्धां मनांत आणूं नको. जायच्या वेळीं महाराजांनीं अंतःपुराचा भार माझ्यावर सोंपवला होता. त्यांच्या कानीं ही गोष्ट गेली तर मी त्यांना काय उत्तर देऊं ? "

रमा म्हणाली, " मी सारं कांहीं त्यांना सांगून टाकलंय. त्यांना तें पटलंय आणि त्यांनीं मला क्षमा केलीय. माझा कांहींच दोष नाहीं या बाबतींत. "

नंदा म्हणाली, " तें कांहीं तूं सांगायला नकोस. मला तें सांगून उगीच वाईट वाटून कशाला घेतेस ? तरीपण जें कांहीं झालंय तें मला सांग किंवा सांगू नकोस—"

" कां सांगू नको ? " रमा म्हणाली, " तें सर्वांना सांगायची माझी तयारी आहे. "

रमा उठून बसली. तिनें डोळ्यांतलीं आसवें आवरलीं आणि झालेल्या साऱ्या हकीकती नंदाला सांगून टाकल्या.

नंदा म्हणाली, " अग, मला जर त्याचवेळीं हें सांगितलं असतंस, तर एवढा अनर्थ कां झाला असता ? बरं, झालं तें झालं, आतां यापुढं आपली अब्रू कशी बचावेल तें पाहिलं पाहिजे. "

रमा म्हणाली, " असं कांही केलं नाहींस, तर मींही तुला सांगून ठेवतें, मी विहिरींत उडी घेईन. नाहीतर गळ्याला फांस लावून घेईन. गरीब भिकाऱ्याची मुलगी असती तर तीसुद्धां असा अपवाद आला असता तर जीव द्यायला निघाली असती—मी तर राजाची राणी ! "

" जीव द्यायला नको ग बाई ! " नंदा म्हणाली, " पण थोडंसं धाडस करायला हवं. तें होईल का तुझ्यानं ? तसं कांहीं जर केलंस तर मग संशय घ्यायला जागा राह्यची नाहीं. "

रमा म्हणाली, " माझी अब्रू बचावण्यासाठीं वाटेल तें करीन ! काय करूं सांग ? "

सुरवातीलाच गंगारामचा खटला घ्यावा लागला. त्याच्याविरुद्ध भरपूर पुरावे होते. रमेनें आपल्या हातून घडलेल्या सर्व चुका कबूल करून सीतारामची क्षमा मागितली. बाकीच्या हकीकती मुरली आणि चांदशहा फकीर यांजकडून कळल्या. आतां फक्त गंगाररामची जबानी घेणें तेवढें राहिलें होतें—याचवेळीं या बाबतींत एक मोठा घोटाळा उत्पन्न झाला.

अंतःपुरांत रमेनें डोळ्यांत पाणी आणून साऱ्या हकिकती सीतारामला सांगून टाकल्या होत्या. सीतारामला त्या पटल्या होत्या. रमेच्या हातून जें कांहीं घडलें तें तिच्या आंधळ्या पुत्रस्नेहामुळें, हें सितारामला पटलें होतें. तरीही नागरिकांचें समाधान कसें झालें असतें ? गंगारामला कां कैद केला, याजबद्दल गावांत ठिक-ठिकाणीं चर्चा सुरू झाली होती. एकपक्षीं, मुरलेच्या ढिलेपणामुळें म्हणा, अथवा पहारेकरी पांडेठाकुरच्या बडबडीमुळें म्हणा, या प्रकरणीं लोक रमेचें नांव घेऊं लागले होते. कुणीं म्हणत होते, कीं गंगाराम हें राज्य मोंगलांना विकायला निघाला होता. कुणी म्हणाले, कीं छोट्या राणीच्या महालांत तो गिरफदार झाला होता. कुणी म्हणत होते, कीं या दोन्ही गोष्टी जशा खऱ्या होत्या तशीच छोटी राणी मोंगलांना राज्य विकण्याच्या मसलतींत सामील झाली होती.

या सर्व गोष्टी राजाच्या कानीं येत नसत, पण बायकांच्या बडबडींत या सर्व कथा, क्वचित् तिखटमीठ लावून ज्या बोलल्या जात, त्या राणीच्या कानी येऊन पोहोंचल्या. दोघीही राण्यांना या कंड्या कळल्या. त्यामुळें रमेनें बिछाना धरला. तिनें रडून रडून आकांत केला. शेवटीं गळ्याला फांस लावून अगर पाण्यांत उडी घेऊन जीव द्यायचा निश्चय तिनें केला असें नंदाला कळलें, तेव्हां तिनें आपली अक्कल चालवली

रमा उशींत डोकें खुपसून रडत पडली होती. तळ्यांत जीव देणें सोपें, कीं गळफांस घेणें सोपें, हें ठरवायचा ती प्रयत्न करीत असतां नंदा तिच्यापाशीं आली. नंदा म्हणाली, " या मेल्या बायका जें मातीमसण बोलताहेत तें कळलं वाटतं तुला ? "

रमेनें नुसती मान हालवून होकार दिला. त्यावेळीं तिला अधिकच उमाळा आला. नंदानें तिला जवळ घेऊन तिचे डोळे पुसले आणि म्हटलें, " डोळ्यांतल्या पाण्यानं कांहीं कलंक पुसला जायचा नाहीं ग बाई ! न रडतां हा कलंक कसा

नंदा म्हणाली, "आतां तूं मला ही हकीकत सांगितलीस, तशीच जर तीं कुणालाही सांगितलीस तर त्याची खात्री पटल्यावांचून राह्यची नाहीं, असं मला वाटतंय. राजधानींतल्या साऱ्या लोकांनीं तुझ्या तोंडून हकीकत ऐकली तर मग कुणी तुला नांव ठेवणार नाहीं."

रमा म्हणाली, "पण तें व्हायचं कसं?"

नंदा म्हणाली, "मी महाराजांना सांगून दरबार भरवतें आणि दवंडी पिटवून साऱ्या नागरिकांना या दरबारांत हजर व्हायला सांगतें. तिथं गंगारामच्या समोर आणि साऱ्या नगरवासी लोकांच्या समोर तूं ही सारी हकीकत सांगून टाकायची. आम्ही राजाच्या राण्या--सूर्यालासुद्धां आमचं नख दिसायचं नाही.--या नगरांतल्या साऱ्या लोकांच्या समोर मुक्तकंठानं सारं कांही सांगून टाकायचा धीर होईल का तुला? तसं केलंस तर आपल्यावरचा सारा कलंक धुवून जाईल."

त्यावेळीं रमा सिंहिणीसारखी गर्जना करून म्हणाली, "सारे नगरवासीच कां, जगांतल्या साऱ्या लोकांना बोलावून घे. त्या साऱ्या लोकांसमोर मी टाहो फोडून ही कथा सांगेन."

"सांगशील?" नंदानें विचारलें.

"सांगेन--सांगेनच सांगेन--नाहींतर मरून जाईन."

नंदा म्हणाली, "तर मग आतां मीं महाराजांकडे जातें आणि दरबार भरवायची व्यवस्था करतें. आतां हें रडणं बंद कर."

नंदा निघून गेली. रमा बिछान्यावरून उठली. तिनें आपले डोळे पुसले आणि मुलाला हृदयाशीं कवटाळून धरून ती त्याचे मुके घेऊं लागली. हा वेळपर्यंत तिनें त्या मुलाकडे पाहिलेंसुद्धां नव्हतें.

नंदानें बोलावणें पाठवून राजांना अंतःपुरांत आणून घेतलें. चोहींकडे ज्या कंड्या उठल्या होत्या, त्या तिनें राजाला सुनावून सांगितल्या. त्यानंतर रमेचें आणि तिचें जें कांहीं बोलणें झालें तेंही तिनें शब्दशः राजाला सांगून टाकलें. गळ्यांत पदर घेऊन गुडघे टेकून तिनें राजाचे दोन्ही पाय धरले. ती म्हणाली, "आम्ही दोघीही तुमच्या चरणापाशीं आलों आहोंत. यावेळीं तुम्ही आमचा मान राखा.

आमचा हा कलंक धुवून काढा. तसं कांहीं झालं नाहीं तर आम्ही दोघीही आत्महत्त्या करूं."

सीताराम फार खिन्न झाला. लागलेल्या कलंकाची त्याला जशी जाणीव झाली होती, त्याचप्रमाणें नंदानें केलेल्या प्रस्तावाचाही त्याच्या मनावर परिणाम झाला होता. तो म्हणाला, "राजाची राणी—दरबारच्या चव्हाट्यावर मीं तिला आणून कशी उभी करूं? माझ्या राणीला एकाद्या सामान्य कुलटेप्रमाणें न्यायाल्यांत कशी ओढून आणूं?"

नंदा म्हणाली, "तुमच्या मनाला हें लागेल खरं, पण आम्हांला त्याचं कांहीं वाटत नाहीं. यांतला मोठा कलंक कुठला? दरबारांत उभं रहाणं हा, कीं कुलटा म्हणवून घेणं हा?"

सीताराम म्हणाला, "राजाच्या घराण्यावर हे असे अपवाद यायचेच. सीतेच्या वेळेपासून हें चालत आलंय्. पूर्वीच्या लोकांनीं केलं तसंच करायला हवं—सीतेसारखाच रमेचाही त्याग करणं हेंच योग्य! तसं केलं कीं मग कुणालाच बोलायला जागा राहणार नाहीं."

नंदा म्हणाली, "महाराज, आपल्यावरचा कलंक धुवून टाकायची संधि न देतां निरपराध पत्नीचा त्याग करणार का तुम्ही? हाच का तुमचा राजधर्म? रामचंद्रांनीं जी चूक केली तीच चूक तुम्हीही करणार का? रामाचं रामाला शोभून गेलं—तरीही लोकांनीं रामाला नांव ठेवलंच—पण तसं करणं तुम्हांला शोभेल का महाराज?"

सीताराम म्हणाला, "ही माझी सारी प्रजा, शत्रुमित्र, सभ्यासभ्य सारे लोक यांच्या समक्ष स्वतःच्या राणीला कुलटेसारखं उभं करतांना माझं काळीज फुटून नाहीं का जाणार? मीं कांहीं दगड नव्हे!"

नंदा म्हणाली, "महाराज, पन्नास हजार लोकांच्या समक्ष श्री झाडांच्या फांदीवर उभी राहून नाचली, त्यावेळीं तुमचं काळीज दहा हात फुगलं होतं का?"

सीतारामनें रागारागानें नंदाकडे पाहिलें आणि म्हटलें, "त्यावेळीं तें जें होऊन गेलं नंदा, तें कांहीं माझ्या संमतीनं नव्हे! पण तें सुद्धां माझ्या मनाला डांचत राहिलंय."

अनुक्रम 2.9.26
विभाग वा. वा.
क्रमांक

नंदानें एक टोला दिला खरा, पण तो वर्मी लागला, असें पाहून तिनें हात जोडून सीतारामाची क्षमा मागितली.

हात जोडून पायां पडल्याचा परिणाम झाला. नंदानें जिंकली. शेवटीं सीतारामनें दरबार भरवायला संमति दिली. दरबार भरवला नाहीं तर रमेचा त्याग करणें भाग होतें आणि रमा तर निरपराध होती. या प्रकरणीं दुसरा कांहींच मार्ग नव्हता म्हणून त्यानें शेवटीं ही संमति दिली.

खिन्न मनानें राजा सीताराम चंद्रचूडांपाशीं आला आणि ठरलेला बेत त्यानें त्यांना सांगितला. अब्रू म्हणा कीं पडदानशीनपणा म्हणा, दोहोंच्याही बाबतींत त्या ब्राह्मणाची फारशी श्रद्धा नव्हती. तरीपण सर्वांच्या समाधानाच्या दृष्टीनें त्यांनीं संमति दिली. त्यांना एकच भीति वाटत होती, सर्वांच्या समोर बोलायचें रमेला धैर्य होईल कीं नाहीं.

सीतारामलाही तीच भीति वाटत होती. रमा बिचकली असती तर सर्वच दृष्टीनें बेअब्रू होणार होती. शेवटीं मनाचा निश्चय करून त्यांनीं घोषणा केली कीं उघड्या दरबारांत गंगारामचा खटला चालवला जाईल.

राजाच्या आज्ञेप्रमाणें सर्व नगरवासी लोकांनीं हजर राहाण्याचें ठरवलें. ठरलेल्या दिवशीं प्रजेंतले हजारों हजार लोक येऊन त्यांनी दरबार भरून टाकला. दिल्लीच्या अनुकरणानें सीतारामनेंही एक 'दरबार-इ-आम' प्रस्तुत केला होता. या दिवशीं सर्व अधिकारी लोकांनीं तो प्रयत्नपूर्वक सुसज्जित केला होता. दिल्लीच्या दरबाराप्रमाणें इथें चांदीची बैठक आणि मोत्यांची झालर नव्हती, पण त्याचें छत किनखापी असून त्यावर जरीचें काम केलें होतें. त्याचे खांबही असेच भरजरी वस्त्रांनीं मढवलेले होते. नाना प्रकारच्या चित्रांनीं सुशोभित केलेला मऊ मऊ गालिचा सभामंडपांत अंथरला होता आणि त्याच्या चारी बाजूला भरगच्च पोशाख केलेले सैनिक रांगेनें उभे राहिलेले होते. दरबारच्या बाहेर घोडेस्वार उभे असून ते प्रेक्षकांची व्यवस्था ठेवीत होते. सभामंडपाच्या मध्य-भागीं पांढऱ्या स्वच्छ संगमरवरी दगडांच्या उंच वेदीवर सीतारामसाठीं सोन्यारुप्यानें मढवलेलें आणि मोत्यांच्या झालरीनें सुशोभित केलेलें सिंहासन ठेवण्यांत आलें होतें.

हळूहळू साऱ्या किल्ल्यांत लोकांची एकच गर्दी झाली. सभामंडपात फक्त उच्चवर्गाच्या व्यक्तींनाच जागा मिळाली होती. बाकीचे हजारों हजार लोक सभामंडप वेढून बाहेर उभे राहून पहात होते.

हा बडा समारंभ महाराणी नंदादेवीनें खिडकींतून पाहिला. तिनें रमाला बोलावून घेतलें आणि तो लोक समुदाय तिला दाखवून ती म्हणाली, " पाहिलंस ना, या लोक समुहांत उभी राहून बोलशील का तूं ? एवढं धाडस होईल का तुझ्या हातून ? "

रमा म्हणाली, " माझ्या पतीच्या चरणांवर माझी भक्ति असेल तर हेंही धाडस माझ्याकरवीं होईल. "

नंदा म्हणाली, " आमच्यापैकीं कुणी तुझ्याबरोबर तिथं आलं पाहिजे का ? तूं म्हणत असशील तर मी येईन. "

रमा म्हणाली, " या बदनामीच्या समुद्रांत माझ्याबरोबर तूं देखील कशाला उडी घेतेस ? कुणीही बरोबर यायला नको माझ्या. फक्त एकच काम करा—मला ज्यावेळीं बोलावं लागेल त्यावेळीं माझ्या मुलाला घेऊन कुणाला तरी तिथं माझ्या शेजारीं उभं करून ठेवा. त्या मुलांच्या तोंडाकडे पाहिलं कीं मला अवसान येईल. "

नंदानें तशी व्यवस्था करण्याचें कबूल करून म्हटलें, " आतां सभेंत जायची वेळ झाली. जरा नीटनेटका पोशाख करून घे आणि वेळींच तयार रहा. "

रमा आपल्या महालांत गेली. दार बंद करून घेऊन तिनें धरणीवर अंग टाकलें आणि हात जोडून देवाला आळवीत ती म्हणाली, " जय लक्ष्मीनारायणा, वांचव ! जय जगदीश्वर ! आजच्या दिवशीं मला जें कांहीं बोलायचं आहे, तें बोलण्याचं सामर्थ्य मला दे. त्यानंतर मला जरी कायमची मुकी करून टाकलीस, तरीही मी समाधान मानीन. आजच्या दिवसापुरती माझी वाचा शाबूत ठेव. यानंतर मला मरण आलं तरी देखील चालेल. "

त्यानंतर पोशाख करायची तिला आठवण झाली. तिनें एका दासीकडून एक सामान्य वस्त्र मागवून घेतलें आणि तें पेहरून ती सभामंडपांत जायला निघाली. तिला त्या वेषांत पहातांच नंदानें विचारलें, " काय ग हें ? "

रमा म्हणाली, "आजचा दिवस वैभवाच्या साजसज्जेचा नाहीं. देवदयेनं पुन्हां तसा दिवस आला म्हणजे पुन्हा नटून सजून सर्वांसमोर मिरवीन. आज याच वेषांत मीं सभेंत जाऊन उभी राहणार आहें."

तिचें म्हणणें नंदाला पटलें. तिनें त्यानंतर रमेला कांहींच सांगितलें नाहीं.

३

ठरलेल्या वेळीं महाराज सीताराम राय सभामंडपांतील सिंहासनावर येऊन बसले. भालदारचोपदारांनीं पुकार केला, पण गीतवाद्याला त्यादिवशीं बंदी करण्यांत आली होती.

हातापायांत बेड्या घातलेल्या गंगारामला आणून समोर उभें करण्यांत आलें. बाहेर जमलेले लोक त्याला पहाण्यासाठीं गडबड करूं लागले होते, पण तिथें व्यवस्थेसाठीं असलेल्या रक्षकांनीं त्यांना शांत केलें.

राजा गंभीर आवाजांत गंगारामला म्हणाला, "गंगाराम, तूं माझा नातेबाईक आहेस, जिव्हाळ्याचा माणूस आहेस, माझी प्रजा आहेस, तसाच माझा पगारी नोकर आहेस.मी तुला स्नेहानं वागवलं होतं. तूं माझ्या विश्वासाला पात्र झालेला होतास, हें सर्वांनाच माहीत आहे. एकेकाळीं मी तुला मृत्यूच्या दाढेंतून ओढून काढलं होतं. असं असतांना तूं असा विश्वासघात करायला कां प्रवृत्त झालास ? आतां राजदंड भोगायला तयार हो."

मोठ्या अदबीनें गंगाराम म्हणाला, "कुठल्या वैऱ्यानं आपल्यापाशीं माझ्यावर असा खोटा आरोप केला ? मी कोणत्याही प्रकारचा विश्वासघात केलेला नाहीं. स्वतः महाराज माझा न्याय करायला आले आहेत, त्याअर्थीं धर्मशास्त्रसंमत प्रमाण मिळाल नाहीं तर मला कोणतीच शिक्षा होऊं नये, एवढंच माझं मागणं आहे."

राजा म्हणाला, "तसंच होईल. धर्मशास्त्रसंमत जे पुरावे मिळाले आहेत, ते आतां ऐक आणि त्यांचीं उत्तरं दे.—" असें म्हणून राजानें चंद्रचूडांकडे पाहून म्हटलें, "आतां तुम्हांला जें काय माहीत आहे, तें इथं सांगा."

चन्द्रचूडांनीं या प्रकरणीं आपणास माहित असलेली सर्व हकीगत सभेपुढें सविस्तर निवेदन केली. ज्या दिवशीं मुसलमानांनी किल्ल्यावर हल्ला करण्यासाठीं नदीपार होऊन यायला सुरवात केली होती, त्या दिवशीं चंद्रचूडांनीं कितीही

आग्रह करून सांगितलें तरी गंगारामनें किल्ल्याचें रक्षण करण्याचा कां प्रयत्न केला नाहीं, तें समेत जमलेल्या लोकांना कळून आलें. चंद्रचूडांचें निवेदन संपलें तेव्हां राजानें गंगारामला विचारलें, " नराधमा, आतां याचं उत्तर काय देणार आहेस ? "

गंगाराम हात जोडून म्हणाला, " महाराज, हे ब्राह्मण पंडित आहेत. लढाईचे डावपेंच यांना काय माहीत ? मुसलमान नदीच्या या किनाऱ्याला आले नव्हते कीं त्यांनीं किल्ल्यावर हल्लाही चढवला नव्हता. तसा हल्ला केला असता आणि मी त्यांना हटवलं नसतं तर ठाकुरमहाशयांचा आरोप मीं कबूल केला असता. महाराज, मी देखील या किल्ल्यांतच रहातों आहें. किल्ल्याचा नाश होणं मला कसं परवडेल ? त्यांत माझा काय फायदा ? "

" काय फायदा तें आणखीं एकाच्या तोंडून ऐक ! " राजा म्हणाला. राजानें चांदशहा फकिराला बोलावून घेतलें आणि म्हटलें, " आतां तुम्हांला काय माहीत आहे तें इथं सांगा. "

चांदशहानें आपल्याला माहित असलेली हकिकत सांगितली. किल्ल्यावर चढाई होण्याच्या पूर्वी गंगाराम तुरबखाँकडे गेला होता, असें चांदशहानें सांगितलें. त्यावेळीं राजानें गंगारामला विचारलें, " यावर काय उत्तर आहे तुझं ? "

गंगाराम म्हणाला, " मी त्या रात्रीं तुरबखाँला भेटायला गेलों होतों खरा. मी फितूर झालों आहें, असं त्याच्यासमोर ढोंग केलं तें त्याला फसवून किल्ल्याच्या खालीं आणायचं आणि तो बेसावधपणें आला असतां त्याला टिपून मारायचें हाच माझा उद्देश होता. "

राजा म्हणाला, " या कामासाठीं तूं तुरबखाँकडे कांही बक्षिसी मागितली होतीस कीं नाहीं ? "

गंगाराम म्हणाला, " तसं कांहीं मागितलं नसतं तर माझं म्हणणं त्याला खरं कसं वाटलं असतं ? "

राजानें विचारलें, " कोणतं बक्षीस मागितलं होतंस ? "

" अर्धं राज्य. " गंगाराम म्हणाला.

" आणखी कांहीं ? "

" आणखी कांही नाहीं. "

गंगारामचें तें उत्तर ऐकतांच चांदशहाला राजानें विचारलें, "या बाबतींत तुम्हांला कांहीं माहीत आहे ?"

"हो. माहीत आहे." फकीर म्हणाला.

"तें काय आणि कसं कळलं तुम्हांला ?" राजानें विचारलें.

चांदशहा म्हणाला, "मी मुसलमान फकीर. मी तुरबखाँकडे वेळोवेळीं जात येत असें. तो माझ्याबद्दल आदर धरीत होता. मी केव्हांही त्याच्याबद्दल महाराजांकडे कांही सांगितलं नाही, कीं महाराजांकडच्या गोष्टी त्याच्याकडे काढल्या नाहींत. अर्थात् मीं कोणत्याच पक्षाचा म्हणून मानला जात नव्हतों. आतां तुरबखाँ नाहीं. परिस्थिति बदलली आहे. गंगारामबद्दल तुरबखाँ माझ्याकडे बोलला होता, कीं हा फितूर झाला आहे असं त्यानं मला सांगितलं होतं. इथून तो नदीपार होऊन पळून गेला त्यावेळीं त्यांची माझी भेट झाली होती. त्याचवेळीं तो म्हणाला, कीं गंगारामनं आपल्याशीं प्रतारणा केली. गंगारामला अर्धं राज्य द्यायचं आपण कबूल केलं होतं, पण त्यानं आणखीही कांही मागितलं होतं असं तो म्हणाला होता. पण तें सांगायला मला संकोच वाटतो आहे—भीति वाटते आहे—आपण अभय दिलं तर मी सांगेन."

"बोला—निर्भयपणें बोला." राजा म्हणाला.

बादशहा म्हणाला, "यानं दुसरं बक्षिस मागितलं तें महाराजांची धाकटी राणी !"

जमलेले लोक समुद्रासारखी गर्जना करूं लागले. गंगारामला नानाप्रकारें शिवीगाळ करूं लागले. रक्षकांनीं त्यांना शांत केलें.

गंगाराम म्हणाला, "महाराज, ही अशक्य गोष्ट आहे. माझी स्वतःची पत्नी आहे, हें महाराजांना माहीत नाहीं असं नाहीं. मी नगररक्षक आहें—मला बायकांची लालूच असती तर अशा बायका मिळवणं मला फार सोपं होतं. महाराजांची धाकटी राणी मी कधीं पाहिलीसुद्धां नाहीं, मग मी काय म्हणून तिची मागणी करूं ?"

राजा म्हणाला, "तर मग तूं रात्रीच्या वेळीं कुत्र्यासारखा लपत छपत माझ्या अंतःपुरांत कां प्रवेश करीत होतास ?"

आतां पांडेठाकूर पहारेवाला याला हजर करण्यांत आलें. गंगाराम रोज मध्यरात्रीला आपण मुरलेचा भाऊ आहें, असें सांगून तिच्याबरोबर अंतःपुरांत कसा जात असे तें त्यानें सविस्तर सांगितलें.

त्याची जबानी ऐकून गंगाराम म्हणाला, "महाराज, हेंही शक्य नाहीं. मुरलेच्या भावाला तरी या पहारेवाल्यानं कां म्हणून आंत सोडावं?"

पांडेठाकूर म्हणाला "मी गंगारामला चांगला ओळखीत होतों. शहरच्या कोतवालला अडवायचं कां म्हणून? मी यांना ओळखलं होतं तरी ओळख दाखवीत नव्हतों."

गंगाराम आतां खचत चालला होता. हें प्रकरण आतां अंगाशीं येणार असें त्याला वाटूं लागलें होतें. आतां त्याला एकच आशा होती—मुरला स्वतः हा प्रकार उघड करणार नाहीं—नाहींतर तिलाच शिक्षा व्हायची—तिला काय आपल्या प्राणांची भीति नाहीं?

गंगाराम म्हणाला, "आतां मुरलाला बोलावून तिलाच विचारा म्हणजे आपोआपच हें सारं खोटं ठरेल."

मोठी राणी नंदा हिनें मुरलेला यापूर्वीच आपल्या विश्वासांत घेतलें होतें, हें त्या बिचाऱ्याला माहीत नव्हतें. नंदानें मुरलेला सांगितलें, "महाराज स्त्रीहत्या करीत नाहींत. तुला ती भीति नको. बायकांना कसलीही शारीरिक शिक्षा मिळत नसते म्हणून तुलाही कडक शिक्षेची भीति नाहीं. तुला सजा ही होणारच, पण तूं खरं बोललीस तर तुझी सजा पुष्कळच कमी केली जाईल."

थोरल्या राणीचें तें म्हणणें मुरलेला पटलें होतें. तिला दरबारांत उभी करतांचतिनें सर्व हकिकती जशा घडल्या होत्या तशा सांगितल्या. कांहींच लपवून ठेवलें नाहीं,

मुरलेच्या जबानीमुळें गंगारामच्या मस्तकावर वज्राघात झाला. तरीही त्यानें अजून आशा सोडली नव्हती. तो म्हणाला, "महाराज, ही बाई दुराचरणी आहे. मी हिला अनेक वेळ पकडली होती आणि तिला शिक्षाही केली होती—तो सूड उगवण्यासाठीं ही असं बोलतेय."

"तर मग कुणाच्या जबानीवर विश्वास ठेवायचा गंगाराम?" राजानें विचारलें, "खुद्द राणीनं सांगितलं म्हणजे तरी तुला पटेल का?"

गंगारामला हातीं स्वर्ग आल्यासारखा वाटला. रमा या भर सभेंत येऊन उभी राहील आणि झालेल्या गोष्टी सांगून टाकील, असें त्याला निश्चितपणें वाटलें नव्हतें, म्हणून तो म्हणाला, "अवश्य पटेल. राणीसाहेबांच्या जबानीनं मी जर दोषी ठरलों तर खुशाल मला योग्य ती शिक्षा द्या."

राजानें तेव्हां एकदा अंतःपूराकडे नजर वळविली. गंगाराम आश्चर्यानें थक्क झाला. एकाद्या छोट्या बालकाप्रमाणें धीरे धीरे सावकाश पावलें टाकीत मलिन-वेषधारी एक बुरखा घेतलेली स्त्री सभास्थानांत येत होती. तिच्या सौंदर्याची जाणीव गंगारामच्या रोमरोमांतून खिळून गेली होती. ती समोर येतांच त्यानें तिला ओळखलें—गंगारामचा जीव डोळ्यांत आला. प्रेक्षक मंडळींत एकच गडबड उठली रक्षकांनीं त्यांना समजावून शांत केलें.

रमा आली. तिनें पहिल्यानें राजाला आणि नंतर गुरु चंद्रचूड यांना दुरूनच जमिनीवर साष्टांग प्रणाम केला. बुरखा दूर करून ती सर्वांसमक्ष उभी राहिली. त्या मलिन वेषांत देखील तिचें सौंदर्य झळाळून दिसत होतें.

राजाच्यानें बोलवत नव्हतें. तो मान खालीं घालून बसला होता असें चंद्रचूड यांनीं पाहिले तेव्हां ते रमाला म्हणाले, "महाराणी, या गंगारामचा खटला असा आहे.—हा माणूस केव्हां तुमच्या अंतःपुरांत गेला होता, गेला असला तर कां गेला होता, तुमचं आणि त्यांचं काय काय बोलणं झालं, तें सर्व सांगा. ही जशी राजाची आज्ञा आहे, तशीच माझी, तुमच्या गुरुचीही आज्ञा आहे—जें खरं असेल तें इथं सांगून टाका."

रमानें वर पाहिलें. गुरूला उद्देशून ती म्हणाली, "राजाची राणी केव्हांही खोटं बोलत नसते. मी जर मिथ्यावादिनी असतें तर हें सिंहासन यापूर्वीच कोसळून पडलें असतें."

तिचें तें भाषण ऐकतांच जमलेल्या लोकांनीं तिच्या नांवाचा जयजयकार केला.

आतां रमेला अवसान आलें.

"काय सांगू गुरुदेव? मीं राजाची राणी—मी केलेला हुकूम, राजाचा नोकर—आमचा नोकर कां पालन करणार नाहीं? राजकार्यासाठींच कोतवालला मी बोलावणं पाठवलं होतं. कोतवाल माझ्यापाशीं येऊन माझा हुकूम ऐकून गेला होता—मग त्याची चौकशी कसली आणि मी बोलायचं तरी काय?—"

तिचें तें भाषण ऐकून यावेळीं प्रेक्षकांनीं जयजयकार केला नाहीं. बरेचसे लोक खिन्न झाले. आणि बरेचसे उद्गारले, " कबूल ! "

चंद्रचूड म्हणाले, " रात्रींच्या वेळीं कोतवालाला अंतःपुरांत बोलावण्याजोगं असं हें कसलं राजकार्य होतं, राणीसाहेब ? "

रमा म्हणाली, " ऐका तर मग सारी कथा—"

रमेनें इकडे तिकडे पाहिले—कुठें होता तिला मुलगा ? दाईच्या कडेवर मुलगा असलेला पाहून तिला धीर आला अवसान येऊन तिनें बोलायला प्रारंभ केला.

पहिल्यानें ती अगदीं हळूहळू कुठून तरी दुरून ऐकूं येत असलेल्या संगीता, सारखी बोलत होती. तें सर्वांना ऐकूं येत नव्हतें. बाहेरचे जमलेले लोक म्हणूं लागले, " आम्हांला ऐकूं येत नाहीं. आम्हांला ऐकायचं आहे ! "

रमेनें आवाज थोडा वर चढवला—थोडा अधिक स्पष्ट—थोडा अधिक उंच—असं होता होतां ती खणखणीत आवाजांत बोलूं लागली. आपल्या मुलावर येणाऱ्या संकटाच्या आशंकेनें आपण हें धाडस कसें केलें, हें ज्यावेळीं ती समजावून सांगूं लागली, तें सांगतांना पुन्हां पुन्हां आपल्या मुलाच्या तोंडाकडे पाहूं लागली आणि पहात असतांना आसवांनीं भरलेल्या डोळ्यांनीं आणि गंहिंवरलेल्या आवाजानें मातृप्रेमाचे उच्छ्वासांवर उच्छ्वास आणि तरंगावर तरंग उठवूं लागली, त्यावेळीं अप्सरांच्या स्वर्गीय संगीताचे तीन ग्रामापर्यंत उठणारे पडसाद जणूं काय श्रोत्याच्या कर्णावर आदळूं लागले. सर्व श्रोते मुग्ध होऊन ऐकत होते.

इतक्यांत रमेनें दाईच्या हातांतून आपलें बालक काढून घेतलें आणि तें सीतारामाच्या पायाशीं ठेवून हात जोडून ती म्हणाली, " महाराज, आपल्याला आणखी दुसरीं मुलं आहेत. मला दुसरं मूलं नाहीं ! महाराज आपलं एक राज्य आहे—माझं राज्य म्हणजे एवढं हें एक बाळ ! महाराज, तुमचा धर्म आहे, कर्म आहे, यश आहे, स्वर्ग आहे—मी मुक्तकंठानं बोलतें माझा धर्म हाच—हें बाळ ! हेंच माझं कर्म, हेंच माझं यश आणि हाच माझा-स्वर्ग ! महराज, मी अपराधी असलें तर मला शिक्षा करा. "

तिच्या तोंडून ते शब्द निघतांच जमलेल्या लोकांनीं जयजयकाराचा एकच कल्लोळ झाला.

पण लोकांत दोन्ही प्रकारचीं माणसें असतात. कित्येक जयजयकार करीत होते. कित्येकजण त्यांना साथ देत नव्हते. जयध्वनि ओसरल्यावर त्यांतल्या कुणी कुणी विचारलें! "आम्ही कसा विश्वास ठेवायचा या भाषणावर?" एक प्रौढ बाई म्हणाली, "कसलीग ही बाई? रात्रीं पुरुष माणसाला बोलावून घेते—कसली ही सती?" कुणी म्हणाले, "या असल्या भाषणावर राजा भुलला तर खुशाल भुलो. आम्हांला हें पटायचं नाहीं!" कुणी म्हणाले, "आहा, ही आमची राणी! हीच जर अशीं कामं करूं लागली तर आम्ही गरीब दुःखी लोकांनीं काय करावं?"

लोकांचे हे उद्‌गार सीतारामच्या कानीं गेले. राजा रमेला म्हणाला, "हे माझ्या प्रजेतले लोक तुझ्या या भाषणावर विश्वास ठेवायला तयार नाहींत. यावर तुझं काय म्हणणं आहे?"

रमा कांहीवेळ मान खालीं घालून राहिली होती. तिच्या डोळ्यांवाटे आसवें पाझरत होतीं. नंतर ती सांवरली आणि राजाकडे वर पाहून म्हणाली," ज्याअर्थी लोक माझ्यावर विश्वास ठेवीत नाहींत, त्याअर्थी आतां मला एकच मार्ग मोकळा आहे—आपल्या राजघानीला कलंकभूत झालेलं हें जीवन आतां राखून ठेवणं पुरे झालं. चिता तयार करण्याचा हुकूम द्या, कीं मीं सर्वांसमक्ष आंत उडी घेतें. मला त्याचं कांहींच वाटायचं नाहीं. लोकांनीं मला कलंकिनी म्हटलं तर मरून जावं हेंच उत्तम! पण माझं एक मागणं आहे महाराज-माझ्यावर आपलाही विश्वास नाहीं का? तसंच जर असेल—" रमेच्या डोळ्यांवाटे आतां अधिकच झरणी लागली होती. "—तर माझं आगींत उडी घेऊन जीव देणंही फुकट जाईल. या सर्व लोकांसमक्ष आपण जर सांगितलं कीं माझ्यावर आपला विश्वास नाहीं, तर मी चितेंत उडी घेऊन स्वर्गाला जाईन. महाराज, परलोकाचे उद्धारकर्ते भुदेवासारखे आमचे गुरुदेव इथं समोर आहेत. मीं त्यांच्या समोर उभी राहून इष्टदेवाला साक्ष ठेवून बोलत आहें, की मी अविश्वासिनी नाहीं. गुरूपेक्षांही जे जे मला पूज्य, मनुष्य असूनही देवतेपेक्षां मला पूज्य असलेल्या पतिदेवतेसमोर मीं प्रतिज्ञापूर्वक बोलतें आहें, कीं मी अविश्वासिनी नाहीं.

महाराज, हा स्त्रीदेह धारण करून जी कांहीं देवसेवा, ब्राह्मणसेवा, दानव्रतनियम मीं केले आहेत, ही मीं विश्वासघातिनी असतें, तर त्या सर्वांच्या फलापासून मीं वंचित होईन. पतिसेवेपेक्षां स्त्रीजातीला दुसरं पूण्य नाहीं.—मी तनमनधन खर्ची घालून जर आपली चरणसेवा केली असेल—आपण ती जाणतांच—मीं अविश्वासिनी ठरलें, तर त्या सर्व पुण्यफलापासून मीं वंचित होईन. ज्या माझ्या या पुत्राच्यापायीं मला हा कलंक लागला आहे—ज्याच्या तुलनेनं या जगांत मला दुसरं कांहींही मोठं वाटत नाहीं—मी अविश्वासिनी ठरलें, तर त्या पुत्र-मुखदर्शनापासून मीं कायमची वंचित होईन—यापेक्षां अधिक काय बोलूं महाराज ?"

यापुढें रमेच्या तोंडांतून शब्द निघाला नाहीं. कोसळलेल्या वेलीप्रमाणें ती त्या सभेंत मूर्छित होऊन पडली. कांहीं प्रौढ स्त्रिया धांवत आल्या आणि तिला उचलून अंतःपुरांत घेऊन गेल्या. दाईच्या कडेवर असलेला मुलगाही आपल्या आईबरोबर रडत रडतच गेला.

सभेंत जमलेल्या सर्व लोकांच्या डोळ्यांवाटे आसवें पाझरत होतीं. गंगाराम्च्या हातापायांत असलेल्या बेड्या खळखळल्या. वादळांतल्या समुद्रासारखा जनसमुदाय उसळून उठून जेव्हां कोलाहल करूं लागला तेव्हां त्याला बांध घालणें रक्षकांनाही कठिण गेलें.

"आतां गंगाराम काय म्हणतो ? गंगाराम हें खोटं म्हणतोय का ? गंगाराम जर हें खोटं म्हणत असेल तर या आपण सारे लोक मिळून गंगारामचे तुकडे तुकडे करून टाकूंया." चोहींकडून जमलेले लोक असे उद्‌गार काढीत होते.

गंगारामनें पाहिलें, कीं यावेळीं लोकांच्या मनावर परिणाम केला नाहीं तर आपली धडगत नाही. गंगाराम बुद्धिमान् होता. जमलेली प्रजा जो निकाल देईल तसेंच राजालाही कबूल करावें लागेल हें त्याला कळून चुकलें होतें. जमलेल्या लोकांच्या मनावर परिणाम करण्यासाठीं तो राजाला उद्देशून म्हणाला, "महाराज, आपण बायकांच्या शब्दावर विश्वास ठेवणार कीं माझ्या ? आपलं हें राज्य काय बायकांनीं उभारलं आहे, कीं आमच्यासारख्या नेकीच्या राजसेवकांच्या बाहुबलावर याची स्थापना झाली आहे ? महाराज, सर्व स्त्रिया मार्गभ्रष्ट होणं शक्य असतं, तिथं राजाच्या राणीचं देखील वांकडं पाऊल

पडणार नाहीं कशावरून ? राजाची राणी मार्गभ्रष्ट झाली तर राजानं तिचा त्यागच केला पाहिजे. राजाचे विश्वासू सेवक केव्हांही आपली नेकी सोडणार नाहींत. बायकांची जात आपल्या दोषाचं खापर दुसऱ्याच्या माथीं फोडायला केव्हांही तयार होईल. ही आपली राणी रात्रीं कुणाला भेटत होती आणि त्याच्याऐवजीं आतां माझं नांव घेते आहे, तें ठरवणं—मला वांचवा महाराज, मला वांचवा !—" बोलतां बोलतां मध्येंच गंगाराम अतिशय घाबरून ' मला वांचवा मला वांचवा ' म्हणून ओरडत बोबडी वळून कां स्वस्थ राहिला ?

सारे पहात होते. गंगाराम थरथरत कांपत होता. सर्वांची नजर तिकडे गेली. सर्व चकित झाले. सर्व घाबरले. त्यांनीं पाहिलें—जटाजूटधारी, काषाय वस्त्र परिधान केलेली ज्योतिर्मयी मूर्ति, साक्षात् सिंहवाहिनी दुर्गेसारखी, हातीं त्रिशूळ घेऊन तो गंगारामवर रोखून वेगानें गर्दींतून मार्ग काढीत सभामंडपांत येत आहे असें दिसून येतांच उसळलेल्या समुद्राप्रमाणें क्षुब्ध झालेला तो जनसमुदाय एकदम चुपचाप झाला.

गंगारामनें एका रात्रीं हीं मूर्ति पाहिली होती. पुन्हां आतां तो निरपराध असलेल्या रमेचा सर्व नाश करायला खोटें बोलून उद्युक्त झाला असतां, ही मूर्ति पहात होता. प्रत्यक्ष चंडी आपला वध करण्यासाठीं आली आहे असें वाटून भीतीनें गर्भगळित होऊन तो ओरडत होता, " माझं रक्षण करा, माझं रक्षण करा ! "

इकडे राजा आणि तिकडे चंद्रचूड–ही रात्रीं पाहिलेली देवीची मूर्ति समोर येतांच त्यांनीं तिला ओळखलें. ती नगरची राजलक्ष्मी आहे अशी कल्पना करून ते लगबगीनें उठून उभे राहिले. सभेंतील जमलेले सदस्यही तें पाहून उठून उभे राहिले.

इकडे तिकडे न पाहतां जयंती झपाट्यानें पावलें टाकीत तडक गंगारामच्या जवळ आली आणि त्या मंत्रपूत त्रिशूलाचें टोंक त्याच्या छातीशीं भिडवून एवढेंच म्हणाली, " आतां बोल ! "

गंगारामच्या देहाला त्रिशूलाचा स्पर्श होतांच तो एकदम गळाठून गेला. गंगारामला वाटलें, आतां एक खोटा शब्द बोललों तर हा त्रिशूळ माझ्या हृदयांत घुसेल.

आतां दुसरा मार्गच राहिला नव्हता. थरथर कांपत हात जोडीत मोठ्या आदबीनें त्यानें घडलेली सारी खरीखरी हकिकत समेसमोर सांगायला सुरवात केली. त्याचें भाषण पुरे होईपर्यंत जयंतीनें त्रिशूळाचें टोंक त्याच्या छातीवर टेकून तसेंच ठेवलें होतें. गंगारामनें त्यावेळीं रमेची निर्दोषिता, आपला सौंदर्याचा मोह, लोभ, फौजदाराची घेतलेली भेट, त्याच्याशीं केलेला करार आणि विश्वासघाताचे केलेले सर्व प्रयत्न त्यानें सविस्तर सांगून टाकले.

गंगारामच्या छातीला टेंकलेला त्रिशूळ काढून घेऊन जयंती आली तितक्याच तांतडीनें निघून गेली.

ती जांत असतां सभेंतले सारे सेवक त्या देवीतुल्य मूर्तीला प्रणाम करीत होते. सारे लोक तिला जाण्यासाठीं वाट करून देत होते. तिला कांही विचारायला कीं तिच्या मागोमाग जायला कुणालाही धैर्य झालें नव्हतें. ती कोणत्या दिशेनें कुठें निघून गेली तें कुणालाच कळलें नाहीं.

जयंती निघून गेल्यावर राजानें गंगारामला विचारलें, " आतां तूं आपल्याच तोंडानं आपले सारे अपराध कबूल केले आहेत ? तुझ्यासारख्या कृतघ्नाला देहांताशिवाय दुसरी शिक्षा नाहीं. आतां राजाज्ञेनं प्राणत्याग करायला सिद्ध हो."

त्यावर गंगाराम कांहीं बोलला नाहीं. पहारेकरी त्याला घेऊन गेले. गंगारामला देहांताची शिक्षा दिलेली ऐकून सर्व लोक स्तंभित झाले होते. कुणी कांहींसुद्धां न बोलतां आपआपल्या घरीं गेले. प्रत्येकजण रमेची मुक्तकंठानें प्रशंसा करीत होता. ती साक्षात् लक्ष्मी आहे असें म्हणत होता.

रमा, आतां निष्कलंक झाली होती.

मुरलेचें मुंडन करून तिची धिंड काढून तिला गांवाबाहेर सोडून देण्याचा राजानें हुकूम दिला. तो हुकूम तामिल झाला त्यावेळीं गांवची मुलें ' हुर्यो ' करीत तिच्या मागून जात होतीं.

गंगारामसारख्या कृतघ्न विश्वासघातक्याला त्यावेळच्या राजनीतीला अनुसरून सुळावर चढवण्याखेरीज दुसरी शिक्षा देणें शक्य नव्हतें. तसा हुकूमही झाला होता, पण कांहीं दिवसपर्यंत ही शिक्षा अंमलात आणण्याचें तहकूब करण्यांत आलें होतें—कारण राजाला अभिषेक करण्याचें त्याचवेळीं ठरलें होतें.

सीतारामनें स्वतःच्या बाहुबलानें हिंदुराज्य स्थापन केलें होतें. तो राजा झाला पण त्याला राज्यभिषेक झाला नव्हता. हिंदुशास्त्राप्रमाणें तो होणें अवश्य होतें. चंद्रचूड ठाकुरांनीं ज्यावेळीं हा प्रस्ताव केला त्यावेळी सीतारामनेंही त्याला संमति दिली. अशा प्रकारच्या महोत्सवामुळें प्रजा संतुष्ट झाली, तर त्यांची राजभक्ति विशेष वाढेल असें त्याला वाटलें आणि म्हणूनच मोठ्या थाटामाटानें हा अभिषेकाचा समारंभ संपन्न करण्याचें त्यानें योजिलें.

अशा मंगल प्रसंगीं गंगारामला देहांताची दिलेली शिक्षा अमलांत आणणें अशुभ होईल असें नंदा आणि चंद्रचूड या दोघांनीही सीतारामला सांगितलें, तेव्हां राजानें त्याला संमति दिली.

मुख्य प्रश्न असा होता, कीं गंगारामला सुळीं द्यायला सीतारामच्या मनाची तयारी होत नव्हती. राज्यशासनासाठीं राजधर्म पालन करणें अवश्य असतें म्हणूनच त्यानें गंगारामलाही शिक्षा दिली होती. पण तसें करायची त्याची इच्छा नव्हती. याचें कारण एकच —गंगाराम श्रीचा भाऊ होता.

सीताराम श्रीला विसरला नव्हता. इतके दिवस, इतके प्रयत्न करूनही तिचा पत्ता लागत नसल्यामुळें निराश होऊन राज्यकारभारांत सारें मन गुंतवून टाकलें, कीं आपल्याला श्रीचा बिसर पडेल असें त्याला वाटलें होतें. त्यासाठींच दिल्लीला जाऊन तो बादशहाच्या दरबारीं राहिला आणि बादशहाला संतुष्ट करून त्याची सनद घेऊन आला. या एकाच गोष्टीमुळें भूषणानगरी मिळवण्याचा त्याचा उत्साह बळकट झाला आणि त्यानें दक्षिण बंगाल प्रांतांत आपलें स्वतंत्र आधिपत्य प्रस्थापित केलें.

एवढें सर्व झालें तरीही श्री त्याच्या हृदयाचा संपूर्ण ताबा घेऊन बसली होती आणि म्हणूनच गंगारामला सुळी देणें तहकूब करण्यांत आलें होतें.

इकडे अभिषेकाची धूमधाम जोरानें सुरू झाली होती. देशोदेशींचे लोक येऊन राजधानींत गर्दी करीत होते. राजे, राजपुरुष, ब्राह्मणपंडित, अध्यापक, शिक्षक, भिक्षुक, साधु, संन्यासी आहुत आणि अनाहुत लोकांनीं इतकी गर्दी केली होती, कीं राहायला गांवांत त्या सर्वांना जागासुद्धां मिळत नव्हती. त्या सर्व लोकांच्या खाण्यापीण्याची व्यवस्था करणेंही अवश्य होतें. हें सर्व काम पुरें पाडतांना राजाचे सर्व कर्मचारी बेजार होत होते.

या अभिषेकाच्या प्रसंगीं एक महत्वाचा विधि होता. तो म्हणजे दान. अभिषेकाच्या दिवशीं सीताराम केव्हां स्वहस्तें तर केव्हां राजसेवकांच्या हस्तें सर्वत्रांना अन्नवस्त्र, सोनेंरुपें, जमीनजुमला दान देत होता. इतके लोक गोळा झाले होते, कीं सारा दिवसभर हा दानविधि संपत नव्हता.

अर्धरात्रीं हा दानविधि उरकून सीताराम थकला. शिल्लक राहिलेल्या लोकांना दानें वाटण्याचें काम आपल्या नोकरांवर सोंपवून विश्रांति घेण्यासाठीं तो जेव्हां अंतःपुरांत आला तेव्हां एकदम चकित झाला—घाबरून गेला—कारण तिथें ती त्रिशूळधारिणी राजलक्ष्मीची मूर्ति उभी होती.

राजानें भक्तिभावानें तिला साष्टांग नमस्कार घातला आणि म्हटलें, "माताजी, आपण कोण आहां तें कृपा करून मला सांगाल काय?"

जयंती म्हणाली, "महाराज, मीं एक भिकारीण आहें. मी इथं भिक्षा मागायला आलें आहें."

राजा म्हणाला, "माझी अशी दिशाभूल कां करतां माताजी? आपण देवी आहां, हें मी ओळखलं आहे. आपण साक्षात् राजलक्ष्मी आहां. माझ्यावर आपली कृपादृष्टि असावी."

जयंती म्हणाली, "नाहीं महाराज, मी सामान्य मानवी आहें? आज जो जें कांहीं मागतो आहे, त्याला तें आपण देतांहां, असं मी ऐकलं. माझी मागणी फार मोठी आहे—पण एवढीं दानं द्यायची ज्याची शक्ति आहे त्याच्या करवीं मला निराश होऊन जावं लागणार नाहीं, असं वाटल्यावरूनच मी इथं आलें आहें."

राजा म्हणाला, "माताजी, आपल्याला अदेय असं कांहीं नाहीं. एकदां आपण माझं राज्य राखलं. दुसऱ्यावेळीं माझी कुलमर्यादा राखली. आपण देवी असा, कीं मानवी असा, आपण मागाल तें देणं हेंच माझं कर्तव्य! काय पाहिजे आपल्याला? आज्ञा करा. मीं आतांच तें आणून हजर करतों."

जयंती म्हणाली, "गंगारामला देहांतशिक्षा देण्यांत आली आहे, पण अजून नही तो हयात आहे—मी त्याच्या जीवनाची भिक्षा मागायला आलें आहें."

"आपण?" राजानें चकित होऊन विचारलें, "गंगाराम म्हणजे क्षुद्राहून क्षुद्र व्यक्ति! त्याच्याबद्दल आपल्याला कां दया उत्पन्न झाली?"

जयंती म्हणाली, "आम्ही भिकारी, आमच्यालेखीं सारेच सारखे आहेत."

राजा म्हणाला, "पण आपणच त्याला त्रिशूळानं मारायला निघालां होतां? दोन वेळ त्याचं कारस्थान आपण उघडकीस आणलं होतं!—फार काय, महाराणीची दया येऊन आपण पुढं सरसावलां नसतां आणि गंगारामनं ती कबुली दिली नसती, तर त्याला देहांताची शिक्षाच झाली नसती! मग आतां ती शिक्षा रद्द व्हावी असं कां म्हणतां आपण?"

जयंती म्हणाली, "माझ्यामुळंच हें सारं घडून आलं, माझ्यामुळंच त्याला ही शिक्षा झाली, म्हणूनच मी त्याच्या प्राणांची भिक्षा मागतेंय. धर्माच्या रक्षणासाठीं अधर्माचारी व्यक्तीवर त्रिशूलाघात करणं योग्य होतं. पण आतां धर्माचं रक्षण झालं आहे. आतां जीवहत्येचं पाप होऊं नये म्हणून मी तळमळतेंय. म्हणूनच गंगारामच्या प्राणांची भिक्षा घाला."

राजा म्हणाला, "तुम्हांला मीं देणार नाहीं असं कांहींही नाहीं. जें तुम्हीं मागितलं तें मीं देतों. गंगाराम आतांच मोकळा होईल, पण माताजी तुम्हांला मी भिक्षा घालावी अशी माझी योग्यता नाहीं. मी तुम्हांला भिक्षा घालणार नाहीं—गंगारामाचं जीवन मी तुम्हांला विकीन—तें मोल देऊन तुम्हांला विकत घ्यावं लागेल."

जयंती थोडीशी हंसली आणि म्हणाली, "कोणतं मोल महाराज? राजभांडारांत अशा कोणत्या धनाचा अभाव आहे, कीं भिकारणीनें त्याची भरपाई करावी?"

"राजभांडारांत नव्हे—राजाच्या जीवनांत! मधूमती नदीच्या तीरावर लोकांच्या शेजारीं आपण उभे असतांना तुम्हीं मला वचन दिलं होतं, कीं मी शोधतों आहें तें मला मिळेल—ती अमूल्य सामग्री मला द्या. त्याच मोलानं मी गंगारामाचं जीवन आपल्याला विकणार आहें."

"असली कुठली ती सामग्री महाराज?" जयंतीनें विचारलें "राज्य तर आपल्याला मिळालंच आहे."

"ज्यासाठीं मी राज्यसुद्धां सोडून देईन, असंच कांहीं मला पाहिजे आहे."

"तें काय महाराज?"

राजा म्हणाला, "श्री नांवाची माझी पहिली राणी म्हणजे माझं जीवन.— आपण देवी, सर्व कांहीं देणं आपल्या हातीं आहे. माझं जीवन मला देऊन त्या मोलानं गंगारामाचं जीवन तुम्हीं घ्या."

'हें काय म्हणतां महाराज ?" जयंती म्हणाली, "आपल्यासारख्या धर्मात्म्याच्या जीवनाशीं त्या नराधम पापात्म्याच्या जीवनाची तुलना कां करतां ? कवडीच्या बदल्यांत रत्नांची खाण का द्यायची ? तरीपण महाराज, आज आपण अंत:पुराचे सारे दरवाजे मोकळे ठेवा आणि तिथल्या पहारेकऱ्यांना हुकूम करा, कीं त्रिशूळ पहातांच वाट द्यायची. आपण मागितलेलं मोल आज रात्रीं आपल्या शय्यागृहांत पोचतं होईल. आतां गंगारामच्या सुटकेचा हुकूम द्या."

राजाचा हर्ष गगनांत मावेना. त्यानें गंगारामला सोडून देण्याचा हुकूम त्याचवेळीं जाहिर केला.

जयंति म्हणाली, "या तुमच्या अनुचरांबरोबर गंगारामच्या कोठडींत मला जातां येईल का ?"

राजा म्हणाला, "आपण जें मागाल तें मिळेल. इथं कुठंही आपल्याला अडथळा होणार नाहीं."

— ५ —

अंधारी कूपाप्रमाणें ओलसर, वारा नसलेल्या कोठडींत, सांखळीनं बांधलेला गंगाराम एकटाच पडला होता. रात्र झाली तरी त्याला झोंप येत नव्हती. उद्यां आपल्याला सुळीं देणार हें कळल्यापासून त्यानें जेवण साफ टाकलें होतें आणि त्याला झोंपही येत नव्हती. मरणाची शिक्षा म्हणजे कांहीं मोठी कठीण नव्हे. एका झटक्यासरशीं मरण येतें, पण अंधारकोठडींत मरणाची शिक्षा नजरेसमोर ठेवून एकटेंच रात्रंदिवस तळमळत विचार करीत पडण्यासारखी भयंकर शिक्षा दुसरी कोणतीच नाहीं.

प्रत्येक क्षणाला गंगाराम सुळीं जात होता. आतां शिक्षेच्या अंमलबजावणीला अवधि राहिला नव्हता. विचार करकरून त्याची चित्तवृत्ति सुन्न झाली होती. मन काळोखांत बुडून गेलें होतें. क्लेशाची जाणीव होण्याइतकीही शक्ति त्याच्या ठायीं राहिली नव्हती. त्याच्या मनांत केवळ दोनच भावना

जाग्या होत्या—एक भैरवीचें भय आणि रमेवरचा राग ! भयापेक्षां हा रागच फार जबरदस्त होता. आतां रमेबद्दलची आसक्ति त्याला वाटत नव्हती. आतां रमा म्हणजे त्याला दुष्मनाहून दुष्मन वाटत होती.

यावेळीं रमा समोर आली असती तर त्यानें तिला नखांनीं फाडफाडून टाकलें असतें. तो थोडासा विचार करायला समर्थ झाला त्यावेळीं एकच विचार त्याचा मनांत आला—मरायच्या पूर्वी रमेचा सर्वनाश कसा करतां येईल ? सुळावर चढवायला नेत असतांना रमेच्या संबंधी कोणता अश्लिल अपवाद सांगून टाकावा याचा तो विचार करीत होता.

बाहेरची अभिषेकाच्या उत्सवाची गडबड कानीं आली म्हणजे तो भानावर येई. इतर वेळीं तो दगडासारखा स्तंभित होऊन पडत रहात असे. जो सैपाकी ब्राह्मण त्याच्यासाठी मीठभात घेऊन येत असे, त्याला तो उत्सवाची हकिकत विचारीत असे. सारे लोक या उत्सवाच्या धूमधामींत निमग्न झाले आहेत आणि आपणच तेवढा या अंधारकोठडींत उंदिर-घुशींच्या शेजारीं चिलटा-पिसवांच्या सहवासांत सांखळदंडांत अडकून पडलों आहें, याची जाणीव झाली म्हणजे त्याला वाटे, कीं रमादेखील केव्हां अशा अवस्थेला येईल !

काळोखांत एक पळभर वीज चमकावी तशी गंगारामाला एक गोष्टीची आठवण झाली. आज श्री जिवंत असती तर ? श्रीनें एकदां आपल्या प्राणांची भिक्षा मागितली होतीं. पुन्हां तीच भीक मागितली असती तर काय मिळाली नसती ? मी कितीही पापी असलों तरी श्रीनें माझी कधींच उपेक्षा केली नसती ! पण अशी ती जिवाची बहीणही मरून गेली !

दोनप्रहर रात्र उलटली होती. झणझण आवाज होऊन तुरूंगाच्या दाराची साखळी खुली झाली. एवढ्या रात्रीं सांखळी कां वाजली ? गंगारामाचा जीव आकसला. आणखी कांही नवीन संकट तर येत नव्हतें ?

राजदूत दिवा घेऊन आधीं पुढें आले. गंगाराम स्तंभित होऊन त्यांच्याकडे नुसताच पहात राहिला होता. कांहीं विचारायला त्याला वाचा फुटत नव्हती. तितक्यांत त्याला जयंती दिसली. तिला पहातांच तो मोठमोठ्यानें ओरडून म्हणाला, "रक्षण करा--माझं रक्षण करा ! काय केलंय् मी ?"

जयंती म्हणाली, "बेटा, तूं काय केलं आहेस, तें तुझं तुला माहीत आहे. पण अजूनही तुझा बचाव होईल! श्रीची आठवण आहे का तुला?"

गंगाराम म्हणाला, "श्री! आज श्री हयात असती तर!"

"श्री हयात आहे!" जयंती म्हणाली, "तिनंच सांगितलं म्हणून मी महाराजांपाशीं तुझ्या जीवनाची भिक्षा मागितली. ती भिक्षा मला मिळाली. तुझी सुटका करायला मी आलें आहें गंगाराम. या क्षणाला तूं पळून जा. पहाटेनंतर या राज्यांत तोंड दाखवूं नकोस. तसा दिसलास तर तुझा बचाव करणं मला अशक्य होईल."

आपण काय ऐकत होतों, हें गंगारामला कळत नव्हतें. त्याला तें खरें वाटतच नव्हतें. पण राजदूत ज्यावेळीं त्याच्या बेड्या सोडवून घेऊं लागले, त्यावेळीं तो सुन्न होऊन पहात राहिला. त्यानें विचारलें, "माताजी, खरोखरच का मला सोडून दिलं?"

जयंती म्हणाली, "बेड्या सुटल्या आहेत. आतां पळ काढ इथून!"

गंगाराम घाबा टाकीत पळत सुटला. त्याच रात्रीं तो नगराच्या हद्दीपलीकडे निघून गेला.

६

जयंतीनें सांगितल्याप्रमाणें शय्यागृहाचीं दारें खुलीं ठेवण्याचा हुकूम सोडून राजा आपल्या शय्यागृहांत पलंगावर येऊन पडला. त्याची पदसेवा करण्यासाठीं नंदा आली. राजानें विचारलें, "रमेची प्रकृति कशी आहे?"

रमा आजारी होती हें माहित होतें तरीही नंदा म्हणाली, "कां बरं? तसं कांहीं विशेष दिसत नाहीं मला."

"तिची प्रकृति बरी नाहीं." राजा म्हणाला, "एवढ्या रात्रीं तिला पहायला जायला मला सवड नाहीं. मी फार थकलोय. माझ्याऐवजीं तूं जा आणि माझ्या सारखीच तिची चौकशी कर—तिचं कौतुक कर आणि मीं कां आलों नाहीं तेंही तिला सांग."

तो पूर्वीचा सीताराम आतां राहिला नव्हता. हिंदूंचें साम्राज्य स्थापन करण्यासाठीं ज्यानें आपलें सर्वस्व पणाला लावलें होतें तो सीताराम राज्यपालन सोडून देऊन केवळ श्रीला शोधीत हिंडत होता. जो सीताराम शरण आलेल्या गंगारामचें रक्षण करण्यासाठीं जिवावर उदार होऊन गेला होता, तोच सीताराम आज राजा झाल्यावर, राजदंड द्यायला समर्थ झाल्यावर, श्रीच्या लोभानें गंगारामसारख्या गुन्हेगाराला सोडून द्यायला तयार झाला होता. जो लोकवत्सल होता, तो आतां आत्मवत्सल झाला होता.

आज आपला पति एकटाच राहूं पहात आहे, हे नंदेच्या ध्यानीं आलें. कांहीं न बोलतां ती तिथून निघून गेली. पलंगावर पडून सीताराम श्रीची प्रतीक्षा करीत होता.

सारा दिवस आणि रात्रीं दोन प्रहर उलटेपर्यंत सारखे परिश्रम केल्यामुळें सीताराम थकून गेला होता. वास्तविक त्याला पडल्याबरोबर झोंप आली असती, पण आजचा दिवस महत्वाचा होता. जिच्यासाठीं राज्यसुख आणि राज्यभार टाकून इतकें दिवस तो देशादेशांतून आणि नगरानगरींतून भटकत होता, जिच्या चिंतनाची ज्वाला दिवसरात्र त्याच्या हृदयांत पेट घेत होती, तिच्या भेटीची आशा जागी झाल्यामुळें सीताराम आज जागा राहिला होता.

पण निद्रादेवी ही भुवनविजयी आहे. माणूस कितीही संकटांत पडलेला असला तरी एकदां ना एकदां त्याला झोंप ही येतेच. सीताराम कांहीं संकटांत नव्हता. तो अपेक्षित सुखाच्या आशेनें उत्कंठित झाला होता—सीतारामला एकवेळ तंद्रा आली. मन चंचल झालेलें असलें, कीं अशी तंद्राही फार काळ टिकत नाहीं.

थोडयाच वेळांत सीताराम दचकून जागा झाला. त्यानें समोर पाहिलें—

त्याच्या समोर काषाय वस्त्रें परिधान केलेली, रुद्राक्षभूषिता, पाठीवर केंस सोडलेली, अत्यंत सुंदर अशी मूर्ति उभी होती.

सीतारामला वाटलें, ती जयंती असावी. धडपडत उठून त्यानें विचारलें, "कुठं आहे ती ? श्री कुठं आहे ?"

पण तितक्यांत त्याला दिसून आलें, कीं ती जयंती नव्हती—श्री होती.

ओळख पटतांच तो 'श्री ! श्री ! ही श्री ! माझी श्री !' असें म्हणत मोठमोठ्यानें तिला हांका मारीत दोन्हीं हात पसरून उभा राहिला.—पण—तितक्यांत त्याचें मस्तक भिरभिरूं लागलें. डोळे मिटूं लागले. तो पुन्हां आडवा पडला.

क्षणभऱ्यानें त्याची मूर्च्छा आपोआप भंग पावली. तो डोळे तारवटून अधाशी नजरेनें श्रीकडे पहात राहिला होता. त्याच्या तोंडून शब्द बाहेर फुटत नव्हता. नजरेची तृप्ति झाल्याशिवाय जणूं काय वाचेची स्फूर्ति होत नव्हती. तो सारखा पहात होता—डोळे फाडफाडून पहात होता—पहातां पहातां त्याचें आनंदानें प्रफुल्ल झालेलें मुखमंडल आतां तितकेसें प्रफुल्ल राहिलें नाहीं. त्यानें एक मोठा सुस्कारा सोडला.

'माझी श्री' म्हणून सीतारामनें हांक मारली होती—आतां त्याला कळून चुकलें, कीं ही श्री माझी नव्हे ! ती एक असामान्य, धैर्यसंपन्न अशी शक्तिशाली, कठोर सौंदर्यानें शोभणारी, महान् महिमामयी अशी देवीची प्रतिमा होती. श्री नव्हतीच का ती ?

वेडा सीताराम राणीच्या शोधांत होता--देवी घेऊन तो काय करणार होता ?

७

राजानें श्रीचें सारें भाषण ऐकून घेतलें आणि श्रीनेंही राजाचें सर्व भाषण तसेंच ऐकून घेतलें. सारें कामधाम सोडून सीताराम श्रीच्या शोधासाठीं सारी पृथ्वी कशी पालथी घालीत होता त्याची हकीकत त्यानें श्रीला सविस्तर निवेदन केली. श्रीनें मघल्या काळांतील आपल्या हकिकतींतील कांहीं कांहीं गोष्टी सीतारामला सांगितल्या—पण साऱ्याच हकिकती सांगण्याचें तिनें टाळलें.

नंतर श्रीनें विचारलें, "आतां मी काय करावं अशी तुमची अपेक्षा आहे ?"

तिचा तो प्रश्न ऐकतांच सीतारामच्या डोळ्यांना पाणी आलें. सारें आयुष्य फुकट गेल्यावर आतां कुठें पतीची भेट झाली तर ही विचारते आहे, आतां मीं काय करावें अशी तुमची अपेक्षा आहे ?

सीतारामला वाटलें, कडीपाटाला दोरी टांग, म्हणजे मीं ती गळ्याला लावून घेतों, असें उत्तर द्यावें--पण तो कांहींवेळ उगीच राहिला.

" गेलीं पांच वर्षे सारखा मी माझी राणी शोधीत हिंडतों आहें. आतां तूं माझ्या राणीची जागा घेऊन माझ्या राजधानीला शोभा आण." सीताराम म्हणाला.

श्री म्हणाली, " महाराज, मीं नंदाची बरीच प्रख्याति ऐकलीय. तुमच्या भाग्यानं तुम्हांला इतकी चांगली राणी मिळालेली असतांना दुसऱ्या राणीची इच्छा आतां करूं नका. "

सीताराम म्हणाला. " तूं सर्वांत ज्येष्ठ आहेस. नंदा कशी का असेना, तुझी हक्काची जागा तूं कां ग्रहण करीत नाहींस ? "

श्री म्हणाली, " तुमची राणी व्हायला मिळालं तर वैकुंठांतल्या लक्ष्मीचं स्थानसुद्धां मीं ज्या दिवशीं लाथाडलं असतं, ते दिवस आतां गेले आहेत."

सीताराम म्हणाला, " म्हणजे काय ? कां ते दिवस गेले ? काय कारण झालं त्याला ? "

श्री म्हणाली, " मीं आतां संन्यासिनी झालें आहें. मी सर्व कर्मांचा त्याग केला आहे. "

सीताराम म्हणाला, " जिचा पति विद्यमान आहे तिला संन्यास घ्यायचा अधिकार नाहीं. पतिसेवा हाच तुझा धर्म आहे. "

श्री म्हणाली, " ज्या कुणी सर्व कर्मांचा त्याग केला आहे, त्या व्यक्तीला कुठल्याही सेवाधर्मांचं बंधन नाहीं. पतिसेवा हा जसा तिचा धर्म नव्हे, तसाच देवसेवाही तिच धर्म नव्हे ! "

सीताराम म्हणाला, " सर्व कर्मांचा त्याग करणं कुणालाच शक्य नाहीं— तुलाही तो साध्य झाला नाहीं. गंगारामचा जीव बचावण्यासाठीं तुला कांहीतरी कर्म करावं लागलंच ना ? आतां हें नगर बचावण्यासाठी आणि मला भेटण्या-साठी तूं कांहींतरी केलं आहेसच कीं नाहीं ? "

श्री म्हणाली, " हो. केलं आहे. पण त्यानं माझा संन्यास धर्म भ्रष्ट झालाच ! एकवार धर्मभ्रष्ट झालें म्हणून तुम्ही मला चिरकाळ धर्मभ्रष्ट व्हायला सांगतां का ? "

अनुक्रम 2-8-26 दिनांक वा.वा. क्रमांक 7896

सीताराम म्हणाला, " पतीचा सहवास म्हणजे स्त्रीजातीच्या लेखीं धर्मभ्रष्ट होणं का? ही असली मूर्खपणाची शिकवण तुला कुणी दिली? ही शिकवण तुला कुणीही दिलेली असो, ती खोडून काढायचा उपाय माझ्या हातीं आहे. मी तुझा पति आहें, तुझ्यावर माझी सर्वप्रकारची सत्ता आहे, त्या सत्तेच्या बळावर मी तुला आतां इथून जाऊं देणार नाहीं. "

श्री क्षणभर थांबली आणि म्हणाली, " तुम्ही माझे पति आहां तसेच माझे राजे आहां. त्यापेक्षां अधिक म्हणजे तुम्ही माझ्यावर उपकार केले आहेत आणि मी तुमच्या उपकारांच्या भाराखालीं चिरडली गेली आहें. तुम्ही मला जाऊं दिलं नाहींत, तर मला जातां यायचं नाहीं. "

सीताराम उगीच थोडासा हंसला आणि म्हणाला " मीं पति, मी राजा, शिवाय मी उपकारकर्ता—म्हणजे मीं जाऊं दिलं नाहीं, तर तूं जाणार नाहींस—असं तूं म्हणतेस ! माझं तुझ्यावर प्रेम आहे, म्हणून मीं तुला जाऊं दिलं नाहीं तर तूं जाणार नाहींस, असं का म्हणत नाहींस ? ही प्रेमाची सोन्याची बेडी कशी तोडून जाशील ? "

श्री म्हणाली, " महाराज तो भ्रम गेला आहे. मला नवी दृष्टि आली आहे. जो प्रेम करतो, त्या प्रेमांत त्या प्रेम करणाराला सुख आहे—धर्मही आहे—पण ज्याच्यासाठीं तें प्रेम असतं त्याला त्याचं काय ?—मला तें कळलं आहे—आपण देवाची मातीची मूर्ति करतों, तिला गंधपुष्प वाहून पूजा करतों, तशी पूजा करतांना पूजा करणाराला सुख वाटतं, धर्माचरण केलंसं वाटतं, पण त्या मातीच्या पुतळीला त्याचं काय ? "

" किती भयंकर बोलते आहेस तूं ! " सीताराम उद्‌गारला.

" भयंकर नव्हे महाराज, अमृतमय आहे हें बोलणं !" श्री म्हणाली, " ईश्वर सर्वांभूतीं वास करतोय. ईश्वराच्याठायीं प्रेम राखणं हेंच जीवाचं सुख. हाच जीवाचा धर्म ! म्हणूनच सर्वांभूतींवर प्रेम करायचं ! पण ईश्वर आहे निर्विकार. त्याला सुखदुःख होत नाहीं. ईश्वराचा अंशस्वरूप असा जो आत्मा जीवाच्या ठायीं आहे, तोही ईश्वरासारखाच निर्विकार आहे. ईश्वराच्या ठायीं अर्पण केलेली जी प्रीति, तींत त्याला सुख नाहीं कीं दुःखही नाहीं. कुणीतरी प्रेम केलं म्हणजे आपण सुखी झालों असें जें आपल्याला वाटतं, तो नुसता मायेचा विक्षेप आहे. "

सीताराम एक मोठा सुस्कारा सोडून म्हणाला, "कुणा तरी भंडसंन्याशाच्या तूं हातीं पडली असावीस असं मला वाटतंय. स्त्रीजातीची अल्पबुद्धि--कांहींतरी चार आडव्यातिडव्या गोष्टी ऐकल्यास आणि त्या मुखस्थ केल्यास अन् त्या आतां मला ऐकवते आहेस असं मला वाटतंय. स्त्रीजातीला ही असली वृत्ति शोभत नाहीं. स्त्रीजातीला योग्य तेंच मी तुला सांगतों—ऐक—मी तुझा पति आहें. माझा सहवास हाच तुझा धर्म ! या धर्मापासून तुला ढळतां येणार नाहीं. मी राजा आहें. त्याही धर्माचें रक्षण करणं हें माझं कर्तव्यकर्म आहे. पत्नी धर्मवर्तिनी रहावी हें पहाणं, हें पतीचं कर्तव्य आहे. या दोन्ही नात्यांनीं तूं आणि तुझा पत्नीधर्म पाळायला भाग पाडणं हें माझं कर्तव्य आहे. मीं तुला जाऊं देणार नाहीं."

श्री म्हणाली, "तें तर मी आधींच सांगितलं आहे. तुम्ही पति आहां, तुम्ही राजे आहां, तुम्ही उपकारकर्ते आहां, तुमची आज्ञा शिरोधार्य करणं हें माझं कर्तव्य आहे, हेंही मी जाणतें. पण तुम्हांला मला एकच गोष्ट सांगून ठेवायची आहे ती ही, कीं माझ्यापासून तुम्हाला कसलंही सुख मिळायचं नाहीं."

"तूं नुसती दिसलीस, तरीही मी सुखी होईन." सीताराम म्हणाला.

श्री क्षणभर स्तब्ध राहिली. नंतर ती म्हणाली, "माझं एकच मागणं आहे—मी घरीं राहावं असा तुमचा आग्रहच असेल तर मला या राजपुरींत ठेवूं नका. कुठंतरी गांवाबाहेर मला एक निराळी झोंपडी बांधून द्या. मी संन्यासिनी आहें—मला या राजपुरींत सुख लागायचं नाहीं, त्याचप्रमाणें सारे लोक तुमचाही उपहास करतील."

"आणि राजाच्या पट्टराणीला झोंपडींत नेऊन ठेवलं तर लोक उपहास करायचे नाहींत का ?" सीतारामनें विचारलें.

"पट्टराणी म्हणून कुणाला कशाला कळायला हवं ?" श्री म्हणाली.

"म्हणजे तुझी माझी भेटसुद्धां व्हायची नाहीं का ?" सीतारामनें विचारलें.

"ती आपली मर्जी." श्री म्हणाली.

सीताराम गंभीर होऊन म्हणाला "तुझी माझी भेट व्हायची, बोलणंचालणं व्हायचं, प्रसंगीं एकत्र राह्यचं, आणि तूं राजाची राणी नाहींस असं म्हटलं, तर लोक तुला काय म्हणतील माहीत आहे ?"

" चांगलं माहीत आहे ! " श्री म्हणाली, " लोक तुमची रखेली म्हणतील एवढंच ना ? महाराज, मी संन्यासिनी आहें. मला मानापमानाची चाड नाहीं. बोलेनात का लोक ! माझा मान आणि अपमान आहे तो आपल्या हातीं ! "

" तें कसं काय ? " सीतारामनें विचारलें.

श्री गंभीर होऊन म्हणाली, " मीं तुमची सहधर्मिणी आहें. तुमच्याशीं मी धर्माचरणानेंच वागेन. कोणतंही अधर्माचरण करणार नाहीं. धर्माला इंद्रिय-तृप्ति अनुरूप नाहीं. तो अधर्म आहे. इंद्रियतृप्ति म्हणजे पशुवृत्ति ! ईश्वरानं विवाहाची व्यवस्था करून दिली आहे ती कांहीं पशुवृत्तीसाठीं नव्हे ! पशुकोटींत विवाह होत नाहींतच. विवाह होत असतो तो केवळ धर्मासाठीं ! पूर्वीचे राजर्षि विशुद्धचरित्र झाल्याशिवाय केव्हांही सहधर्मिणीचा सहवास करीत नसत. इंद्रियांच्या आहारीं जाणं म्हणजे पाप ! तुम्ही निष्पाप मनानं, शुद्ध अंतःकरणानं, निःसंदेह होऊन माझ्याशीं बोलणं चालणं करायला ज्यावेळीं समर्थ व्हाल, त्याच वेळीं मी ही भगवीं वस्त्रें टाकून देईन—आणि जोंपर्यंत मी ही भगवीं वस्त्रं टाकलीं नाहींत तोंपर्यंत महाराज, तुम्ही माझ्यापासून वेगळ्या आसनावर बसायला हवं ! "

सीताराम म्हणाला, " मीं तुझा पति आहें—तुझा मालक आहें—तुला माझ्याच हुकमाप्रमाणें वागायला हवं ! "

" तुमच्या हुकमानं वागायला हवं खरं ? कारण तुम्ही बलवान आहां ! " श्री म्हणाली,—" पण माझ्याठायींही एक प्रकारचं बळ आहे. मीं रानावनांत भटकत होतें. तिथं कसल्या ना कसल्या तरी संकटांत पडायचा संभव होता. अशा संकटांत सापडलें असतां, त्यांतून सुटका व्हायची नाहीं असं वाट्टे त्यावेळीं स्वतःच्या रक्षणासाठीं मीं विष बाळगीत असें. माझ्यापाशीं विष आहे. तशीच जरूर पडली तर मीं विषप्राशन करीन ! "

ही श्री काय सीतारामाची श्री ? हिच्याचसाठीं काय तो इतकी वर्षें वाट पहात होता ?

८

सीतारामला तिची वृत्ति कळली. तरी पण ती कळून घ्यायला त्याचें मन तयार नव्हतें. ज्याची प्रेमाची व्यक्ती मरण पावते, तो त्या मृतदेहाशेजारीं

तसाच बसून राहातो. आतां या देहांत जीव नाहीं हें कांहीं काळ तरी त्याला पटत नाहीं. वेड्या झालेल्या किंग-लिअर-प्रमाणें तो आरसा शोधीत हिंडत असतो—त्या आरशावर श्वासोच्छ्वासाचा डाग पडतो कीं नाहीं तें पहाण्यासाठीं!

इतकीं वर्षेपर्यंत सीतारामनें आपल्या मनांत श्रीची एक मूर्ति उभारली होती. तिची तो आराधना करीत होता. बाहेरची श्री कशीही असो, त्याच्या अंतरींची श्री होती तशीच होती. बाहेरच्याच श्रीला सीतारामनें आपल्या हृदयाच्या सिंहासनावर बसवलें होतें. ती बाहेरची श्री तशीच बाहेर राहिली होती—तरी पण ती बाहेरची श्री हृदयांतल्या श्रीपेक्षां वेगळी कशी मानायची? ती श्री वेगळी आहे, हें सीतारामला कांहीं केल्या पटेना.

साधारणपणें लोकांचा विश्वास काय असेल तो असो! लोकांना वाटत असतें कीं माणूस जसा असतो तसाच राहतो. माणूस किती वेळ मरतो तें आम्हांला कळत नसतें. या एकाच देहांत तो किती वेळ पुनर्जन्म घेत असतो ह्याचा त्याला पत्ता लागत नसतो.

आपल्या ओळखीची जी श्री. ती मरून गेली, याच देहांत दुसऱ्याच एका श्रीचा आतां जन्म झाला आहे, याची जाणीव सीतारामला झाली नाहीं. ती जी माझी श्री, तीच ही श्री आहे, अशी कल्पना हृदयाशीं घट्ट धरून तो बसला होता. श्री त्याला इतक्या कडव्या भाषेंत कठोर बोलली, पण त्यानें तें कानीं घेतलें नाहीं. तें कानीं घ्यायची शक्तीच त्याच्याठायीं राहिली नव्हती. श्रीला सोडून देणें म्हणजे सर्व कांहीं सोडून देणें होय असें त्याला वाटत होतें.

श्री कांहीं केल्या राजपुरींत राहायला कबूल होईना, तेव्हां सीतारामनें 'चित्तविश्राम' नांवाचे एक छोटें आणि मनोरम प्रमोदभवन श्रीला राहाण्यासाठीं निर्दिष्ट करून दिलें. तिथें वाघाचें चामडें पसरून श्री बसून राहिली. राजा रोज तिला भेटण्यासाठीं जात असे. वेगळ्या आसनावर बसून तो तिच्याबरोबर कांहीं वेळ बोलीभाषण करून परत आपल्या वाड्यांत जाई. याचा परिणाम राजाच्या दृष्टीनें मोठा विषमय झाला.

हें बोलीभाषण तरी कशा प्रकारें होणार होतें? राजा दररोज आपल्या प्रेमाच्या गोष्टी बोलत होता. श्रीसाठीं इतके दिवस आपण कसे तळमळून काढले, कसें दुःख अनुभवलें, तें तो पुन्हांपुन्हां सांगत होता. श्रीशिवाय

आपल्या जीवनांत दुसरें कांहींच नाहीं, हेंच पुनः पुन्हां सांगत होता. श्रीच्या शोधांत किती लोक पाठवले, कोणकोणत्या देशांत पाठवले, त्यांनीं कुठेंकुठें तपास केला, तीच कथा तो सांगत होता.

आणि श्री काय बोलत होती ? डोंगरांच्या कथा, पर्वतांच्या कथा, अरण्यांच्या कथा, जंगलांतल्या पशूंच्या आणि पक्ष्यांच्या, त्याचप्रमाणें फळामुळांच्या कथा, कित्येक परमहंस आणि त्यागी ब्रह्मचारी यांच्या कथा, धर्माच्या कथा आणि अधर्माच्या कथा, कर्माच्या कथा आणि अकर्माच्या कथा—कित्येक पुराणांतल्या कित्येक मनोरंजक आणि उपदेशपर कथा, कित्येक देशी आणि विदेशी राजांच्या त्याचप्रमाणें देशाचार आणि लोकाचार यांच्या कथा ती सीतारामाला सांगत असे.

वेगळ्या आसनावर बसून त्या कथा ऐकणें राजाला मोठें कठीण जात होतें. तिच्या कथा मोठ्या मनोमोहक होत्या, त्याचप्रमाणें त्या कथा सांगणारी त्याहीपेक्षां मनोमोहिनी होती. आग तर पेटवली गेली होतीच, आतां घरही पेटलें होतें.

श्री पहिल्यापासूनच मनोमोहिनी होती. झाडाच्या फांदीवर उभी राहून पदर फडफडावीत तिनें लढवय्या वीरांना चेतवलें. त्या श्रीपेक्षांही आजची श्री रूपानें आणि गुणानें अधिक आकर्षक झाली होती. शरीराचें स्वास्थ्य असलें आणि मन शुद्ध असलें कीं सौंदर्यही वृद्धिंगत होतें. श्रीला शरीराचें स्वास्थ्य लाभलें होतें आणि मनाची शुद्धीही शतपटीनें वाढली होती, त्याचप्रमाणें तिचें सौंदर्यही शतपटीनें वाढलें होतें.

नुकतेंच पहाटेला उमललेलें फूल जसें पूर्णपणें स्वास्थ्यपूर्ण असतें, कुठें अपुष्ट नाहीं तसेंच अंगहीनही नाहीं, कुठें विवर्ण नाहीं, तसेंच विशुष्क नाहीं—सर्वतोपरी कोमल, संपूर्ण, शीतल, सुरम्य अशा त्या फुलासारखेंच श्रीचें शरीर सर्व दृष्टीनें संपूर्ण होतें. श्री म्हणजे निसर्गदेवीची मूर्तिमती शोभा होती.

तिचें चित्त प्रशांत होतें. तिनें इंद्रियेजय केला होता. तिला कसली काळजी नव्हती, वासना नव्हती—ती भक्तिमय झाली होती, प्रीतिमय आणि दयामय झाली होती. अर्थात तिच्या सौंदर्यांत कुठें विकार नव्हता—कुठें दुःखाची एवढीही

रेषा नव्हती, इंद्रियभोगाची यत्किंचितही छाया नव्हती. कुठें चिंतेचें एवढेंही लक्षण नव्हतें !

या सर्व दृष्टीनें सुमधुर, साहसी आणि सुखमय अशा भुवनेश्वरीच्या मूर्तीच्या तुलनेंत ती सिंहवाहिनी मूर्ति कुठें जाणवणार होती ?

नुसत्या दृश्यमूर्तीचाच हा प्रश्न नव्हता. तिचें भाषणही मोठें मनमोहक होतें. नाना देशांच्या, नाना विषयांच्या, नाना प्रकारच्या अश्रुतपूर्व कथा, केव्हां-केव्हां जिज्ञासा वाढवणाऱ्या, तर केव्हां मनोरंजक, तर केव्हां ज्ञानगर्भ—या सर्व प्रकारांचें मिश्रण झाल्यानंतर तें आकर्षण कोण टाळूं शकेल ? सीतारामच्या हृदयांत आज कित्येक दिवस आग पेटली होती—आतां त्याच्या घरानें पेट घेतला होता.

श्रीच्या पायीं सीतारामाचा सर्वनाश झाला.

पहिल्या पहिल्यानें सीताराम रोज संध्याकाळीं 'चित्तविश्रामां'त येत असे. प्रहरभर बोलत बसून नंतर निघून जात असे. हळूहळू वेळ वाढूं लागली. रात्र होऊं लागली. वेगळें आसन असलें तरी राजाला भूक किंवा झोंप यांची जाणीव होईपर्यंत तो तिथून निघत नसे.

यामुळें राजाला कष्ट होऊं लागले. अर्थात् त्यानें संध्याकाळचें जेवण आणि झोंपण्याची व्यवस्था 'चित्तविश्रामां'तच करण्याची योजना केली. हें जेवण आणि शयन वेगळ्या खोलींत होत असे. श्रीच्या व्याघ्रचर्माच्या जवळसुद्धां येणें त्याला अशक्य असे.

एवढ्यानेंही त्याची तृष्णा मिटेना. सकाळीं राजवाड्यांत परत जायला दिवसें-दिवस वेळ होऊं लागला. सकाळच्या वेळीं देखील थोडा वेळ श्रीबरोबर बोलत बसल्याशिवाय तो वाड्यांत जात नसे.

याही प्रकाराला हळूहळू उशीर लागूं लागला, तेव्हां त्यानें दुपारच्या जेवणाचीही व्यवस्था 'चित्तविश्रामां'तच करायचें ठरवलें. दुपारचें जेवण झाल्यावर तो थोडीशी वामकुक्षी करी आणि तिसऱ्या प्रहरीं राजकार्यासाठीं राजवाड्यांत जाई.

हळूहळू याही प्रकारांत बदल होऊं लागला. तिसऱ्या प्रहरीं जाणेंही केव्हां केव्हां बंद होऊं लागलें. ज्यावेळीं तो राजवाड्यांत जाई, त्यावेळीं उगीच

थोडा वेळ तिथें चक्कर मारून पुन्हां परत येई. 'चित्तविश्राम' सोडून बाहेर जास्त वेळ राहाणें त्याला अशक्य होई. इथवर शेवटीं मजल येऊन पोंचली होती. म्हणजे 'चित्तविश्राम' हेंच त्याचें राहाण्याचें स्थान झालें होतें. केव्हां केव्हां तो राजवाड्यांत जाऊन येत असे एवढेंच.

कितीही महत्त्वाचें काम असलें तरी कुणीही 'चित्तविश्रामां'त यायचें नाहीं असा सीतारामचा कडक हुकूम होता. 'चित्तविश्रामां'त प्रवेश करायला कीड-मुंगीही समर्थ होत नसे. याचा परिणाम असा झाला, कीं राजा सीताराम आणि राजकार्य यांचा परस्पर संबंध जवळ जवळ तुटून गेला.

९

महंमदपूरांत रामचांद आणि श्यामचांद या नांवाचे दोन एकमार्गी गृहस्थ होते. रामचांदच्या चंडीमंडपांत बसून संध्याकाळच्या वेळीं दोघेही गुडगुडी शिलगावून तिचे झुरके मारीत गप्पागोष्टी करीत असत. अर्थात् या गप्पागोष्टींत राजवाड्याचा उल्लेख येणें अवश्य होतें.

रामचांद म्हणाला, "असं पहा भैय्या, या 'चित्तविश्राम'ची अस्सल बातमी तुला कांहीं माहित आहे का?"

श्यामचांद म्हणाला, "काय सांगायचं दादा, साऱ्या राजेरजवाड्यांत हें असंच चालत आलंय. आम्हां गृहस्थांच्या घरांत देखील जर असंच होत असतं तर राजेरजवाड्यांच्या कारभारांत असं झालं तर त्यांत आश्चर्य कसलं? तरी पण आमचे महाराज तसे बरे आहेत. त्यांना दुसरा कसला नाद नाहीं. नाहीं म्हणायला हें एवढंच एक व्यंग आहे."

"तें तर खरंच!" रामचांद म्हणाला,—"तरीपण आमचे महाराज कांहीं इतर राजेरजवाड्यांसारखे नव्हत. मोठे धार्मिक आहेत—म्हणून मीं विचारलं. मीं असं म्हणतों, अजूनपर्यंत हे असले नाद त्यांना असल्याचं दिसून आलं नव्हतं."

श्यामचांद म्हणाला, "आपले राजे कांहीं तसे नाहींत. अन् लोक तर बोलताहेत! कुणी सांगावं माणसाचा स्वभाव कांहीं सदोदित सारखाच रहात

नाहीं. ऐश्वर्य वाढलं, संपत्ति वाढली, कीं माणसाचं मन देखील थोडं बहुत इकडे-तिकडे झुकूं लागतं. पूर्वी हें आमचं एक रामराज्य होतं, पण भूषणानगरी कबजांत आल्यापासून आतां तें पूर्वीच वातावरण राह्यलं आहे का ?"

"तें तर खरंच !" रामचांद म्हणाला, "पण मला आपलं असंच वाटतं, कीं हें चित्तविश्रामचं प्रकरण सुरू झाल्यापासून जरा अतिमात्रा झाली आहे खरी. महाराजांना वश करणं म्हणजे कांहीं सोपं काम नव्हतं. ही बेटी कांहीं अगदींच सामान्य दिसत नाहीं—ही कुठल्या आकाशांतूनच उडत आली आणि आतां अशी पकड घरून बसलीय ?"

श्यामचांद म्हणाला, "कुणी म्हणतात, कीं ती एक भैरवी आहे. कुणी म्हणतात, ती डाकिणी आहे. या डाकिणींना नाना प्रकारचीं कौटाळं माहित असतात. त्या आपल्या जादूच्या जोरावर भैरवीचा वेष घेऊन देखील फिरतात. तसंच कुणी कुणी म्हणतात, कीं तिच्याकडे एक जादूचं वाहन आहे. त्यांत बसून ती अदृश्य होऊन उडत जाते त्यामुळं अजून ती कुणाला दिसत नाहीं."

"तर मग मोठं कठीण प्रकरण आहे म्हणायचं !" रामचांद म्हणाला, "आतां राजे पडलेयत या डाकिणीच्या हातीं. आतां या राज्याची धडगत दिसत नाहीं."

"हें मात्र अगदीं खरं रे बाबा !" श्यामचांद म्हणाला, "राजा तर अलिकडे कारभार बघत नाहीं. सारी व्यवस्था पाहाताहेत तर्कालंकार ठाकूर. त्यांना लढाई-झगड्याची काय माहिती ? इकडे कुणी कुणी म्हणतात, कीं नबाबाची फौज लवकरच चालून येतेय."

रामचांद म्हणाला, "पण सेनापति मृण्मय तर आहे ना ?"

श्यामचांद म्हणाला, "आतां काय म्हणावं तुम्हांला दादा ? हें काय भलत्या माणसाचं काम आहे ? ज्याचं काम त्यालाच साजे, परक्याची लाठी वाजे. त्या गंगारामदासनं काय केलं तें पाह्यलंत ना ? कुणी सांगावं, आतां मृण्मय देखील तसंच कांहीं करणार नाहीं कशावरून ? तो जर मुसलमानांना सामील झाला तर आमचं काय होणार ? घरादाराची धूळधाण व्हायचा रंग दिसतोय."

"तें तर खरंच !" रामचांद म्हणाला, "एका मागून एक असे बाजूला पडायची सुरवात होऊं लागलीय. त्या दिवशीं तो तिलबघोष—इथून उठला आणि जेसोरला गेला. त्यावेळीं कां गेला तें मला कळलं नव्हतं. मीं त्याला विचारलं, कां जातोयस तिकडे ? तो म्हणाला, इथं सारे जिन्नस महाग झालेयत. आतांच आमच्या शेजारच्या कांहीं घरांतले लोक निघून बाहेर गांवीं जाऊं लागले आहेत."

श्यामचांद म्हणाला, "म्हणूनच तर दादा, तुला म्हणूनच सांगून ठेवतों—कुणापाशीं बोलूं नकोस—मीं सुद्धां इथून सटकणार आहें."

रामचांद म्हणाला, "तुझं बरोबर आहे. पण मीही इथून जाऊन पेंचांत कां पडूं ? कुठं तरी जावंसं वाटतंय खरं, पण मीं गरिब माणूस, आज एक घरदार उभारलं आहे, सामानसुमान केलं आहे, हें सारं असंच टाकून जायला माझ्यासारख्या गरिबाला फार कठीण जातंय."

"असं म्हणून कसं होईल ?" श्यामचांद म्हणाला, "आधीं आपला जीव, कीं आधीं घरदार ? देव करो, आमचं हें राज्य सुरक्षित राहो—तशी वेळ आली कीं परत येतां येईल. घरदार कांहीं कुठं पळून जात नाहीं !"

१०

श्री म्हणाली, "महाराज, तुम्हीं तर सदासर्वदा 'चित्तविश्रामां'त असतां, मग राज्यकारभार चालवतं कोण ?"

सीताराम म्हणाला, "माझं राज्य म्हणजे तूं ! नुसत्या तुझ्या सहवासांत जें सुख आहे तें राज्यांत का आहे ?"

श्री म्हणाली, "छे छे महाराज, एवढ्यासाठींच काय हिंदूंचं साम्राज्य प्रस्थापित करायला प्रवृत्त झालां ? माझ्याशीं तुलना करतांना हिंदुसाम्राज्य जर उणं ठरूं लागलं, धर्मभावना गेली, तर काय होईल ? सारं कांहीं मीच, असंच ना व्हायचं ? सीताराम राय ते हेच का ?"

"राज्याची स्थापना तर होऊन गेली आहे !" सीताराम म्हणाला.

"पण तें टिकलं पाहिजे ना ?" श्री म्हणाली.

सीताराम म्हणाला, "पण तें मोडून टाकील असा कोण आहे ?"

"तुम्हींच मोडतां आहांत," श्री म्हणाली, "राजाचं राज्य आणि विधवेचं ब्रह्मचर्य हीं दोन्हीही सारखींच. प्रयत्न करून राखलीं नाहींत तर टिकून राहाणार नाहींत."

सीताराम म्हणाला, "कां बरं ? या राज्याचं रक्षण होत नाहीं का ?"

"हें राज्य तुम्हीं राखतांहां का ?" श्रीनें विचारलें, "सदोदित तुम्हीं तर इथं माझ्याच आजूबाजूला असतां."

सीताराम म्हणाला, "मीं राजकार्य पहात नाहीं असं कांहीं नाहीं. बहुधा रोज मीं राजपुरींत जाऊन येत असतों. मीं एक घडीभर कारभार पाहून आलों तर दुसऱ्या कुणी सारा दिवस काम करण्यापेक्षांही अधिक काम होतें. शिवाय तर्कालंकार ठाकूर आहेत, मृण्मय आहे, ते सर्व आपआपल्या कामांत वाकबगार आहेत. जोपर्यंत ते आहेत आणि आपलीं कामं बजावताहेत, तोंपर्यंत मीं तिकडे पाहिलं नाहीं तरी चालण्याजोगं आहे."

"असं कसं म्हणतां ?" श्री म्हणाली, "अशी एक वेळ होती, कीं ते होते तरीही राज्य जायचा प्रसंग आला होता. सुदैवानं त्या रात्रीं तुम्ही येऊन पोंचलां नसतां तर राज्य गेलंच असतं. हा पूर्वीचा अनुभव असतांना आतां केवळ त्यांच्यावरच भार टाकून राहून कसं चालेल ?"

सीताराम म्हणाला, "मीं तर आहेंच. मीं कांहीं कुठं गेलों नाहीं. पुन्हां तसाच प्रसंग आला तर पुन्हां मीं माझ्या राज्याचं रक्षण करीन."

श्री म्हणाली, "जोपर्यंत तुम्ही अशी कल्पना करून राह्यलांहां, तोपर्यंत तुमच्या हातून कसलाच प्रयत्न व्हायचा नाहीं. प्रयत्नाखेरीज कोणतंही काम सफल होत नसतं"

"प्रयत्नांची कोणती उणीव दिसून आली तुला ?" सीतारामनें विचारलें.

श्री म्हणाली, "मीं आहें बायको माणूस. त्यांतून संन्यासी. राजकार्यांतलं मला काय कळतं ? तें कळल्याशिवाय मीं या प्रश्नाचं काय उत्तर देऊं ? तरी पण एका बाबतींत माझ्या मनांत मोठी शंका उत्पन्न झाली आहे. मुर्शिदाबादची कांहीं खबर मिळतेय का तुम्हांला ? तुरबखाँ गेला, भूषणा गेली, बारभाईंची जमीदारी गेली, तरीसुद्धां नबाब गप्प बसून राह्यला आहे का ?"

"त्याची काळजी करूं नकोस." सीताराम म्हणाला. "मुर्शिदकुली-खाँला जोपर्यंत मालखजिना दमडीदुगाणीनं मिळतो आहे, तोपर्यंत तो कांहींसुद्धां बोलणार नाहीं."

"पण तो मिळतो आहे का त्याला?" श्रीनें विचारलें.

सीताराम म्हणाला, "हो. तो पाठवायचा बंदोबस्त केला आहे खरा—पण यावेळीं तो दिला गेला नाहीं. इकडे बराचसा खर्च वाढलाय."

"तरीसुद्धां तो उगीच राहिला आहे का?" श्रीनें विचारलें.

सीतारामनें मान खालीं घातली. तो कांहीं वेळ स्तब्ध बसून राहिला होता. नंतर तो म्हणाला, "तो काय करील आणि काय करतो आहे, त्याबद्दलची खबरबात मला कांहींच कळली नाहीं."

श्री म्हणाली, "महाराज, काय चालवलंय हें? या चित्तविश्रामांत तुम्ही येऊन राहातां, त्यामुळं ही असली खबर काढायचं विसरून का गेलां?"

सीताराम चिंतामग्न होऊन म्हणाला, "असंच कांहींसं झालंय खरं. श्री, तुझ्या तोंडाकडे पाहिलं कीं मीं सारं कांहीं विसरून जातों."

श्री गंभीर होऊन म्हणाली, "तर मग ऐका, माझं एक मागणं आहे—हें माझं काळतोंड आतां कुठं तरी दृष्टीआड केल्याखेरीज गत्यंतर नाहीं. नाहीं तर सीताराम रायच्या नांवाला कलंक लागेल. नवीच स्थापन केलेलं धर्माचं राज्य उध्वस्त होऊन जाईल. मला आज्ञा द्या महाराज, मीं वनांत जातें."

सीताराम म्हणाला, "मीं अगदीं जिवावर उदार झालोंय्. मीं विचार करून पाहिलं, एक तुला तरी सोडलं पाहिजे किंवा राज्य तरी सोडलं पाहिजे—मीं राज्य सोडीन पण तुला सोडणार नाहीं."

"तर मग तसंच करा." श्री म्हणाली, "लायक माणसाच्या हातीं राज्य सोंपवा आणि संन्यास घेऊन माझ्याबरोबर चला. आपण वनवास पत्करूं."

सीताराम चिंताक्रांत होऊन बसला. त्याची भोगलालसा त्यावेळीं अत्यंत प्रबल झाली होती. कांहीं दिवसांपूर्वी त्याला श्रीनें असेंच सांगितलें असतें तर तो राज्य टाकून सहज निघाला असता. आतां तो सीताराम राहिला नव्हता. राज्यभोगाच्या ठायीं सीतारामची लालसा एकजीव होऊन गेली होती.

राज्यत्याग करणें सीतारामच्या करवीं घडलें नाहीं.

११

त्या सभास्थानांत रमा मूर्च्छित होऊन पडली आणि दासींनीं तिला उचलून आणून आंत ठेवलें तेव्हांपासून रमा वर उठली नाहीं. जिवावर उदार होऊन तिनें आपलें सतीचें नांव राखलें होतें. मान राखला खरा, पण प्राण राखला गेला नाहीं. तो आतां जाणार होता.

आतां रोगानें पाळें मुळें धरलीं होतीं. तसें पाहिलें तर राजाच्या राणीची चिकित्सा होऊन औषधोपचार व्हायला कांहींच उणीव नव्हती. पहिल्यापासूनच वैद्यराज येऊन पाहून जात होते. बरेच वैद्यराज राजवाड्यांत नोकरीला होते. त्यांना तसें विशेष काम नव्हतें. वाड्यांतल्या नोकरांना मधूनमधून गरमसाला खायला घालून आणि परिचारकांना पोस्तें देऊन ते कसेबसे रहात होते. त्यांना कुणी विचारीत नव्हतें. आतां छोटी राणी आजारी पडली तेव्हां वैद्यराजांना अर्थात महत्व आलें. ते बडे माणूस होऊन बसले.

राणीला कोणती विकृति झाली आहे हें ठरवण्याबद्दल जोरजोरानें चर्चा होऊं लागली. मूर्च्छा, वायू, आम्लपित्त, हृद्रोग वगैरे नानाप्रकारच्या रोगांची लक्षणें ऐकतांना वाड्यांतल्या राजपुरुषांचा जीव मेटाकुटीला आला. कुणी निदानाचा आधार देत होते, कुणी वाग्भट्टाचा, तर कुणी चरकसांहितेचा आधार देऊन चर्चा करीत होते; तर कुणी सुश्रुतांतले श्लोक म्हणून दाखवीत होते. तात्पर्य काय, कीं रोगाचें निदान झालें नाहीं.

वैद्यमंडळी नुसतीच ग्रंथांतील आधार देऊन चर्चा करीत स्वस्थ बसून राहिली होती असें नव्हे. ते नाना प्रकारच्या औषधांचीही योजना करीत होते. कुणी गोळ्या, कुणी भस्में, रसायनें, सिद्धघृतें आणि तेलें घेऊन येत होते. कुणी म्हणत, या रोगाचें औषध आयतें मिळणार नाहीं. नवीन बनविलें पाहिजे. कुणी म्हणत, रोगाचें औषध फक्त माझ्याकडेसच आहे. तसें दुसऱ्या कुठें मिळायचें नाहीं.

कसें का असेना, राजाचें घर, राणी आजारी पडलेली, औषधाची जरूर असो वा नसो, नवीन औषध तयार करणें अशक्य होतें असें नाहीं. नवीन औषधाचा घाट घातला तर चार लोकांना चार पैसे गांठीला लावतां येतील असें असल्यामुळें नवीन औषध तयार करायची धुमधाम सुरू झाली.

कुणी वेगवेगळ्या वनस्पति आणीत होते. त्यांचें कुटून चूण करीत होते. भट्ट्या लावीत होते. वेगवेगळीं रसायनें सिद्ध होत होतीं. तेलें आणि घृतें तयार करायचे कारखानेच सुरू झाले होते. राजवाड्यांतली एक दासी ती सारी धूमधाम पाहून एके दिवशीं म्हणाली, "राणी व्हायच्या पायीं आजारी पडलं तरी देखील भाग्य!"

जिच्यासाठीं औषधाची एवढी धूमधाम सुरू झाली होती, तिचा आणि औषधाचा प्रत्यक्ष संबंध क्वचितच येत होता. म्हणजे वैद्यराज औषधाची व्यवस्था करीत नव्हते असें नव्हे. त्याबाबतींत वैद्यांकडून थोडा सुद्धां हलगर्जीपणा होत नव्हता.

पण इथें दोष होता तो रमेचाच. ती कोणतेंच औषध घेत नव्हती आणि सारे प्रयत्न फुकट जात होते. आतां मुरलेच्या जागीं यमुना नांवाच्या एका दासीची राणीची मुख्य दासी म्हणून नेमणूक झालीं होती. यमुना ही बरीचशी प्रौढ असल्यामुळें नंदानें या जागीं तिची योजना केली होती. म्हणजे स्वतः यमुना आपण प्रौढ झालों आहों, असें म्हणायला तयार नव्हती. तरीपण तिची एकंदर चालचलणूक जुन्या जमान्यांतली होती. रमेची सुश्रूषा करण्याच्या बाबतींत ती फार काळजी घेत होती. तिच्या सेवेंत एवढी सुद्धां उणीव राहूं नये म्हणून ती जीव टाकून प्रयत्न करीत होती.

रमेसाठीं जें औषध वैद्यराज देऊन जात, तें पहिल्यानें यमुनेच्या हातीं येई. तें रमेला पाजायची जबाबदारी यमुनेवर होती. पण ती जबाबदारी पार पाडायची कशी? कांहीं केल्या रमा औषध घेत नव्हती.

इकडे रमेचा आजार कमी होत नव्हता, उलट वाढतच होता. आतां तिला माथें वर करणेंही कठीण जात होतें. ही सर्व परिस्थिति मोठ्या राणीच्या कानीं घातल्याखेरीज आतां दुसरा उपाय नाहीं असा विचार करून यमुना रमेला म्हणाली, "तुम्ही कांहीं माझं ऐकत नाहीं. मीं आतां थोरल्या राणीकडे जातें. त्याच येऊन तुम्हांला औषध पाजतील."

रमा म्हणाली, "बाई ग, मरणाच्या दारीं मीं उभी असतांना मला अशी कां छळतेस? हें पहा, आपण एक सौदा करूं. तूं आणतेस तीं हीं औषधं मला विकत देशील का? मीं एका वडीला एक एक रुपया देऊन तीं तुझ्यापासून विकत घेईन."

"हें काय म्हणतां?" यमुना म्हणाली. "तुमचंच औषध तुम्हाला विकायचं कसं?"

रमा म्हणाली, "मोबदला घेऊन त्या वडया तूं मला विकल्यास कीं तुझ्यावर कसलीच जबाबदारी राह्यची नाहीं. मीं तें औषध घेईन किंवा न घेईन, तुला कांहीं बोलायचं कारण राह्यचं नाहीं."

यमुनेनें कांहींवेळ विचार केला. तिला थोडीशीं अक्कल होती. तिनें आपल्याशीं विचार करून पाहिलें, 'ही तर आतां मरणारच. ही कांहीं जगत नाहीं. मग चार पैसे मला मिळताहेत, ते मी कां हातचे सोडूं?'

यमुना म्हणाली, "तर मग राणीसाहेब, तुम्हांला औषध घ्यायचं असेल तर द्या अन् त्याचा मोदबला द्या—बरं, घ्यायचं नसेल, तर माझ्यापाशीं तें नुसतं पडून राहाण्यांत काय फायदा? तुम्हींच तें घेऊन ठेवा कीं."

अशाप्रकारें त्यांनीं मांडिवाळ केली. यमुना पैसे घेऊन रमेला औषध विकत देऊं लागली. केव्हां केव्हां तें औषध रमा पिकदाणींत फेकून देई, तर केव्हां केव्हां उशीखालीं ठेवून देई. दुसऱ्या कुठें नेऊन ठेवायला तिला आतां ताकद राहिली नव्हती.

इकडे दिवसेंदिवस तिचा देह थकत चालला होता. नंदा रोज रमाला पाह्यला येई. घटका दोन घटका बसून तिच्याशीं बोलून चालून निघून जाई. तिच्यावर आतां मृत्यूची छाया पडूं लागली आहे हें नंदाला दिसून येत होतें. ही मृत्यूची छाया कुणाच्यापायीं? नंदाला वाटलें, कीं राजवाड्यांतल्या वैद्यराजावर देखील त्या डाकिणीनें आपली छाप टाकली का?

एके दिवशीं नंदानें साऱ्या वैद्यांना बोलावून घेतलें. चिकाच्या पडद्याआड बसून नंदानें साऱ्या वैद्यराजांची कडक भाषेनें निर्भत्सना केली. शेवटीं ती म्हणाली, "हा रोग जर तुम्हांला बरा करतां येत नाहीं तर दरमहाच्या दरमहा पगार घेतांहां कशाला?"

एक वृद्ध वैद्य पुढें सरसावले आणि म्हणाले, "मासाहेब, वैद्य औषध देईल—परमायु देणं कांहीं त्याच्या हातीं नाहीं."

नंदा म्हणाली, "आम्हांला आतां कांही औषध नको आहे आणि वैद्यही नको आहे. तुम्ही आपआपल्या गांवीं निघून जा."

तें ऐकून सारी वैद्यमंडळी हताश झाली. तो वृद्ध वैद्य मोठा बुद्धिवान् होता. तो म्हणाला, "मासाहेब, आमचंच दैव खोटं म्हणून हें असं होतंय. नाहींपेक्षां आम्ही जें औषध देतों आहोंत तें साक्षात धन्वंतरीचं औषध होय. आतां आमच्या हातीं एवढंच आहे, तीन दिवसांत आम्ही आजार हटवून दाखवतों, पण एका बाबतींत आपण आम्हांला अभय दिलं पाहिजे."

नंदानें विचारलें, "काय पाहिजे तुम्हाला ?"

वैद्यराज म्हणाले, "मी स्वतः माझ्या नजरेसमोर औषध घ्यायला लावीन. तशी व्यवस्था आपण करा."

म्हाताऱ्याची खात्री होती, कीं ही बेटी औषध घेत नाहीं. माझें औषध घेतलें तर रोगी बरा होत नाहीं म्हणजे काय ?

नंदानें त्याची मागणी कबूल केली आणि त्यांना निरोप दिला.

त्यानंतर नंदा रमेपाशीं आली आणि वैद्यराजांबरोबर झालेल्या साऱ्या भाषणाची हकिकत तिनें तिला सांगितली. रमा उगीच थोडीशी हंसली. तोंड भरून हंसायची शक्ति तिला आतां होती कुठें ? आणि तिच्या त्या आतां इवल्याशा झालेल्या मुखावर हंसू दिसणार होतें तरी कसें ?

नंदानें विचारलें "हंसलीसशी ?"

पुन्हां तसेंच हंसून रमा म्हणाली, "मीं औषध घेणार नाहीं."

नंदा म्हणाली, "घे ग बाई, इतके दिवस औषध घेत आलीस तर आतां तीन दिवस त्यांच्या नजरेसमोर औषध घ्यायला काय हरकत आहे ?"

"मीं औषध कधीं घेतलंच नाहीं !" रमा म्हणाली.

नंदा दचकली. ती म्हणाली, "म्हणतेस काय ? औषध कधीं घेतलंच नाहींस ?"

रमा म्हणाली, "सारीं औषधं हीं पहा उशीखालीं आहेत."

नंदानें उशी वर करून पाहिली. औषधें तिथेंच होतीं. नंदानें तिला विचारलें, "हें काय ग—अशी जीव द्यायला कां उठलीस ? आतां आणखी काय झालंय ? तें प्रकरण मिटलं ना ?"

रमा म्हणाली, "त्याचं कांहीं नाहीं. आतां मीं औषध घेईन."

"आतां केव्हां औषध घेणार आहेस ?" नंदानें विचारलें.

रमा म्हणाली, "राजे जेव्हां मला पाह्यला येतील तेव्हां."

रमेच्या डोळ्यांतून झरझर आसवें वाहूं लागलीं. नंदाचे डोळेही ओले झाले. सीताराम रमेला पाह्यलासुद्धां येत नाहीं ना?

सीताराम 'चित्तविश्रामां'तच राहिला होता. तो नंदाला तरी कुठें भेटत होता?

डोळे पुसून घेऊन नंदा म्हणाली, "आतां आले कीं तुला भेटायला येतील."

१२

'आतां आले कीं तुला भेटायला येतील!' असें सांगून नंदा रमाला आशा देऊन आली होती. त्या आशेच्या जोरावर रमा कशीबशी जीव धरून राह्यली होती. पण तिनें वाट किती पाह्यची?

नंदा तिला आशा देऊन आल्यापासून ती जपमाळ घरून बसली होती. ते भेटले कीं त्यांना धरून रमेकडे न्यायचें, असें तिनें ठरवलें होतें, पण ते कांहीं सांपडत नव्हते. कधीं सांपडलेच तर 'आज नको—उद्यां' असें म्हणून ते निघून जात असत.

कांहीं झालें तरी सीतारामवर राग धरायचा नाहीं अशी नंदानें मनांतल्या मनांत प्रतिज्ञा केली होती. ती म्हणे, राजाला या डाकिणीनें पछाडलें आहे खरें, पण म्हणून आपल्याला सुद्धां भूत झपाटूं नये याची खबरदारी ती घेत होती. राजाचें भूत मानगुटीला बसलें तर मग त्याच्यापासून तिला सोडवणार होतें कोण? अर्थात् नंदानें सीतारामचा राग धरला नाहीं. आपलें ठरलेलें कामकाज ती जीव लावून करीत राहिली होती.

पण डाकिणीवर मात्र तिचा भयंकर राग झाला होता. डाकिणी म्हणजेच श्री, हें नंदाला माहित नव्हतें—सीतारामखेरीज तें कुणालाच माहित नव्हतें. तिचा पत्ता काढण्यासाठीं नंदानें बरेच वेळां माणसें पाठवलीं, पण सीतारामच्या परवानगीशिवाय 'चित्तविश्रामां'त प्रवेश करायला चिलट सुद्धां समर्थ होत नव्हतें. अर्थात् तिचे ते प्रयत्न फुकट गेले.

गांवांत मात्र भलभलत्या भुमका उठत होत्या. 'चित्तविश्रामां 'तील डाकिण दिवसाच्या वेळीं अतिशय सुंदर मानवरूप धारण करून घरांत वावरत असते. रात्रीच्या वेळीं ती कोल्हीचें रूप धारण करून स्मशाना-स्मशानांतून फिरत नरमांस भक्षण करते.

अशा कितीतरी भुमका उठत होत्या. त्या नंदाच्या कानीं गेल्या तेव्हां ती घाबरली. चंद्रचूड ठाकूरांपाशीं जाऊन तिनें तें सांगितलें. चंद्रचूड ठाकूरांनी एका उत्तम तंत्र जाणणाऱ्या ब्राह्मणाला शोधून काढून डाकिणीच्या पकडींतून राजाची सुटका करून घेण्यासाठीं तांत्रिक यज्ञ घडवून आणला, पण कांहीं केलें तरी डाकिणीचें निवारण झालें नाहीं.

शेवटीं एक जबरदस्त तांत्रिक पंचाक्षरी सांपडला. तो म्हणाला, "मनुष्याच्या हातून या बाबतींत कांहीं होणें शक्य नाहीं. ही अशीतशी सामान्य नाहीं. ही आहे कैलासांत रहाणारी. साक्षात् भवानीची सहचरी. तिचं नांव आहे विशालाक्षी. रुद्राच्या शापामुळें ती कांहीं कालपर्यंत मनुष्याच्या सहवासासाठीं आली आहे. तो शापाचा काल संपला म्हणजे ती आपोआप निघून जाईल."

त्या पंचाक्षऱ्याचें तें निदान ऐकून चंद्रचूड आणि नंदा हताश झालीं. आतां कांहीं उपायच राहिला नव्हता, तरीही नंदा म्हणाली, "भवानीची सहचरी असो, कीं त्याहूनही कोणी मोठी असो, ती जर मला सांपडली तर नखांनीं ओरबाडून तिचं माथं चिरीन."

सीताराम राजधानींत आला म्हणजे मधून मधून नंदाला भेटत असे. या प्रत्येक भेटीच्या वेळीं नंदा सीतारामला रमेबद्दल सांगे आणि म्हणे, "रमा फार हळवी झाली आहे—खचली आहे. एकदां जाऊन तिला पाहून या."

सीताराम जातों म्हणे पण जात नसे. एके दिवशीं नंदानें जोर करून त्याल धरून ठेवलें आणि म्हटलें, "आज चलाच तिला पाह्यला. आज गेलां नाहींत तर या जन्मीं कांहीं तिची भेट होणार नाहीं."

शेवटीं सीताराम रमेला भेटायला गेला. सीतारामला पाहतांच रमा सारखी रडत सुटली. ती कोणत्याही प्रकारें सीतारामला टाकून बोलली नाहीं—नव्हे, ती कांहीं बोललीच नाहीं. तिला बोलायला त्राण राहिलें नव्हतें.

तिला पाहून सीतारामला कांहीं अनुताप झाला कीं नाहीं तें सांगतां आलें नसतें. सीतारामनें मोठ्या मायाळूपणानें बोलून तिला लवकरच बरें वाटेल अशी

आशा दाखवली. तो बोलूं लागला तसतशी रमा प्रफुल्लीत झाली. हळूहळू हंसूं लागली. काय तें हंसणें !

तिचे हंसणें पाहतांच सीताराम साशंक झाला. त्याला वाटलें, आतां फार वेळ जाणार नाहीं.

सीताराम जाऊन तिच्या पलंगावर बसला. तितक्यांत रमेचा मुलगा आला. त्याला पाहतांच रमेच्या डोळ्यांना पाणी आलें. तें पाहून तो मुलगाही रडूं लागला. रमेनें पहिल्यानें खुणेनें आणि नंतर अगदीं ओढलेल्या आवाजांत म्हटलें, " याला एकदां उचलून घ्या. "

सीतारामनें मुलाला उचलून हृदयाशीं कवटाळलें. तें पाहून रमा केविलवाण्या आवाजांत कसाबसा जिवाचा आटापिटा करून ओढत्या वाणीनें म्हणाली, " आईच्या आपराधासाठीं मुलाचा त्याग करूं नका, एवढंच माझं तुमच्यापाशीं शेवटचं मागणं आहे. थोरल्या राणीच्या हातीं याला सोंपवून जावं असं एकदां मला वाटलं होतं—पण आतां तुम्ही आलां, तेव्हां आतां तुमच्या हातीं ठेवून जातें आहें. एवढा माझा शब्द राखाल ना ? "

कळसूत्री बाहुलीप्रमाणें सीतारामनें होकार दिला.

रमेनें सीतारामला खूण करून अगदीं आपल्याजवळ बसायला सांगितलें. सीताराम येऊन तिच्या अगदीं जवळ बसला. तेव्हां रमेनें त्याच्या पायाला हात लावून त्याची पायधूळ घेऊन आपल्या मस्तकाला लावली. मोठ्या कष्टानें ती म्हणाली, " आतां या जन्मापुरता निरोप घेतें. जन्मांतरीं मी तुमचीच होईन असा मला आशिर्वाद द्या. "

त्यानंतर तिची वाचा गेली. जोरजोरानें श्वास वाहूं लागला. डोळ्यांतली ज्योत गेली. चेहऱ्यावर आलेली काळी छाया अधिकच काळवंडूं लागली.

शेवटीं साराच काळोख झाला. साऱ्या यातना थंडावल्या. रमा निघून गेली.

१३

ज्या दिवशीं रमा मरण पावली त्या दिवशीं सीताराम 'चित्तविश्रामां'त गेला नाहीं. तो अजून तितका निष्ठुर झाला नव्हता. ज्यावेळीं तो राजा नव्हता, श्रीची आणि त्याची पुन्हां भेट झाली नव्हती, त्यावेळीं रमेवर त्याचें फारच

म. प्रां. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
हा. क. ३६४५ नों. दि.
वि. का. वा. क्र. .....

प्रेम होतें. नंदेपेक्षांही रमेला तो जीव कीं प्राण करीत असे. तें प्रेम आतां गेलें होतें. तें कशामुळें गेलें याचा विचार यापूर्वी त्यानें केव्हांच केला नव्हता.

आज त्याचा विचार करावा असें त्याला वाटलें. त्यानें आपल्या मनाचा ठाव घेतला—रमा फारशी दोषी नव्हती—दोष होता तो त्याचाच. मनांतल्या मनांत तो स्वतःवरच चिडला.

त्याची वृत्ति अगदीं बिघडून गेली होती. मन पुन्हां प्रफुल्ल व्हावें म्हणून श्रीपाशीं जावें असें देखील त्याला वाटलें नाहीं. कारण त्याच्या या आत्मग्लानीचा संबंध श्रीपाशींच होता. रमेच्या बाबतींत त्यानें जें निष्ठूर आचरण केलें त्याला कारण श्रीच होती. तो श्रीपाशीं गेला असता तर त्याच्या अंतरांतल्या आगीनें अधिकच पेट घेतला असता.

म्हणून तो श्रीपाशीं न जातां नंदाकडे गेला. नंदानें त्या दिवशीं एक मोठी चूक केली. नंदा त्या दिवशी चिडली होती. डाकिणी असो कीं मानवी असो, त्या कुठल्या पापिष्ठेच्या नादीं लागून राजा नंदाची अवहेलना करीत होता, पण तिनें त्याबद्दल आजवर कधीं राग केला नव्हता. तरीही रमेची अशा रितीनें अवहेलना केली, त्यामुळें रमा मेली, या जाणीवेनें नंदा राजावर चिडून उठली होती. आजवर आवरून धरलेलें मन आज अनावर झालें होतें. ती तशी फारशी बोलली नव्हती, पण आज तिला झाली गेलेली परिस्थिति लपवून ठेवतां आली नाहीं.

रमाची गोष्ट निघाली तेव्हां नंदा म्हणाली, "महाराज, रमेच्या मृत्यूला जबाबदार तुम्हीच!"

रमेनें आपला राग आवरला नाहीं तो एवढेंच बोलण्यासाठीं. पण त्यानेंच आग भडकली. इन्धन तयार होतें. आत्मग्लानीमुळें सीतारामची वृत्ति बिघडून गेली होती. कांहींतरी करून आपल्या गुन्ह्याची सफाई करण्याचा तो प्रयत्न करूं पहात होता, तोंच नंदानें त्याला हा बो वर्मी डाग दिला तो त्याला फारच जाणवला.

'महाराज, रमेच्या मृत्यूला जबाबदार तुम्हींच!' हे नंदाच्या तोंडचे शब्द ऐकतांच राजा एकदम भडकला. तो गर्जना करून म्हणाला, "फार छान! मीच आहें तुम्हां लोकांच्या मृत्यूला जबाबदार! मीं जिवावर उदार होऊन

प्रयत्न केले. माझ्या रक्तानें पृथ्वी भिजवली आणि तुम्हां लोकांना राणीची पदवी दिली, त्याचे छान उपकार फेडलेत ! आतां मींच तुमच्या मृत्यूला जबाबदार आहें असं तुम्हीं म्हणायचं नाहीं तर काय म्हणायचं ? गंगारामला बोलावून रमेनं माझा जीव घ्यायचा घाट घातला होता, त्यावेळीं कुठं, काय, कोण, कुणाला बोललं ? "

राजा रागारागानें अंतःपुरांतून बाहेर निघून गेला. तिथें चंद्रचूड ठाकूर होते. रमेच्या मृत्यूमुळें राजा शोकाकूल झाला आहे असें वाटून त्याचें सांत्वन करण्यासाठीं ते कळवळून बोलत होते. राजा आंतून कढईत सळसळणाऱ्या तेलासारखा जळजळत होता. त्यानें चंद्रचूडांना कांहींच उत्तर दिलें नाहीं.

चंद्रचूड ठाकूरानींही एक चूक केली. त्यांना वाटलें, रमेच्या मृत्यूमुळें राजाला यावेळीं अनुताप झाला आहे. अशा वेळीं चार शब्द सांगितले आणि त्या डाकिणीवरून त्याचें मन उडेल असा कांहीं प्रयत्न केला तर त्याचा परिणाम होईल, असा विचार मनांत आणून प्रस्ताव करण्यासाठीं म्हणून ते म्हणाले, " महाराज, आपण जर छोट्या राणीकडे थोडं अधिक लक्ष दिलं असतं तर ती खात्रीनं बरी झाली असती."

जळत्या आगींत ही फुंकर मारली गेली. आतांपर्यंत स्वस्थ राहिलेला राजा एकदम भडकला आणि म्हणाला " तुम्हांलाही असंच वाटतं का ? छोट्या राणीच्या मृत्यूला मींच कारणीभूत झालों असं तुम्हींही म्हणतां का ?"

चंद्रचूडांना तसेंच वाटत होतें. यावेळीं राजाकडे ही गोष्ट स्पष्टपणें बोलणें अवश्य आहे असें त्यांना वाटलें. कुणी तरी दोष दाखवून दिल्याशिवाय कुणाचेंही चरित्र दुरुस्त होत नाहीं. आपण सीतारामचा गुरू, त्याचा मंत्रि, आपणच जर हें सांगायचें धाडस केलें नाहीं तर कोण करील ?

अतएव चंद्रचूड म्हणाले, " असं एक प्रकारें म्हणतां येईल खरं. "

राजा म्हणाला, " असं ना ? मग बोला तर—मला स्पष्टपणें सांगा, मीं जर लोकांच्या मृत्यूचीच कामना करीत बसलों असतों तर या राज्यांत एकही माणूस जिवंत राह्यला असता का ? "

" आपण कुणाच्या मृत्यूची कामना केली असं कांहीं मीं म्हणत नाहीं. " चंद्रचूड म्हणाले, " प्रत्यक्ष कुणाची मृत्यूची कामना केली नाहीं तरीही ज्या

व्यक्तीच्या रक्षणाचा भार तुमच्यावर आहे तिची तुम्ही काळजी घेतली नाहीं. कांहीं उपाय केला नाहीं, त्यामुळेंच ती मृत्यू पावली. नुसती छोटी राणीच का, तुम्ही राज्यकारभाराकडे जें दुर्लक्ष केलं आहे त्यापायीं सारं राज्यच जायची वेळ आलीय. केव्हां तरी हें तुम्हांला मीं सांगूं पहात होतों, भेटायचा प्रयत्न करीत होतों, पण तुम्हांला भेटायला सवडच होत नव्हती त्यामुळं मला बोलतां आलं नव्हतं."

राजा मनातल्या मनांत म्हणाला. 'सारेच बेटे म्हणताहेत मीं राज्य कारभाराकडे दुर्लक्ष केलं. मग हे लोक आहेत कशासाठीं ?' तो उघड म्हणाला "राज्यकारभाराकडे दुर्लक्ष होय, मग आपण सारे काय करीत असतां ?"

"जें कांहीं करतां येणं शक्य आहे तेवढें करीत असतों," चंद्रचूड म्हणाले, "तरी पण आम्ही म्हणजे कांहीं राजा नव्हे ! राजाच्या हुकूमाशिवाय ज्या गोष्टी होत नाहींत त्या करणं आम्हांला अशक्य होतं. माझं मागणं एवढंच, कीं उद्यां सकाळीं एकदां आपण दरबारांत बसा, मीं कागदपत्र दाखवतों, सारं कांहीं खुलासा करून सांगतों, आपण राजाज्ञा द्यायची तेवढी द्या."

राजा मनांतल्या मनांत म्हणाला, 'तुमच्या गुरुगिरीची मजल बरीच पुढें गेलेली दिसतेय. तुम्हांलाही थोडं शिकवावं असं वाटतंय मला !' तो उघड म्हणाला, "त्याचा विचार करतां येईल."

चंद्रचूडच्या या भाषणामुळें राजाच्या सर्वांगाचा भडका उडाला होता केवळ ते गुरू होते म्हणूनच त्यांना अधिक कांहीं बोलण्याचा त्याला धीर झाला नाहीं.

त्या दिवशीं सारी रात्र तो रागानें सळसळत होता. त्याला झोंप लागली नाहीं. चंद्रचूडांना कशी अद्दल लावावी याचाच तो विचार करीत होता.

त्या दिवशीं पहांटेंच उठून नित्यकृत्य संपवून तो दरबारला आला. चंद्रचूडांनीं खातेंपत्रांच्या राशी आणून त्याच्यासमोर रचल्या.

१४

चंद्रचूडांना राजाला जें सांगायचें होतें तें हेंच.—एवढें मोठें राज्य असो, कीं एवढा मोठा राजा असो, पैसा नसला तर कोणतेंही राज्य चालत नाहीं.

पैशाशिवाय सामान्य माणसाचा जसा संसार चालत नाहीं, तसा राज्याचा बडा संसारही पैशाशिवाय चालत नाहीं. पैशाच्या अभावीं एवढें मोठें रोमचें राज्य पण तेंही कोसळलें. प्राचीन संस्कृति काळोखांत गेली. सीतारामच्या राज्यांत आज पैशाचा अभाव जाणवत होता.

सीतारामच्या राज्यांत पैशाचा तुटवडा पडण्याची जरूरी नव्हती, कारण त्याच्या राज्यांतली आवक फार मोठ्या प्रमाणांत वाढली होती. भूषणेचा फौजदारी ईलाखा त्यांच्या हातीं आला होता. बारा भूमियांची जमिदारी त्याच्या सत्तेखालीं आली होती. त्याच्या ताब्यांत या प्रदेशाच्या बाबतींतला जो कर त्यांनीं दिल्लीच्या बादशहाला द्यायचा होता, तो वसूल करून पाठवण्याची जबाबदारी आतां सीतारामवर आली होती. या वसूलीपैकीं एक कवडीसुद्धां सीतारामनें मुर्शिदाबादला पाठवली नव्हती. जीं कांहीं वसुली झाली ती त्यानें स्वतःच्या तिजोरींत टाकली होती.

असें जर होतें तर पैशाचा तुटवडा कां पडला ? कुणाचीही आवक वाढली कीं तुटवड्याची जाणीव होते. कारण आवकीबरोबरच खर्चही वाढत असतो. भूषणा ताब्यांत घेण्यासाठीं बराच खर्च झाला होता. बारा भूमियांना ताब्यांत ठेवण्यासाठींही असाच खर्च झाला होता. परचक्राचें केव्हां आक्रमण होईल याचीं खात्री नसल्यामुळें आतां बरीच मोठी फौज उभी ठेवावी लागली होती, त्यासाठीं खर्च करावा लागला होता. राज्याभिषेकाच्या पायीही बराच पैसा खर्चीं पडला होता. अतएव जितका आय, तितकाच व्ययही मोठा होता.

आवक वाढली आणि त्यामुळें तितकाच खर्चेही वाढला, तरी तुटवडा पडतां कामा नये. तुटवड्याचें खरें कारण होतें—चोरी. राजा अलिकडे कारभाराकडे लक्ष देत नव्हता. 'चित्तविश्रामां'त पडून राहिला होता. त्यामुळें राजाचे नोकर खजिन्यांतला पैसा लांबवून आपापल्या परीनें तो घशाखालीं घालीत होते. त्यांना अडथळा करायचा कुणी ?

चंद्रचूड ठाकूर या बाबतींत लक्ष घालून निषेध करीत होते, पण त्यांचा निषेध कुणी मानीत नव्हतें. कांहीं कांहीं अधिकारी लोकांनीं केलेल्या चोऱ्या चंद्रचूडांनीं पकडल्या होत्या. राजा दरबारांत येईल त्यावेळीं या चोऱ्यांचे सारे पुरावे त्याच्यापुढें मांडायचे असें त्यांनीं ठरवलें होतें.—

पण राजाच सांपडत नव्हता. काय काम असेल तें तुम्हींच पहा असें सांगून कशीबशी वेळ मारून नेऊन तो चित्तविश्रामांत निघून जात होता.

चंद्रचूड हताश झाले. शेवटीं त्यांनीं कांहींजणांच्या बडतर्फीचे हुकूम सोडले. ते हुकूम हातीं पडतांच त्या लोकांनीं तो प्रकार हंसण्यावारी नेला आणि म्हटलें, " ठाकूर, श्रुतिस्मृतिंतले आधार हवे असतील त्यावेळीं आम्हीं आपलं म्हणणं ऐकूं. राजाच्या सहीशिक्क्याचा हुकूम दाखवा नाहींतर खुशाल घरीं बसून स्नानसंध्या करा. "

राजाचा सहीशिक्का मिळवणें कठीण नव्हतें. अलीकडे राजाच्या पुढें कुठलाही कागद धरला तरी तो त्याच्यावर सही करीत असे. वाचून पाह्यला त्याला वेळ होता कुठें ! तो ' चित्तविश्रामां'त जाण्याच्या घाईंत असे. चंद्रचूडांनींही या अपराधी लोकांच्या बडतर्फी हुकूमावर राजाची सही घेतली. कांहीं न वाचतां राजानें सही केली होती.

पण त्यामुळें चंद्रचूडांचें काम व्हावें तसें झालें नाहीं. या प्रकरणांतील मुख्य गुन्हेगार जो खजिनदार तो दरबारांत हजर होता. राजानें न वाचतां सही केली हे त्यानें पाहिलें होतें. राजा निघून गेल्यावर तो म्हणाला, " हा हुकूम मीं मानीत नाहीं. तो हुकूम आहे तुमचा—राजाचा नव्हे. राजानं कागद वाचून सुद्धां पाहिला नाहीं. राजा स्वतः आमची चौकशी करून ज्यावेळीं आम्हांला बडतर्फ करील त्याचवेळीं आम्हीं जाऊं—नाहीं तर नाहीं "

शेवटीं कोणीही गेले नाहींत. चोऱ्या वाढूं लागल्या. खजिना त्यांच्या हातीं होता, त्यामुळें चंद्रचूडांना कांहींच करतां आलें नाहीं.

म्हणून आज चंद्रचूडांनीं राजाला धरून ठेवल हातें. राजा येऊन दरबारांत बसल्यावर सर्व गुन्हेगार लोकांच्या समक्ष चंद्रचूडानीं सारे कागदपत्र राजाला समजावून सांगितले. राजा आधींच साऱ्या जणांवर चिडून उठला होता; त्यांत या अशा चोऱ्या वाढत असल्याचें पाहून त्याचा राग भडकला आणि त्याचें मस्तक ठिकाणावर राहिलें नाहीं. सर्व गुन्हेगारांना एकदम सुळीं द्या, असा त्यानें हुकूम सोडला.

तो हुकूम ऐकतांच दरबारांतील सारे लोक घाबरून गेले. चंद्रचूडांना तर आकाश फाटल्यासारखें वाटलें. ते म्हणाले " हें काय महाराज ? एवढ्याशा गुन्ह्यासाठीं एवढी मोठी जबर शिक्षा ? "

ग्रंथालय
अनुक्रम २९८२
विभाग वा.वा.
क्रमांक १९९६

राजा रागानें बेभान होऊन म्हणाला, "हा एवढासा गुन्हा काय ? या चोरांना सुळींच दिलं पाहिजे."

चंद्रचूड म्हणाले, "यांच्यांत कांहीजण ब्राह्मण आहेत, त्यांना सुळीं दिलं तर ब्रह्महत्येचं पाप लागेल. तें पाप करायचं का ?"

राजा म्हणाला, "ब्राह्मणांचे नाककान कापा आणि त्यांच्या कपाळावर 'चोर' असा तापलेल्या लोखंडानं शिक्का मारा. बाकीच्या साऱ्यांना सुळीं द्या."

असा हा हुकूम देऊन राजा 'चित्तविश्रामांत' निघून गेला.

राजाच्या हुकमाप्रमाणें गुन्हेगारांना शिक्षा देण्यांत आली. साऱ्या नगरांत हाहाःकार उडाला. पुष्कळसे सरकारी नोकर काम सोडून पळून गेले.

१५

चोरी बंद झाली खरी, पण पैशाची उणीव कांहीं भरून निघाली नाहीं. राज्याच्या व्यवस्थेच्या बाबतींत राजाला समजावून सांगणें अत्यंत जरुरीचें होतें. पण राजाची आधीं भेट होत नव्हती. आणि झाली तर तो ऐकून घ्यायला तयार नव्हता.

चंद्रचूड सारखे संधि पाहायचा प्रयत्न करीत होते. एके दिवशीं त्यांनीं राजाला पकडलें आणि म्हटलें, "महाराज, एकदां माझं ऐकून घ्या. नाहींतर हें राज्य शाबूत राहायचं लक्षण दिसत नाहीं."

राजा म्हणाला, "राह्यलं तर राह्यलं—गेलं तर गेलं. बरं आतां सांगा—काय झालंय ?"

चंद्रचूड म्हणाले, "सारे शिपाई टोळ्याटोळ्यांनीं निघून जाताहेत."

"कां जाताहेत ?" राजानें विचारलें.

"त्यांना पगार मिळत नाहीं."

"त्यांना पगार कां मिळत नाहीं ?"

"तिजोरींत पैसा नाहीं."

राजानें विचारलें, "अजूनही चोऱ्या चालल्याच आहेत का ?"

"नाहीं—चोऱ्या बंद झाल्या आहेत. पण त्यानं काय होतं ? चोरांनीं जो पैसा गिळला तो कांहीं आतां परत मिळणं शक्य नाहीं."

राजा म्हणाला, "बरं, रयतेकडून तहसील वसूल होत नाहीं का?"

"एक पैसा सुद्धां नाहीं!"

"याचं कारण काय?"

चंद्रचूड म्हणाले, "ज्यांच्यावर तहसील वसूल करायची जबाबदारी आहे, ते म्हणतात—म्हणजे त्यांतले कांहींजण म्हणतात—कीं वसुली केली आणि शेवटीं हिशेबांत घोटाळा झाल्याचं दिसून आलं तर सुळीं जावं लागतं ना? मग वसुली करा कशाला?"

"तर मग त्यांना एकदम बडतर्फ करा." राजा म्हणाला.

चंद्रचूड म्हणाले, "नवे लोक कुठून मिळवायचे? आणि नव्या लोकांच्या हातून वसुलीचं आणि जमाखर्चाचं काम होईल कसं?"

"तर मग त्यांना एकदम कैद करा." राजा म्हणाला.

चंद्रचूड म्हणाले, "मग सर्वनाशच म्हणायचा! त्यांना कैद केलं तर वसुली आणि जमाखर्च करणार कोण?"

राजा म्हणाला, "पंधरा दिवसांच्या आंत जो सारी थकबाकी रुजू करणार नाहीं त्याला कैद करा."

"साऱ्याच तहसीलदारांचा कांहीं दोष नाहीं." चंद्रचूड म्हणाले, "बरेचसे देणेदार मात्र देत नाहींत."

"कां देत नाहींत?"

चंद्रचूड म्हणाले, "ते म्हणतात, मुसलमानांचं राज्य झालं तर देऊं! आतां थकबाकी दिली तर पुन्हा मुसलमान आल्यावर ती दुसऱ्यांदा द्यावी लागेल."

राजा म्हणाला, "जे पैसा देणार नाहींत, ज्यांची बाकी चुकती होणार नाहीं, त्या सर्वांना एकदम कैद करा."

चन्द्रचूड थक्क होऊन नुसते पहात राहिले. शेवटीं ते म्हणाले, "महाराज, तुरुंगात एवढी जागा आहे कुठं?"

राजा म्हणाला, "तर मग मोठ्यामोठ्या नव्या कोठड्या बांधा." असें म्हणून बाकीदार आणि तहशीलदार या दोघांनाहीं कैद करण्याच्या हुकमावर सही करून राजा 'चित्तविश्रामां'त निघून गेला.

चन्द्रचूडांनीं मनांतल्या मनांत शपथ घेतली, यापुढें केव्हांही राजाजवळ राज्यकारभागाबद्दलची गोष्ट मुळीं काढायचीच नाहीं.

राजाच्या या नव्या हुकमामुळें साऱ्या देशांत मोठा हाहाःकार उडाला. सारे तुरुंग माणसांनीं भरून गेले. नवे तुरुंग बांधणें चन्द्रचूडांना अशक्य झालें. सारे बाकीदार आणि तहसीलदार राज्य सोडून पळून जाऊं लागले. जे बाकीदार नव्हते ते सुद्धां पुढें आपल्यावर असाच प्रसंग येईल या भीतीनें त्यांच्याच बरोबर पळून गेले.

म्हणूनच पूर्वी उल्लेख केला, कीं आधीं आग तर पेटली होती, आतां घर जळून गेलें.

श्री जर आली नसती तर सीतारामचा एवढा अधःपात झाला असता कीं नाहीं तें सांगतां आलें असतें ? राज्यशासनांत सर्वस्वीं लक्ष घालायचें म्हणजे श्रीचा विसर पडेल, असा सीतारामनें पूर्वी निश्चय केला होता. यावेळीं अचानक श्रीची भेट झाली आणि तो त्याचा निश्चय आसक्तीच्या झडीनें वाळूच्या बांधासारखा कोसळून वाहून गेला होता.

राज्यकारभारांत लक्ष दिल्यानें सारीं संकटें निवारलीं असतीं असें नव्हे— श्री आली असती तरीही हरकत नव्हती, पण ती आल्यावर नंदासारखीच राजपुरींत राणी म्हणून राहिली असती. नंदासारखीच राजाच्या राजधर्मांत मदत करीत राहिली असती, तर कदाचित् सीतारामचा एवढा अधःपात झाला नसता. ऐश्वर्यमदानें साहजिकपणें माणसाची जी अवनति होत असते, तशीच सीतारामची झाली असती, तर श्री आणि नंदा यांच्या मदतीनें तिला बराच आळा पडला असता.

श्री तिथें आल्यावर राजपुरींत राणी म्हणून राहिली नाहीं. 'चित्तविश्रामां'त राहिली, पण तीही पत्नी अगर उपपत्नी म्हणून राहिली असती—आज जशी सन्यासिनी म्हणून राहिली होती तशी राहिली नसती—तरीही एवढा अनर्थ झाला नसता. राजाची आकांक्षा पूर्ण झाल्यामुळें तिच्या मोहनास्त्रांचा दुष्परिणाम पुष्कळच कमी झाला असता—कांहीं दिवसांनंतरी राजाचे डोळे उघडले असते. पण ही लोकोत्तर सुंदरी असलेली सन्यासिनी व्याघ्रचर्मावर बसून गोडगोड भाषेंत मधुवृष्टि करीत राहावी, आणि इकडे सीतारामनें एकाद्या कुत्र्यासारखें दूर

अंतरावर बसून नुसतें तिचें तोंड पहात राहावें—आणि तेंही स्वतःच्या विवाहित स्त्रीचें !—अशा परिस्थितींत माणूस बिघडणार नाहीं तर काय होणार ?

सारखीं पांच वर्षें सीताराम तिच्या भेटीसाठीं जीव टाकीत होता. त्यापायीं त्याला जें दुःख होत होतें, त्याला तोड नव्हती. आतां तिची भेट झाली हेंच होतें सीतारामाच्या सर्व नाशाचें मूळ ! आधीं नुसती आग लागली होती, आतां घर जळून गेलें.

सीतारामला आतां हें सहन करणें अशक्य झालें होतें—यापुढें श्रीवर बल-प्रयोग करायचा, असेंच त्यानें आपल्या मनाशीं ठरवलें.

पण, ज्या कुणा व्यक्तीवर एकाद्याचें प्रेम असतें तो माणूस पामर असला तरी देखील त्या व्यक्तीवर बलप्रयोग करण्याचें त्याला धैर्य होत नाहीं. श्रीवर राजाचें जें निःसीम प्रेम होतें त्याचें रूपांतर आतां वैषयिक आकर्षणांत होऊं लागलें होतें. तरीही प्रेम अजूनही सर्वस्वी नष्ट झालें नव्हतें. अर्थात् बलप्रयोग करण्याची प्रवृत्ती झाली असूनही सीतारामला तसें करणें शक्य झालें नाहीं.

बलप्रयोग करावा कीं नाहीं, याचा विचार करून मनाचा निश्चय करण्याच्या पायीं सीतारामचें प्राण डोळ्यांत आले होते. कांहींना कांहीं तरी मनाची निश्चिती होत नव्हती तोंपर्यंत सीताराम एक प्रकारें ज्ञानशून्य होऊन राहिला होता. याच भयंकर मनःस्थितींत बुद्धिभ्रष्ट होऊन त्यानें आपल्या अधिकाऱ्यांना बळी दिलें, तहशीलदार आणि बाकीदारांना तुरुंगांत टाकलें, शेवटी सारी रयत पळून जाऊं लागली आणि राज्य उध्वस्त होण्याची पाळी आली.

शेवटीं सीतारामनें एकदांचा मनाचा निश्चय केला—श्रीवर बलप्रयोग करायचा त्याच्या मनाचा हा निश्चय झाल्यावर तो प्रत्यक्ष अंमलांत येण्याच्या पूर्वी एक भानगड उत्पन्न झाली. चंद्रचूड ठाकुरांनीं राजाला एके दिवशीं गांठलें आणि म्हटलें, " महाराज, आतां तीर्थयात्रेला जावं असं माझ्या मनांत आलं आहे. परवानगी दिली तर जाईन म्हणतों. "

राजाच्या मस्तकावर एकदम वज्राघात झाला. चंद्रचूड निघून गेले तर श्रीला सोडून देणें अवश्य झालें असतें. एक श्रीला तरी सोडून द्यायचें, नाहीं तर राज्य तरी सोडायचें, असा पेंच आल्यामुळें सीतारामनें चंद्रचूड ठाकुरांना तीर्थयात्रेला जाण्याचा बेत करूं नये म्हणून आग्रह केला.

या पापी राज्यांत यापुढें राह्यचें नाहीं, या पापिष्ट राजाची कामगिरी यापुढें करायची नाहीं, असा चंद्रचूड ठाकुरांनीं पक्का निर्धार केला होता. अर्थात राजाच्या या प्रस्तावाला त्यांनीं सहजासहजीं संमति दिली नाहीं.

उभयतांनीं बरीच चर्चा केली. चंद्रचूड राजाला निर्भयपणें टाकून बोलले. राजानेंही अनेक प्रकारें उत्तरें आणि प्रत्युत्तरें केलीं. शेवटीं चंद्रचूड ठाकुरांनीं आपला बेत रहित केला.

बोलतां बोलतां बरीच रात्र होऊन गेली. राजाला त्या दिवशीं चित्तविश्रामांत जातां आलें नाहीं.

इकडे त्याच दिवशीं रात्रीं चित्तविश्रामांत एक विलक्षण प्रसंग उत्पन्न झाला होता.

१६

त्या दिवशीं दैववशात् चित्तविश्रामच्या दारावर एक भैरवी येऊन उभी राहिली. चित्तविश्रामची इमारत लहानशीच असली जरी तें एक राजगृह होतें. भालदार, चोपदार आणि रखवालदार तिथें हजर होते. भैरवीनें दरवाजा—वरील रखालदाराकडे आंत जायची परवानगी मागितली.

रखवालदार म्हणाले, " हा राजवाडा आहे. इथं एक राणी रहाते. इथं आंत जायचा कुणालाही हुकूम नाहीं. "

भैरवी म्हणाली, " इथं राणी आहे तें मला माहीत आहे. तुमचे महाराजही मला ओळखतात. मला इथं यायला अडथळा व्हायची जरूरी नाहीं. तुम्ही जाऊन राजाला वर्दी द्या. "

रखवालदार म्हणाले, " आज राजेसाहेब इथं नाहींत. राजधानींत गेले आहेत. "

भरवी म्हणाली, " तर मग जी राणी इथं राहते तिलाच जाऊन विचारा. तिचा हुकूम झाला कीं चालेल ना ? "

रखवालदार एकमेकांच्या कानाला लागूं लागले. ' चित्तविश्रामच्या ' अंतःपुरांत केव्हांहीं, कुणालाही प्रवेश करूं द्यायचा नाहीं असा राजाचा हुकूम होता, तसाच राणीचाही होता. राजा तिथें नसतांना नंदानें पाठवलेल्या एकदोन

बायका अंतःपुरांत जाऊं पहात होत्या, पण राणीला खबर दिली त्यावेळीं तिनें कुणालाही आंत सोडायचें नाहीं अशी ताकिद दिली होती. तेव्हां पुन्हां राणीला खबर द्यावी कीं काय असा प्रश्न त्या रखवालदारांना पडला. ही भैरवीमूर्ति पाहिल्यावर ती कुणीतरी देवता असावी, मानवी नसावी, अशी त्यांना शंका उत्पन्न झाली. तिला घालवून दिलें तर कदाचित् भलताच प्रसंग यायचा, अशी त्यांना भीति वाटली.

रखवालदारांनीं आपसांत बरीच चर्चा करून शेवटीं एका दासीच्या करवीं अंतःपुरांत खबर दिली. भैरवी आली आहे असें ऐकतांच श्रीनें तिला आंत सोडायला तेव्हांच संमति दिली.

जयंती अंतःपुरांत गेली.

जयंती आंत येतांच श्रीनें तिला ओळखलें आणि म्हटलें, "आलीस ? बरं झालं. मीं मोठ्या पेंचांत पडलें आहें. आतां अशी वेळ आली आहे, कीं तुझा सल्ला घेतल्याशिवाय यापुढं मला कांहींच करतां आलं नसतं."

जयंती म्हणाली, "याच वेळीं मीं तुझी चौकशी करायला येईन असं मीं तुला सांगून गेलें होतें. आतां सांग, काय खबर आहे ? नगरचे लोक बोलताहेत कीं या साऱ्या गोंधळाचं मूळ तूं आहेस. खरं का हें ? प्रजेच्या लोकांत अशा-प्रकारचा डांगोरा पिटला जाणं कुणाच्याही दृष्टीनं बरं नाहीं."

"म्हणूनच तर मीं तुझी वाट पहात होतें." असें म्हणून श्रीनें ती 'चित्तविश्रमां'त राह्यला आल्यापासूनची सर्व हकिकत जयंतीला आद्योपान्त सांगितली.

जयंती म्हणाली, "तर मग तूं आपलं ठरलेलं अनुष्ठित काम कां करीत नाहींस ?"

श्री म्हणाली, "तें मला कळत नाहींसं झालंय."

जयंती म्हणाली, "तर मग राजधानींत जा. राजपुरींत राणी होऊन रहा. तिथं राजाची मुख्य मंत्री होऊन त्याला धर्मांत रहाण्याची मदत कर. तुझं काम हेंच."

"हेंच तर मला माहित नाहीं ना!" श्री म्हणाली, "राणीचा धर्म मीं शिकलें नाहीं. मला संन्यासिनीचा धर्म शिकवला तोच मीं शिकलें. जें मला

माहीत नाहीं, जें मला आचरतां यायचं नाहीं, तें पत्करून आणि त्या धर्माचं ग्रहण करून माझ्या हातून सारा घोटाळा मात्र होईल. संन्यासिनी जर राणी झाली तर काय राज्याचं कल्याण होईल ?"

जयंती विचारांत पडली. ती म्हणाली, "तें मला सांगतां यायचं नाहीं. तुझ्याकरवीं त्या धर्माचं पालन होणार नाहीं असंच वाटतंय मला. तसं होणं शक्य असतं तर एवढ्यावर मजल आली असती का ?"

श्री म्हणाली, "तसा एक दिवस होता, ज्या दिवशीं पदराचं निशाण उभारून मुसलमानांचं सैन्य उघळून लावलं, त्याच दिवशीं जर राहिलें असतें तर असं झालं नसतं. पण माझ्या नशिबानं मीं त्या मार्गानं गेलें नाहीं. तें शिक्षण मला मिळालं नाहीं. नशिबानं मला उलटी वाट दाखवली—वनवासाची—संन्यासाची वाट दाखवली. आतां तें माझं नशीब बदललं कीं काय कोण जाणे !"

"आतां याला उपाय काय ?" जयंतीनें विचारलें.

"पळून जाण्याखेरीज आतां दुसरा उपाय मला दिसत नाहीं." श्री म्हणाली, "मीं असं म्हणतें तें नुसत्या राजासाठीं नव्हे कीं राज्यासाठींही नव्हे. माझ्या स्वतःसाठींच मीं असं म्हणतें. रात्रंदिवस राजाला समोर पहात असल्याचा परिणाम होतोय्. केव्हांकेव्हां वाटूं लागतं कीं मीं त्यांची गृहिणी ! त्यांची धर्मपत्नी !—"

"तें तर खरंच !" जयंती म्हणाली.

श्री म्हणाली, "त्याचमुळं त्या पुराणांतल्या गोष्टी आठवतात. पुन्हां प्रेमाच्या जाळ्यांत मी सांपडणार आहें का ? म्हणूनच मीं आतां म्हणतें आहें, कीं राजाबरोबर रहाणं बरं नव्हे. आतां त्याच्यापासून दूरच झालं पाहिजे. राजा घरून बारा शत्रु झाले आहेत."

"आणि अकरा आपल्या देहांत आहेत होय ?" जयंतीनें विचारलें, "चांगलाच संन्यासधर्म साधलास ! जें कांहीं जगदीश्वराला समर्पण करून टाकलं होतंस, तें पुन्हा काढून घेतलंयस असं वाटतंय मला. एवढंच नव्हे, तर तुझी दृष्टि आतां स्वतःकडे वळली आहे. स्वतःच्या भावनांचा विचार करूं लागली आहेस तूं !—यालाच का संन्यास म्हणतात ?"

"म्हणूनच मीं म्हणत होतें कीं पळून जावं." श्री म्हणाली, "तेंच योग्य होईल कीं नाहीं?"

"तेंच योग्य आहे असं वाटतं मला." जयंती म्हणाली.

श्री म्हणाली, "राजा म्हणतो, कीं मी पळून गेलें तर आपण आत्महत्या करूं—"

"पुरुष माणसाची बायकांना फसवायची ही युक्ति असते." जयंती म्हणाली, "पुष्पबाणांनीं जखमी झालेल्या वेड्याचे प्रलाप असतात ते!"

श्री म्हणाली, "ती भीति मला नाहीं."

"ती भीति तुला नसली तरी तुला काय त्याचं?" जयंती म्हणाली, "राजा जगला काय कीं मेला काय त्याचं तुला काय होय? तो तुझा पति आहे, म्हणून का तुझ्या मनाला एवढं लागतं आहे? हाच का संन्यास?"

श्री म्हणाली, "तें कांहींही असो, राजा मेला तर कुठल्या भूतमात्राचं हितसाधन होणार आहे?"

"राजा मरायचा नाहीं!" जयंती म्हणाली, "ती भीति मुळींच नाहीं. खेळणं हरवलं तर मूल रडतं—मरत नाहीं. ईश्वराच्या ठायीं कर्मसंन्यास करून कोणत्या प्रकारें संयतचित्त होतां येईल त्याचा प्रयत्न आधीं कर."

श्री म्हणाली, "तर मग इथून पाय काढण्याखेरीज दुसरं गत्यंतर नाहीं."

"आतांच्या आतांच!" जयंती म्हणाली.

"कसं जायचं?" श्री म्हणाली, "इथून निसटणं कठीण आहे. रखवालदार मला सोडतील कसे?"

जयंती म्हणाली, "तुझीं तीं भगवीं वस्त्रं, रुद्राक्ष, त्रिशूळ सारीं कांहीं आहेत. होय ना? भैरवी वेषानं इथून बाहेर पड. म्हणजे रखवालदार कांहीं बोलायचे नाहींत."

"म्हणजे तूं गेलीस असं समजतील होय?" श्री म्हणाली, "पण मग तूं कशी इथून बाहेर पडशील?"

जयंती तोंडभर हंसली आणि म्हणाली, "मीं मोठी भाग्यवान आहें म्हणायची? एवढ्या दिवसांनीं माझी काळजी करणारं एक माणूस सांपडलं म्हणायचं? समज, मला नाहीं जातां आलं इथून, मग त्यांत काय बिघडलं ग?"

श्री म्हणाली, "राजाच्या हातीं सांपडलीस, कोण जाणे, राजा जर तुझ्यावर क्रुद्ध झाला—काय होईल कुणी सांगावं ?"

"राजा क्रुद्ध झाला तर माझं काय करणार आहे ?" जयंती म्हणाली, "संन्यासिनीचं अनिष्ट करायची कोणती ताकद आहे या राजाच्या अंगीं ?"

जयंतीवर श्रीचा असामान्य विश्वास होता. यापुढें ती तिच्याशीं अधिक बादविवाद करायच्या भरीला पडली नाहीं.

श्रीनें विचारलें, "तर मग तुझी माझी भेट कुठं होईल ?"

जयंती म्हणाली, "तूं सरळ गांवांत जा. तिथें राजाच्या पुरोहिताला जाऊन भेट. तुझा त्रिशूल मला दे, अन् माझा त्रिशूल तूं घे. त्या गांवच्या राजाचा पुरोहित माझा मंत्रशिष्य आहे. माझी खूण असलेला हा त्रिशूल पाहिला म्हणजे तूं सांगशील त्याप्रमाणें तो वागेल. त्याला सांगून तूं कुठंतरी अत्यंत गुप्तपणें लपून रहा. तूं इथून नाहींशी झालीस म्हणजे तुझ्यासाठीं जिकडेतिकडे कसोशीनं तपास करायची सुरवात होईल. तो पुरोहित तुला तिथल्या राजपुरींत लपवून ठेवील—तिथंच तुझी आणि माझी भेट होईल."

श्रीनें जयंतीची पायधूळ घेतली आणि ती बनवासाला जायच्या तयारीनें निघाली.

रखवालदारांनीं तिला अडथळा केला नाहीं.

१७

रामचांद आणि श्यामचांद खलबत करीत बसले होते. रामचांद म्हणाला, "मोठा भयंकर प्रसंग आलाय्. सारे लोक घाबरून गेलेयत्."

"मीं तर हेंच म्हणतोय दादा." श्यामचांद म्हणाला, "आतां या राज्यांत एक क्षणभरसुद्धां राहाणं कठीण होऊन गेलंय."

रामचांद म्हणाला, "आज इतके दिवस सारखं तूं हेंच म्हणतोयस—जायचं जायचं म्हणतोयस मग जात का नाहींस ?"

श्यामचांद म्हणाला "तसं म्हटलं तर जायची सुरवात केलीच आहे. मुलंबाळं सारीं नळदांग्याला पाठवून दिली आहेत. तरी पण माझी जी थोडीशी वसुली व्हायची राहिलीय्, त्यासाठीं अडकून पडलों आहें. त्यांतलं जें कांहीं

वसूल होईल तेवढं घेऊन निघून जाईन असं म्हणतोंय्. प्रश्न आहे तो हाच, कीं ही माझी वसुली करायची कुणाकडून ? देणेकरी तर सारे फरारी झाले आहेत. "

रामचांद म्हणाला, " बरं, ही आणखी नवी भानगड काय आहे ? हा जो धुडगूस चाललाय तो कशासाठीं ? तुला कांहीं कळलंय् का ? म्हणे तुरुंगांत कैदी ठेवायला जागा नाहीं म्हणून नव्या चाळी बांधल्या. आतां म्हणे गोठ्यांतल्या गाई बाहेर काढून तिथं कैद्यांना ठेवताहेत ! "

" काय भानगड आहे कोण जाणे ! " श्यामचांद म्हणाला, " ती डाकीण म्हणे पळून गेली ? "

" तेंही ऐकलंय मी. " रामचांद म्हणाला, " इतके यागयज्ञ केले, मांत्रिक पंचाक्षरी केले, तरीसुद्धां जी डाकीण गेली नव्हती ती आपोआप पळाली कशी ? "

श्यामचांद म्हणाला, " ती काय अशी सहजासहजीं गेली दादा ?—" तो त्याच्या कानाशीं लागून म्हणाला, " सांगतांना अंगावर कांटा उभा राहतो. ती गेली, ती एका देवतेनं फटकावलं म्हणून गेली. "

" ती कुठली रे देवता ! " रामचांदनें विचारलें.

श्यामचांद म्हणाला, " या नगरींत एक देवी अधिष्ठान करून राहिली आहे, तें कळलं नाहीं का तुला ? ती मधून मधून अशीच प्रगट होते. पुष्कळांनीं पाहिलीय तिला. त्या दिवशीं तूं होतास ना पाह्यला ? "

रामचांद म्हणाला, " हो ! हो ! तीच ती होय ? बरं, आतां सांग, कोण ती ? "

श्यामचांद म्हणाला, " ती काय आपली ओळख कुणाला द्यायला बसली आहे होय ! तसं ती कोण हें कुणाला नीटसं कळलंच नाहीं. तरीपण चार लोक चार प्रकारें बोलतात—तें नुसतं ऐकायचं आणि स्वस्थ बसायचं. "

" काय बोलतात लोक ? " रामचांदनें विचारलें.

श्यामचांद म्हणाला, " कुणी म्हणतात, ती या नगरीची राजलक्ष्मी आहे. कुणी म्हणतात, कीं लक्ष्मीनारायणाच्या मंदिरांतून ती माणसाचं रूप धारण करून बाहेर पडते. कुणी कुणी प्रत्यक्ष पाहिलंय तें, असं म्हणतात. कुणी म्हणतात, कीं ती प्रत्यक्ष दशभुजा देवी आहे. दशभुजादेवीच्या मंदिरांत जाऊन ती अंतर्धान पावलेली कित्येकांनीं पाहिली आहे म्हणे ! "

" तेंच बरोबर असेल. " रामचांद म्हणाला, " नाहींतर ती भैरवी वेष कां म्हणून धारण करील ? त्या दिवशींच्या त्या सभेंत ती भैरवी वेषानंच आली होती ना ? "

श्यामचांद म्हणाला, " कुणी का असेना ती ? त्या दिवशीं तिनं आम्हांला दर्शन दिलं हेंच आम्हां लोकांचं भाग्य म्हणायचं. पण राजा सध्यां इतका बुद्धिभ्रष्ट होऊन गेला आहे—"

" हो, पण ती डाकीण कशी गेली, तें सांग ना. " रामचांद म्हणाला.

श्यामचांद म्हणाला, " ती डाकीण राज्याचा नाश करते आहे, असं पाहून ती देवी भैरवीचा वेष धारण करून तिचा वध करायला गेली—"

" खरं कीं काय, " रामचांद म्हणाला, " मग काय झालं पुढं ? "

" पुढं काय व्हायचं ? " श्यामचंद म्हणाला, " देवीची ती रणरागिणी मूर्ति पहातांच त्या डाकिणीनं ताडाच्या झाडापेक्षां उंच अकटोविकट रूप धारण केलं आणि भयंकर गर्जना करीत ती जी आकाशांत वर उडून गेली, त्याचा कुणाला पत्ताच लागला नाहीं. "

" कुणी सांगितलं हें तुला ? "

" कुणी सांगितलं काय ? ज्यांनीं पाह्यलं त्यांनीं सांगितलं. त्या डाकिणीनं राजाबर एवढी विलक्षण छाप टाकली होती, कीं ती ' चित्तविश्रामां ' तून नाहींशी झाली असं कळताच त्यानं सारे रखवालदार, साऱ्या दासदासी, सर्वांना पकडून तुरुंगांत टाकलं. त्या लोकांनींच तर हा सारा प्रकार उघड केला ना ?—ते लोक म्हणाले, महाराज, आमचा काय दोष, देवतेच्या पुढं आम्ही काय करणार ? पण राजाला तें कांहीं पटलं नाहीं. "

" ही दंतकथा तर नव्हे ? "

" ही काय दंतकथा ? ज्यांनीं प्रत्यक्ष पाहिलं ते सांगताहेत असं. "

" कुणी सांगावं ? " रामचांद म्हणाला, " कदाचित् मढींबिढीं खायच्या-साठीं ती डाकीण गेली असेल मसणांत. अन् परत आली नसेल झालं. राजा छळूं लागला तेव्हां त्या बेट्यांनीं स्वतःच्या बचावासाठी कांहींतरी दंतकथा रचून सांगून टाकली असेल. "

श्यामचांद म्हणाला, "ही काय रचलेली दंतकथा? त्यांनीं स्वतां पाह्ययूलंय! तिचे हे एवढे सुळ्यासारखे दांत होते. दोरखंडासारखे केस होते. बंदुकीच्या नारगिरीसारखे डोळे होते. सुसरीसारखी जीभ होती तिची. तिनं नुसता श्वास सोडला तर मेघाच्या गडगडाटासारखा आवाज होई. नुसतं पाऊल टाकलं तर धरणीकंप होऊं लागे!"

"खरं कीं काय?" रामचांद म्हणाला, "एक एक ऐकावं तेवढं अद्भुतच! बरं---राजा बुद्धिभ्रष्ट झाला आहे असं कुणी म्हटलं?"

"तेच सांगत होतों ना मीं!" श्यामचांद म्हणाला, "पहिल्यानं त्यानं बिचाऱ्या निरपराध रखवालदारांना आणि दासदासींना नाहक तुरंगांत टाकलं. नंतर त्या डाकिणीचा शोध लावण्यासाठी चोहींकडे माणसं पाठवलीं. डाकीणच ती, ती आपण होऊन आपल्या घरीं गेली, तर कुठलाही माणूसप्राणी तिला शोधून काढणार कसा? तेव्हां जे बिचारे शोधार्थ गेले होते, ते परत येऊन हात जोडून राजाला सांगत होते, कीं तिचा कुठं पत्ता लागत नाहीं."

"मग राजानं काय केलं?"

"जो कुणी परत येईल आणि म्हणेल, कीं पत्ता लागत नाहीं, त्याला एकदम कैद करून राजा तुरंगांत टाकी. अशा रीतीनं तुरूंगावर तुरूंग भरून जात. सरकारी नोकर तर इतके घाबरून गेले आहेत कीं ते घरदार, बायको, मुलंबाळं सोडून बाहेर पळूं लागले आहेत. सरकारी नोकर पळताहेत म्हणून गांवचे लोक अन् दुकानदारही पळूं लागले आहेत."

"मग ही देवी काय करते आहे?" रामचांद म्हणाला. "तिनं एक नुसता कटाक्ष फेंकला तरीही या निरपराधी लोकांचा सहज बचाव होईल."

श्यामचांद म्हणाला, "ही तर साक्षात् भगवती! हा सगळा प्रकार तिनं पाहिला तेव्हां भैरवी वेषांत तिनं राजाला दर्शन दिलं आणि म्हटलं, 'राजा, निरपराधी माणसांना कष्ट देऊं नकोस. निरपराध्याला शिक्षा केली तर राजाचं राज्य राहात नाहीं. लोकांचा कांहीं दोष नाहीं. मींच तिला घालवून दिलं आहे. कारण ती राहिली असती तर तुझ्या राज्याचं अकल्याण झालं असतं. कुणाचा दोषच असेल तर तो माझा आहे. कुणाला शिक्षाच करावयाची असेल तर त्या नोकरांना सोडून दे अन् मला शिक्षा कर.' असं सांगितलं तिनं."

रामचांद म्हणाला, " मग काय केलं राजानं ? "

श्यामचांद म्हणाला, " कांहीं सुद्धां केलं नाहीं. म्हणूनच मीं म्हटलं, कीं राजा बुद्धिभ्रष्ट झाला आहे. ती डाकीण पळून गेल्यापासून राजाची मिजाज एवढी गरम झाली आहे, कीं चिमणी-कावळासुद्धां त्याच्या आजूबाजूला जाऊं शकत नाहीं. तर्कालंकार ठाकूर त्यांना भेटायला गेले होते, थोरली राणी भेटायला गेली होती, पण त्या दोघांनाही राजानं शिव्या देऊन घालवून दिलं. "

" म्हणतोस काय ? " रामचांद म्हणाला, " गुरुला शिव्या दिल्या ? निर्वंश होईल कीं अशानं ! "

श्यामचांद म्हणाला, " तें तर देवच बोलून गेलाय ! एवढ्यानंच कांहीं भागलं नाहीं. ती देवता राजाला भेटायला गेली होती. तिला पहातांच राजाचे डोळे तांबडे लाल झाले. तो स्वतःच्या हातानं तिला मारायला पुढं सरसावला होता, पण थांबला. पण नंतर त्यानं जें केलं तें तर त्याहीपेक्षां भयंकर होतं. "

" काय केलं त्यानं ? "

" त्यानं तिला एकदम कैद केलं. तीन दिवसांच्या आंत जर ती त्याची डाकीण मिळाली नाहीं तर राज्यांतल्या साऱ्या लोकांच्या समोर त्या देवीला विवस्त्र करून चांडाळाकडून वेतानं मारलं जाईल, असा हुकूम सोडलाय त्यानं. "

" काय म्हणतां काय ? " रामचांद म्हणाला, " असं केलं म्हणतां त्यानं ? राजा काय पागल झालाय ? मग त्या देवीनं काय केलं ? ती मुकाट्यानं कैदेंत गेली का ? तिला कैदेंत घालणं कुणाला साध्य आहे ? "

" देवादिकांचीं चरित्रं आपणा सामान्य माणसांना कळायचीं कशीं ? " श्यामचांद म्हणाला, " या राजाचा राज्यभोगाचा काळ मला वाटतं, आतां संपलाय. म्हणून या राज्याच्या राजलक्ष्मीनं हें असं करून स्वस्थानीं गमन करायचं ठरवलेलं दिसतंय. राजानं तिला कैदेंत घालायचा हुकूम दिला अन् ती अगदीं हंसतमुखानं तुरुंगांत प्रवेश करती झाली. कोण कोण म्हणतात, रात्रीं तुरुंगांत मोठी गडबड उडालेली असते. देवदेवता येऊन स्तुतिपाठ करतात. ऋषि येऊन मंत्रपाठ आणि वेदपाठ करतात. पहारेवाले बाहेरून ऐकत असतात, पण कुणी दार उघडून आंत डोकावून पाहिलं कीं आंतले लोक नाहींसे होतात—"

वस्तुस्थिति अशी होती, कीं जयंती स्वतःच रात्रीच्या वेळीं ईश्वराची स्तोत्रें म्हणत असे. तीं पहारेवाल्यांनीं ऐकलीं होतीं आणि त्याच्यावर ही दंतकथा उभारली होती.

श्यामचांद म्हणाला, " राजाच्या त्या घोषणेला आतां तीन दिवस झाले. राजानं दवडी पिटून जाहिर केलं आहे, उद्यां एका चोरटीला बेइज्जत करून वेतानं मारण्यांत येणार आहे. ज्यांना पाहायचं असेल त्यांनीं येऊन पाहावं. तूं नाहीं का ऐकलीस ती दवंडी ? "

" कसली ही दुर्बुद्धि झालीय राजाला ? " रामचांद म्हणाला, " तर्कालंकार ठाकूर देखील कांहीं बोलत नाहींत कसे ? थोरली राणी देखील काय म्हणून स्वस्थ बसली आहे ? राजा आपल्यावर तोंड टाकील, या भीतीनं का हे पुढं येत नाहींत ? "

" त्यांनीं आपल्याघरीनं पुष्कळ सांगून पाहिलं म्हणे ! " श्यामचांद म्हणाला, " राजा म्हणाला, फार छान ! ती जर देवताच आहे तर ती स्वतःचं रक्षण करायला समर्थ असली पाहिजे. तिची तरफदारी करायला तुम्ही येतांहां कशाला ? आणि जर ती माणूस असेल, तर मी राजा आहें—चोराला शिक्षा देणं हा आहे माझा अधिकार, या प्रकरणीं तुम्ही मध्यें तोंड घालायची काय जरूर ? "

" एका अर्थी राजाचं म्हणणं कांहीं चुकीचं नाहीं ! " रामचांद म्हणाला, " आतां प्रत्यक्ष काय होतं ते उद्यां पाह्यला हवं. तुम्हीं जाणार आहां का ? "

श्यामचांद म्हणाला, " जाणार आहें तर ! मींच काय, गांवांतले सारे लोक जाणार आहेत. असलं हें प्रकरण पाह्यला गेल्याशिवाय कोण राहील ? "

१८

आज जयंतीला छडीमार देण्यांत येणार होता. राजानें घोषणा केली होती. कीं तिला विवस्त्र करून भर चवाठ्यावर वेत्राघात करण्यांत येईल.

पहांटेपासून लोक गोळा होत होते. दिवस उजाडतो न उजाडतो तोंच किल्ल्यावरची सारी जागा माणसांनीं भरून गेली होती. आतां कुणाला जायला वाटसुद्धां नव्हती, त्यामुळें ठेसाठेशी, घुसवाघुसवी, लोटालोटी आणि हातघाई सुरू झाली होती.

पूर्वी एकावेळीं असाच लोकांचा समुदाय जमला होता—तो दिवस होता बाकटी राणी रमा हिच्या चौकशीचा ! आजचा दिवस होता जयंतीच्या शिक्षेचा ! नुसत्या चौकशीपेक्षां, जयंतीला प्रत्यक्ष पहाण्यासाठीं लोक जास्त आले होते.

नंदा वाड्याच्या खिडकींतून पहात होती. माणसांच्या डोक्यावरच्या भुरभुर उडणाऱ्या केसांखेरीज दुसरें कांहींच दिसत नव्हतें. क्वचित् एकाद्या स्त्रीच्या माथ्यावरचा पदर किंवा एकाद्या पुरुषानें ऊन लागूं नये म्हणून डोक्याला गुंडाळलेलें फडकें, त्या केसांच्या काळ्या समुद्रांत फेसासारखें दिसत इतें.

रमेच्या जबानीच्या दिवसांची नंदाला आठवण झाली. त्या दिवशीं जमलेला लोकसमुदाय खळबळला होता. प्रक्षुब्ध झाला होता. तिला आठवलें, त्या दिवशीं हा लोकसमुदाय वादळासारखा उसळलेला होता. त्या समुदायाला शांत करणें राजरक्षकांना कठीण जात होतें. आज जमलेले सारे लोक अगदीं निस्तब्ध होते. आज या राज्याचें अमंगल होण्याची भीति सर्वांच्या मनांत जागी झाली होती. सारे लोक मनांतल्या मनांत घाबरून गेले होते.

किल्ल्यांतल्या त्या मोठ्या पठाराच्या मध्यभागीं एक उंच माचा बांधण्यांत आला होता. त्या माच्यावर एक काळाकुट्ट भयंकर दिसणारा धष्टपुष्ट मूर्तिमंत अंधकारासारखा असा चांडाळ एक लांबलचक वेताची छडी हातीं घेऊन उभा होता. जयंतीला त्या माच्यावर नेऊन उभें करायचें, सर्वांच्या समोर विवस्त्र करायचें आणि नंतर चांडाळांनीं तिला वेताचे फटके द्यायचे, अशी राजाज्ञा होती.

जयंतीला अजूनही त्या जागीं आणण्यांत आलें नव्हतें. राजा अजून आला नव्हता. तो आल्यानंतर तिलाही आणण्यांत येणार होतें. त्या माच्याच्या समोरच राजासाठीं सिंहासन उभारलें होतें. त्याच्या भोंवती भालदार, चोपदार आणि शिपाई उभे राहिले होते. मंड्यापैकीं सारेच आज गैरहजर होते. असला भयंकर प्रकार पहायला येण्याची त्यांच्यापैकीं कुणाचीच तयारी नव्हती आणि राजानेंही त्यांना बोलावलें नव्हतें.

आतां राजा केव्हां येतो, शिक्षेला पात्र झालेली ती देवी कीं मानवी, कोण असेल ती, केव्हां येते तेव्हां काय होतें, तें पहाण्यासाठीं तो लोकसमुदाय पुन्हां पुन्हां माना वर करून डोकावत होता. इतक्यांत चोपदारांची ललकारी ऐकूं आली. सारे स्तब्ध झाले. सर्वांना कळून आलें, कीं राजा येत आहे.

राजानें आज दरबारी पोशाख केला नव्हता. वैशाखांतल्या संध्याकाळच्या मेघासारखा तो आज भयंकर दिसत होता. त्याचे डोळे लालीलाल झाले होते. त्याचें विशाल वक्षःस्थळ मधून मधून सारखें फुरफुरत होतें. पावसाची सुरवात व्हायच्या पूर्वी खालीं उतरणाऱ्या मेघासारखा राजा सिंहासनावर येऊन बसला. नित्याप्रमाणें कुणीही 'महाराजाधिराजकी जय' असा जयजयकार केला नाहीं.

सर्व लोक माना उंचावून इकडे तिकडे पहात होते. तितक्यांत पहारेकरी जयंतीला घेऊन आले आणि त्यांनीं तिला त्या माऱ्यावर नेऊन उभें केलें. एकाद्या प्रासादाच्या शिखराआड उगवणाऱ्या पूर्णिमेच्या चंद्रिकेसारखी जयंती त्या माऱ्यावर उगवलेली दिसत होती. जमलेले हजारोंहजार लोक डोळ्यांत जीव आणून, भगवीं वस्त्रें परिधान केलेल्या त्या ज्योतिर्मयी मूर्तिकडे डोळे भरून पहात होते.

जयंतीची मुद्रा प्रफुल्लित दिसत होती. ती तोंड भरून गोडगोड हंसत होती. तें हंसूं पहातांच सर्व प्रकारचीं संकटें निवारण करणाऱ्या शक्तीचें तें स्वरूप असावें असें सर्वांना वाटत होतें.

देवता समजून सर्वांनी तिला हात जोडून प्रणाम केला. जेव्हां लोकांनीं पाहिलें, कीं सर्वच लोक तिला प्रणाम करताहेत, तेव्हां सर्वांच्याच मनांत भक्ति-भावाची भावना प्रगट झाली आणि सारेच मोठमोठ्यानें ओरडले, "जय माताजीकी जय!"

हळूहळू तो जयध्वनि या पठारांतून त्या पठारावर, या डोंगरांतून त्या डोंगरावर, पडसाद उठवीत, घुमत तो सारा प्रदेश दणाणून टाकीत होता. हजारों लाखों कंठांतून एकाच शब्दानें घोषित होणाऱ्या त्या जयध्वनीच्या निनादानें घाबरून त्या चांडाळाच्या हातची वेताची छडी गळून पडली.

जयंती मनांतल्या मनांत ईश्वराला हांक घालीत होती, "जय जगदीश्वर! तुझाच जय असो! तूंच या लोकारण्यांत उभा राहिला आहेस. तूंच या लोकांच्या कंठांतून आपला जयघोष आपणच करीत आहेस. जय जगन्नाथ! हा जयजयकार तुझाच! मी काय तुझ्यापुढं? हा तुझा जयजयकार तुझ्या चरणीं विदित होवो!"

राजाचा क्रोध अनावर झाला होता. तो नखशिखांत भडकत होता. निःस्तब्ध झालेल्या त्या वातावरणांत मेघाप्रमाणें गर्जत त्यानें चांडाळाला आज्ञा केली, "सोड तिचं वस्त्र—अन् हाण वेत!"

तितक्यांत चंद्रचूड तर्कालंकार गदींतून घुसून राजासमोर आले आणि राजाचे दोन्ही हात घट्ट धरून म्हणाले, "महाराज, शांत व्हा. आजवर मी तुमच्याकडे कांहीं मागितलं नाहीं—आज मला एवढी भिक्षा घाला. हिला सोडून द्या."

राजा तोंड वेंगाडून म्हणाला, "कां बरं! देवता आहे ना ही! स्वतःची सुटका करण्याची शक्ति या देवतेच्या अंगीं नाहीं का? या भंड ढोंगी बेटीला योग्य शिक्षा होतेय ही!"

चंद्रचूड म्हणाले, "ही देवता नसेल कदाचित्, पण स्त्री तर आहे?"

"स्त्री असली तरी तिला शिक्षा करायचा अधिकार राजाला आहे." राजा म्हणाला.

"हा जयध्वनि ऐकलात ना महाराज?" चंद्रचूड म्हणाले, "या जयध्वनीच्या समुद्रांत आपलं राजाचं नांव बुडून जातंय महाराज!"

"जा, इथून निघून जा." राजा म्हणाला, "पोथीपंचांग घेऊन वाचीत बसा जा!"

अपमानित झालेले चंद्रचूड ठाकूर खालीं मान घालून निघून गेले.

राजानें पुन्हां चांडाळाला वेत्राघात करायची आज्ञा दिली. खालीं पडलेला वेत चांडाळानें उचलून घेतला. वेत वर उचलला—जयंतीच्या तोंडाकडे एकदां त्यानें पाहिलें—वेत खालीं गेला—राजाच्या तोंडाकडे पाहिलें—पुन्हां जयंतीच्या तोंडाकडे पाहिलें—शेवटीं हातांतला वेत फेकून देऊन तो स्तब्ध उभा राहिला.

"हें काय चाललंय?" राजानें कडाडून विचारलें.

चांडाळ म्हणाला, "हें काम माझ्या हातून व्हायचं नाहीं महाराज!"

राजा म्हणाला, "तुला सुळीं जावं लागेल!"

चांडाळ म्हणाला, "महाराजांचा हुकूम झाला तर सुळीं जाईन, पण हें काम माझ्या हातून होणार नाहीं."

राजानें शिपायाला हुकूम केला, "चांडाळास पकडून धरा आणि कैद करा."

शिपाई लोक चांडाळाला पकडण्यासाठीं त्या माच्यावर चढूं लागले तेव्हां जयंती राजा सीतारामाला म्हणाली, "या गरिबाला उगीच का छळतां ? आपला हुकूम मी तामील करतें. त्यासाठीं चांडाळ नको कीं जल्लादही नको !" तरीही शिपाई चांडाळाला पकडण्यासाठीं वर आले असें पाहून जयंती त्याला म्हणाली, "बेटा, माझ्यासाठीं तुला शिक्षा काय म्हणून ? मीं संन्यासिनी आहें. मला सुखदुःखाची चाड नाहीं. वेतानं मारलं म्हणून मला काय होणार आहे ? आणि विवस्त्र होणं—संन्याशाला सवस्त्र काय आणि विवस्त्र काय ? कां उगीच शिक्षेला पात्र होतोस ? चल, उचल तो वेत."

चांडाळानें वेत उचलला नाहीं, असें पाहून जयंती त्याला म्हणाली, "बेटा, बायकांचीं बोली म्हणून का तुझा विश्वास बसत नाहीं ? हें पहा त्याचें प्रमाण—" असें म्हणून जयंतीनें तों वेत उचलून घेतला आणि उजव्या हातांत घट्ट धरून ठेवला. त्या जमलेल्या सर्व जनसमुदायाच्या समक्ष नुकत्याच उमललेल्या कमळासारख्या आपला छोटासा हात तिनें उघडून धरला आणि मोठ्या जोरानें त्यावर वेताचा आघात केला. हाताचें मांस घेऊन वेत उठला. हातांतून रक्ताच्या धारा वाहूं लागल्या. जयंतीचें भगवें वस्त्र त्या रक्तानें लालीलाल झालें.

तें दृश्य पहातांच जमलेल्या सर्व लोकांनीं एकमुखानें हाहाःकार केला

जयंती नुसती हंसली. ती त्या चांडाळाला म्हणाली, "पाहिलंस बेटा, संन्यासिनीला मार लागतो का ? कां भितोयस तूं ?"

त्या चांडाळानें तिचा रक्तानें भिजलेला हात एकदां पाहून घेतला—एकदां त्यानें जयंतीच्या सहास्य प्रफुल्ल मुखाकडे पाहिलें—पाहून घेतल्यावर त्यानें बाईबाईनें मागें फिरून त्या माच्यावरून खालीं उडी घेतली आणि जीव घेऊन तो पळत सुटला. लोकांच्या गर्दीत तो कुठें गेला तें कुणालाच कळलें नाहीं.

तें पाहून राजानें आपल्या शिपायांना हुकूम केला, "दुसरे लोक घेऊन या—मुसलमान खाटीक घेऊन या."

शिपायांनी एका दैत्यासारख्या दिसणाऱ्या कसायाला आणलें. महंमदपुरांत गोवध करायची बंदी होती, तरीपण तो गांवाबाहेर बकरीं, मेंढे कापून विकीत असे. तो अतिशय मजबूत देहाचा आणि दिसायाला भेसूर होता.

राजाचा हुकूम होतांच तो वर चढून गेला आणि हातीं वेत घेऊन जयंतीच्या समोर उभा राहिला. एकदां वेत वर उचलून तो जयंतीला म्हणाला, " कपडा उतार. तेरी गोश्त टूकरा टूकरा करके हम दुकानमें बेचेंगे. "

जयंतीच्या मुद्रेवर यत्किंचतहि परिणाम झाला नव्हता. जमलेल्या लोकांना उद्देशून ती म्हणाली, " राजाच्या हुकूमाप्रमाणें मीं या मंचावर विवस्त्र होणार आहें. तुमच्यामध्यें जे कुणी सतीसाध्वीचे पुत्र असतील त्यांनीं आपल्या आईचं स्मरण करून क्षणभर आपले डोळे झाकून घ्यावे. ज्या कुणाला कन्या असेल त्यांनीं आपल्या कन्येचं स्मरण करून आणि ती कन्या मी आहें अशी कल्पना करून आपले डोळे झांकून घ्यावे. जे कुणी हिंदु असतील, ज्यांची देवाब्रह्मणांच्या ठायीं भक्ति असेल, त्यांनीं आपले डोळे झांकून घ्यावे. ज्यांची माता सती नसेल, जे वेश्येच्या पोटीं जन्माला आले असतील त्यांनीं वाटेल तें करावं—त्यांच्यासमोर मला लाज वाटायची नाहीं—मीं त्यांची मनुष्यकोटींत गणना करीत नाहीं. "

तिचें भाषण ऐकून लोकांनीं डोळे मिटले कीं मिटले नाहींत तें जयंतीनें एकदांसुद्धां पाहिलें नाहीं. माणसाचें मन जेव्हां उच्चकोटींतील स्तरावर गेलेलें असतें, तेव्हां त्याला जग आठवत नाहीं—जगदीश्वराखेरीज जयंतीच्या नजरेसमोर यावेळीं दुसरें कुणींच दिसत नव्हतें.

जयंती राजाकडे वळून म्हणाली, " राजा, तुझ्या आज्ञेनं मी विवस्त्र होत आहें, पण तूं माझ्याकडे पाहूं नकोस. तूं राजेश्वर आहेस. तूं पशुवृत्त झालास असं दिसून आलं तर प्रजा खवळून उठेल. राजा, मीं वनवासिनी आहें. वनांत राहणाऱ्यावर विवस्त्र व्हायचे प्रसंग केव्हां ना केव्हां तरी येत असतात. एकदां मला वाघानं पकडलं होतं—वाघाच्या तोंडांतून मीं माझं शरीर सोडवून घेतलं, पण माझं वस्त्र मला सोडवून घेतां आलं नाहीं. तुझं हें आचरण पाहून तुला सुद्धां मीं तसाच एक क्रूर पशू म्हणून समजून विवस्त्र होत आहें. मला तुझी लाजशरम मुळींच वाटत नाहीं. पण तूं मात्र, मनाची नसली तरी जनाची लाज धरली पाहिजेस. कारण तूं राजा आहेस. तूं संसारी आहेस. तुझ्या राण्या आहेत. आतां झांक डोळे ! "

जयंतीचें भाषण फुकट गेलें ! राजा रागानें बेभान झाला होता—आंधळा

झाला होता. जयंतीला कोणतेंही उत्तर न देतां तो कसायाला म्हणाला, "जबरदस्तीसे कपडा उतार लो!"

यानंतर जयंतीनें निष्कारण बोलायचे श्रम घेतले नाहींत. ती गुढघे टेंकून मंचावर बसली. आतां तिच्या सहनशक्तीची परमावधी झाली होती. यावेळीं तिच्या डोळ्यांत पाणी आलेंसें वाटलें. जयंतीला वाटत होतें, 'ज्याअर्थी मीं जगांतल्या साऱ्या सुखदुःखावर जलांजली दिली आहे, ज्याअर्थी मला सुखदुःखाची चाड वाटत नाहीं, तिथं आतां काय म्हणून लाजशरम बाळगायची! ज्याअर्थी माझ्या मनाचा आणि इंद्रियांचा मुळींच संबंध नाहीं, त्याअर्थी मीं सवस्त्र असलें काय, विवस्त्र असलें काय—एकच! लाज वाटायची ती पापाच्यापायीं. आतां कसली आली आहे लाज? एका जगदीश्वराखेरीज कुणापुढं लाज बाळगायची? मीं या सभेंत विवस्त्र कां होऊं नये!'

हा वेळपर्यंत जयंतीनें संकाटाची जाणीव करून घेतली नव्हती. वेत्राघाताची तिला पर्वा नव्हती—पण ज्यावेळीं प्रत्यक्ष विवस्त्र होण्याचा क्षण आला त्यावेळीं सुखदुःखातीत झालेल्या त्या जयंतीलाही लोकलज्जेची जाणीव झाली. स्त्री-जन्माला धिःक्कार देऊन ती गुडघे टेंकून बसली आणि हात जोडून पवित्र भावनेनें आत्म्याशीं समरस होऊन तिनें मनांतल्या मनांत भगवंताला हांक मारली, "दीनबंधो! आज माझी लाज राख. जगांतल्या सर्व सुखदुःखांवर मीं पाणी सोडलं आहे असं मला वाटत होतं, पण माझा तो अभिमान आतां पूर्णपणें नष्ट झाला आहे. माझ्यावर दया कर देवा! कां मला हा स्त्रीदेह दिलास? सारं सुखदुःख विसर्जन करतां येतं, पण स्त्रीदेह आहे तोंवर लज्जा विसर्जन करतां येत नाहीं, म्हणूनच आज तुला जीव तोडून हांक मारत्यें आहें, जगन्नाथा, माझी लाज राख!"

ज्यावेळीं जयंती जगदीश्वराला हांक मारीत होती त्याचवेळीं कसायानें तिच्या पदराला हात घालून ओढायला सुरवात केली होती. तें पाहून जमलेले सारे लोक हाहाःकार करूं लागले. ते मोठ्यानें ओरडून म्हणाले, "महाराज, या पापाच्या पायी तुमचा सर्वनाश होईल! तुमचं राज्य जाईल!"

राजानें तें कानीं घेतलें नाहीं. निरूपाय झालेली जयंती आपला पदर घट्ट पकडून धरीत होती. तिच्या डोळ्यांवाटे पाणी सांडत होतें. हें दृश्य पाहायला

श्री असती तर तिला अत्यंत आश्चर्य वाटलें असतें. कारण जयंतीच्या डोळ्यांना पाणी आलेलें तिनें कधींच पाहिलें नव्हतें.

रक्तानें भरलेल्या आपल्या हातानें पदर घट्ट धरून जयंती टाहो फोडीत होती, "घांव जगन्नाथा, धांव ! माझी लाज राख !"

तिचा धांवा जगन्नाथाच्या कानीं गेला असावा. तो असंख्य जनसमूह हाहाःकार करीत असतांना एकदम थांबला आणि त्यांच्या सहस्र कंठांतून जयध्वनी बाहेर पडला—"राणीजीकी जय ! महाराणीकी जय ! देवीकी जय !"

खालीं मान घालून बसलेल्या जयंतीच्या कानीं पैंजणांचा आवाज आला. तिनें वर पाहिलें. साऱ्या पौरस्त्रीसमवेत महाराणी नंदा मंचावर चढून येत होती.

जयंती उठून उभी राहिली. साऱ्या पौरस्त्रियांनी तिला घेरून घरलें. जयंतीला पाठींशी घालून राणी तिच्यासमोर उभी राहिली. जमलेले प्रेक्षक टाळ्या वाजवीत जयजयकार करूं लागले.

कसायानें जयंतीचा हात सोडला, पण तो मंचाखालीं उतरला नाहीं.

राजा अत्यंत चकित झाला. तो चिडला होता. कठोर वाणीनें तो नंदाला म्हणाला, "हें काय चाललंय महाराणी ?"

नंदा म्हणाली, "महाराज, मीं पतिपुत्रवती आहें. माझ्या जिवांत जीव आहे तोपर्यंत मीं तुम्हांला असं अघोर पाप करूं देणार नाहीं. मग मीं आहे कशासाठीं ?"

राजा पूर्वीसारखाच क्रोधविष्ट होऊन म्हणाला, "तुझी जागा आहे अंतःपुरांत—इथं नव्हे. अंतःपुरांत जा !"

नंदानें त्याला प्रत्युत्तर दिलें नाहीं. ती म्हणाली, "महाराज, ज्या या मंचावर मीं उभी आहें तिथं हा कसाई कोणत्या साहसानं उभा राहतो आहे ? याला खालीं उतरायचा हुकूम करा."

राजा कांहीं बोलला नाहीं.

नंदा मोठ्यानें गर्जून म्हणाली, "याला इथून खालीं उतरायला लावील असा या राजपुरींत कुणी नाहींच का ?"

तिचा तो आक्रोश ऐकतांच जमलेले हजारों लोक 'मार ! मार !' असें म्हणत कसायावर धांवले. मंचावरून उडी मारून तो पळून जाऊं पहात होता, पण लोकांनीं त्याला घरून पकडलें आणि मारीत मारीत किल्ल्याच्या बाहेर नेलें. अनेक प्रकारची विटंबना करून त्यांनीं त्याला कसेंबसें जीवदान देऊन सोडलें.

नंदा जयंतीला म्हणाली, "माते, दया कर. मला अभय दे. मी फार घाबरून गेलें आहें. देवतेच्या कोपाची मला भीति वाटते आहे. माते, हा अपराध पोटांत घाल आणि एकदां माझ्या अंतःपुरांत आपलीं पायधूळ झाड. मी तुझी पूजा करीन."

जमलेल्या साऱ्या स्त्रियांसमवेत राणी जयंतीला घेरून घेऊन अंतःपुराकडे गेली. राजा हतबुद्ध होऊन सिंहासनावरून उठून निघून गेला. तें पाहताच लोकांनीं एकच जयघोष केला. नंदाला आशीर्वाद देत देत जमलेले सारे लोक तिथून निघून गेले.

अंतःपुरांत गेल्यावर जयंती तिथें एक क्षणभरही थांबली नाहीं. नंदेनें तिची काकुळती केली, तिला विनविलें, स्वतःच्या हातांनीं गंगाजलानें तिचे पाय धुऊन तिला सिंहासनावर बसवायला ती सरसावली, पण जयंतीनें तें सर्व हंसण्यावारी नेलें.

जयंती म्हणाली, "बेटी, मी अंतःकरणपूर्वक तुला आशिर्वाद देतें, ईश्वर तुझं कल्याण करो. मला राग आला आहे अगर वाईट वाटलं आहे असं क्षणभरसुद्धां मनांत आणूं नकोस. ईश्वर करो आणि तसं न होवो, पण कधीं तसाच प्रसंग तुझ्यावर आला तर मी माझ्या शक्तिप्रमाणें तुला मदत करीन. तुला एकच सांगतें, राजपूरींत संन्यासिनीला स्थान नाहीं ! मी चाललें."

जमलेल्या सर्व स्त्रियांनीं आणि नंदानें तिची पायधूळ घेतली आणि तिला निरोप दिला.

१९

राजवाड्यांतल्या अंतःपुरांतल्या गोष्टी सहजासहजीं बाहेर जातात, पण त्या बाहेर जातांना जशाच्या तशा जात नाहींत. त्यांतून बायकांच्या तोंडून त्या गोष्टी

अनुक्रम..... विभाग.....

जायच्या—अर्थात् बाहेर जाऊन पोहोंचेपर्यंत त्यांना भलतेंच स्वरूप येतें. विशेषेंकरून जिथें कांहीं अवास्तव असे प्रसंग असतात तिथें त्या बातम्यांचें स्वरूप एकदम अद्भुत होतें.

गांवगप्पांमुळें जयंतीबद्दलच्या हकिकती यापूर्वी कशा विकृत होत गेल्या होत्या हें नागरीकांच्या तोंडून पूर्वीच आपल्याला दिसून आलें आहे. जयंती अंतःपुरांत गेली आणि तिथें न थांबतां लगेच निघून गेली, या अगदीं साध्या-सिध्या गोष्टीला वेगळाच डूब मिळाला. लोक बोलूं लागले, कीं देवी अंतः-पुरांत प्रवेश करतांच अंतर्धान पावली. त्यानंतर तिला कुणी पाहिलें नाहीं.

प्रजेचा आतां असा समज झाला होता, कीं ती नगरची अधिष्ठात्री आणि रक्षणकर्ती देवता राजाची कसोटी पाहण्यासाठीं आली होती. राजाच्या हातून अशाप्रकारें छळ झाल्यामुळें राज्यत्याग करून ती निघून गेली. यापुढें हें राज्य रहाणार नाहीं.

दुर्दैवानें याच वेळीं बातमी पसरली, कीं मुर्शिदाबाद येथून नबाबी फौज चाल करून येत आहे. राज्याचा विध्वंस होण्याचा समय आतां जवळ आला आहे असेंच सर्वांना वाटूं लागलें. नगरांतल्या लोकांची सामानसुमान बांधून नगर सोडून जायची एकच धामधूम उडाली होती. बरेच लोक नगर सोडून गेले देखील.

राज्याच्या या परिस्थितिकडे सीताराम मुळींच लक्ष देत नव्हता. तो 'चित्त-विश्रामां' त जाऊन तिथें एकटाच रहात होता. क्रोधानें त्याला सर्वस्वीं ग्रासून टाकलें होतें. तो त्याचा क्रोध सर्वव्यापक, सर्वग्रासक होता. कुणाहीपेक्षां आतां श्रीवरच त्याचा क्रोध अतिशय प्रबल झाला होता.

सीतारामचा तोल आतां सर्वस्वी सुटला होता. तो बेफाम झाला होता. त्यानें नीच व्यवसाय करणाऱ्या लोकांना बोलावून घेतलें आणि सांगितलें, "राज्यांत जिथं कुठं सुंदर स्त्री सांपडेल तिला घेऊन 'चित्तविश्रामां'त या."

टोळक्या टोळक्यांनी ते नीच लोक चारी दिशांना धांवत सुटले. ज्या पैशांनी वशीभूत होणाऱ्या होत्या, त्यांना पैसे देऊन ते घेऊन आले. ज्या साध्वी होत्या, त्यांना ते जबरदस्तीनें घेऊन येत होते. अशा प्रकारें राज्यांत चोहींकडे हाहाःकार उडाला होता.

तो सर्व प्रकार पाहून चंद्रचूड ठाकूरांना वैताग आला. कुणाला कांहीं न सांगतां गड्याच्या माथीं सामान देऊन ते तीर्थयात्रेला निघाले. त्यानंतर त्यांनीं महंमदपुरांत परत केव्हांही पाय ठेवला नाहीं.

ते वाटेनें जात असतां वाटेंत त्यांना चांदशहा फकीर भेटला. फकिरानें त्यांना विचारालें, "ठाकूरजी, कुठं निघालां आहांत ?"

चंद्रचूड म्हणाले, "काशीला. आपण कुठं निघालांत ?"

फकीर म्हणाला, "मी मक्केला जातों."

चंद्रचूडांनीं विचारलें, "तीर्थयात्रेसाठीं का ?"

फकिर म्हणाला, "केवळ तेवढ्यासाठींच नव्हे—ज्या देशांत हिंदू आहेत या देशांत यापुढं राह्यचं नाहीं असं मी ठरवलं आहे. सीतारामनं हें मला शिकवलं !"

२०

जयंतीं मोठ्या आनंदी वृत्तीनें महंमदपुरांतून बाहेर पडली. तिला कोणत्याही प्रकारें वाईट वाटत नव्हतें. उलट ती मनातून फार सुखी झाली होती. वाटेनें जात असतांना ती मनांतल्या मनांत ईश्वराला अनुलक्षून म्हणत होती, "जय जगन्नाथ ! तुझी दया अनंत आहे. तुझ्या महिमेला पार नाहीं. जो तुला ओळखत नाहीं, तुझं चिंतन करीत नाहीं, त्यालाच संकटें जाणवतात. प्रभो, संकटें कशाला म्हणतात तें मला कळत नाहीं. तूं मला ज्या परिस्थितींत लोटलं होतंस तें एक प्रकारें वैभवच होतं. मीं धर्मभ्रष्ट झालें होतें याची इतके दिवस मला जाणीव झाली नव्हती—कारण मीं खोट्या अभिमानानें अभिमानी बनलें होतें—खोट्या गर्वानें गर्विष्ठ झालें होतें—अहंकारानें निर्बुद्ध झालें होतें."

ईश्वराची जाणीव करून घेऊन त्याच्याशीं संभाषण करायची तिला संवय होती. मनांतल्या सर्व गोष्टी खुल्या दिलानें ती विश्वपित्याच्या समोर बोलून दाखवी. एकादी बालिका ज्याप्रमाणें आईबापांकडे हट्ट करते त्याचप्रमाणें जयंत परमपित्यासमोर हट्ट धरायला शिकली होती. यावेळीं तिनें असाच एक हट्ट धरला. हा हट्ट होता सीतारामसाठीं. सीतारामला जी दुर्बुद्धी झाली होती तिच्यापायीं तो सर्वनाश करून घ्यायला पात्र झाला होता. त्यांतून त्याचा

बचाव नाहीं का व्हायचा ? अनंत दयामय ईश्वराला त्याची दया नाहीं का यायची ?

जयंती हाच विचार करीत होती. तिला वाटत होतें, " हांक मारली कीं तो अवश्य ऐकतो. सीताराम हांक मारीत नाहीं ! तो हांक मारायला विसरला आहे. नाहींतर तो असा बुडायच्या पंथाला कां लागला असता ? पाप्याला देव हीच शिक्षा करीत असतो—दयामय देवाला हांक मारायला पापी विसरतो. तसाच सीताराम विसरला आहे ! तो न का हांक मारीना, त्याच्या वतीनं मीं जगदीश्वराला हांक मारली तर तो ऐकणार नाहीं का ? त्या पापी सीतारामला पापापासून मुक्त कर असं मीं मागणं केलं तर तो काय ऐकणार नाहीं ? जय जगन्नाथ ! सीतारामचा उद्धार झालाच पाहिजे. "

अशाच प्रकारें जयंती विचार करीत होती. जो बुद्धिभ्रष्ट झाला आहे त्याची हांक ईश्वर ऐकत नाहीं. या बाबतींत काय करावें याचा ती विचार करीत होती. यावेळीं श्री भेटली पाहिजे होती. श्री निघून गेली हें तिनें बरें केलें नाहीं—असें तरी कसें म्हणावें ? ती निघून गेली नसती तर काय झालें असतें तेंही सांगतां आलें नसतें.

जयंती त्यावेळीं श्रीच्या शोधार्थ निघाली. योग्यवेळीं तिची आणि श्रीची भेट झाली. झालेली सर्व हकिकत जयंतीनें श्रीला तपशिलवार सांगितली.

श्री खिन्न होऊन म्हणाली, " राजाचा अधःपात जवळ आला आहे. त्याच्या उद्धाराचा कांहीं मार्गच दिसत नाहीं का ? "

जयंती म्हणाली, " तो मार्ग दाखवणं आहे ईश्वराच्या हातीं. तो त्याला विसरला आहे. ज्या दिवशीं त्याला पुन्हां ईश्वराची आठवण होईल त्याच दिवशीं त्याच्या उन्नतीची पुन्हां सुरवात होईल. "

श्री म्हणाली, " तें व्हावं कसं ? मीं त्याच्या सहवासांत होतें तेव्हां सदासर्वदा ईश्वराबद्दलच बोलत होतें. लक्ष लावून ते माझं भाषण ऐकत होते. "

जयंती म्हणाली, " तूं बोलत होतीस, म्हणून तो लक्ष लावून ऐकत होता. तुझ्या मुखाकडे पहात राहिला होता, तुझं रूप पहात होता, तुझी वाणी ऐकून मुग्ध होत होता. ईश्वराच्या कथा त्याच्या कानीं जात नव्हत्या. मला असं सांग, त्यानं कधीं तुझ्या या भाषणावर प्रश्न केले होते का ? कोणत्याही तत्वाची मीमांसा करण्यासाठीं कांहीं विचारलं होतं का ? "

" नाहीं.—तें माझ्या ध्यानांत आलं नाहीं. " श्री म्हणाली, " मग आतां काय करायचं ? "

" तुला काय करतां येणार आहे ? " जयंती म्हणाली, " तूंच तर म्हणत होतीस, कीं तूं संन्यासिनी—तुला कर्म नाहीं—होय ना ? "

" तेंच तर तूं मला शिकवलंस ! " श्री म्हणाली.

" मी तुला असं का शिकवलं होतं ? " जयंती म्हणाली, " जें कर्म करायचं तें अनासक्त होऊन फलत्यागपूर्वक केलं तर तो कर्मत्यागच होतो. पतिसेवा करणं हें तुझं उचित कर्म नव्हे का ? "

श्री म्हणाली, " मग मला तिथं राहूं नकोस असं कां सांगितलंस तूं ? "

जयंती म्हणाली, " तूं म्हणत होतीस, कीं राजा घरून तुझे बारा शत्रू. इंद्रियगण ताब्यांत नसले तर पतिसेवा देखील सकाम होते. अनासक्ती असल्याशिवाय कर्म करीत असतां कर्मत्याग घडत नाहीं—म्हणूनच तुला तिथून निघून जायला सांगितलं. ज्याला जो भार सहन होत नाहीं तो त्यालां देऊं नये. "

श्री फारच ओशाळली. क्षणभर विचार करून ती म्हणाली, " याचं उत्तर उद्यां देईन. "

यानंतर त्या दिवशीं ती या बाबतींत कांहीं बोलली नाहीं. त्या दिवशीं ती जयंतीची भेटगांठ होण्यापासून दूर रहात होती. शेवटीं जयंतीनें तिला गांठलें आणि म्हटलें, " माझ्या प्रश्नाचं उत्तर काय देणार आहेस ग संन्यासिनी ? "

श्री म्हणाली, " पुन्हां एकदां माझी परीक्षा पहा. "

जयंती म्हणाली, " ठीक आहे ! तर मग चल आतां महंमदपुरला. आतां यापुढं तुझं कर्तव्य काय ह्याची चर्चा आपण वाटेनं जातां जातां करूं. "

दोघीही पुन्हां महंमदपुरकडे जायला निघाल्या.

२१

गंगाराम गेला, रमा गेली, श्री गेली, जयंती गेली, चंद्रचूड गेले, चांदशहा सुद्धां गेला, तरीही सीतारामला जाग येत नव्हती.

आतां शिल्लक राहिलीं फक्त मृण्मय आणि नंदा. नंदाला फार दुःख झालें होतें. नुसत्या पतिभक्तीच्या पायीं कांहीं राग थांबत नाहीं. नंदाला आतां कुणाचाच आधार नव्हता—नाहीं म्हणायला एक मृण्मय तेवढा होता. नंदानें एक दिवशीं मृण्मयला बोलावणें धाडलें. यापुढें काय करावें हें ती त्याला विचारणार होती.

तें बोलावणें मृण्मयला पोहोंचलें नाहीं. त्याच दिवशीं सकाळीं मृण्मय मृत्यू पावला होता.

त्या दिवशीं घटना घडली ती अशी—सकाळींच उठतेवेळीं मृण्मयला कळलें, कीं मुसलमानांची सेना महंमदपूरवर चाल करून येत आहे—जवळ जवळ आलीच आहे—किल्ल्यापर्यंत येऊन पोंचली आहे. ती बातमी ऐकतांच मृण्मयवर वज्राघात झाला. लढाईची कसलीच तयारी नव्हती. वेळीं येऊन आगाऊ बातमी कळवायला चंद्रचूडांचे गुप्तहेर आतां तिथें नव्हते. ती बातमी कळतांच मृण्मय स्वतः विशेष हकिकत कळून घेण्यासाठीं घोड्यावर बसून निघाला. थोडासा पुढें गेला नाहीं तोंच त्याला समोर मुसलमानांची फौज दिसली. पळून जाणें हें त्याचें ब्रीद नव्हतें, अर्थात् तो एकटाच त्यांच्या तावडींत सांपडल्यामुळें हकनाहक मारला गेला.

मुसलमानांच्या फौजेनें येऊन सीतारामच्या किल्ल्याला वेढा दिला. होते न होते ते नागरीक घरदार टाकून पळून गेले. चित्तविश्रामांत सुंदर स्त्रिया गोळा करून सीताराम बेभान होऊन पडला होता तिथें कुणीतरी जाऊन बातमी दिली, 'मृण्मय मारला गेला. मुसलमानांच्या फौजेनें येऊन किल्ल्याला वेढा दिला आहे.'

सीतारामला वाटलें, आज सर्वांचा शेवट झाला. भोगविलासाचा, राज्याचा आणि जीवनाचाही आज शेवट झाला. बायकांचा काफिला सोडून देऊन तो जायला निघाला तेव्हां त्या बायकांनीं विचारलें, "आम्हांला टाकून कुठं निघालां महाराज ?"

सीतारामनें चपराशाला सांगितलें, "यांना छड्या मार आणि घालवून दे."

त्या बायका ही: ही: करून हंसूं लागल्या. त्यांना थांबवून त्यांतली एकजण राजाच्या समोर आली आणि म्हणाली, "महाराज, आज आम्हांला कळून

आलं, खरोखरच धर्म म्हणून कुठं तरी आहे ! आम्हीं कुलीनांच्या कन्या— तुम्हीं आमचा कुलनाश केला, धर्मनाश केला, त्याचं कांहीं प्रतिफल नाहीं असं का तुम्हांला वाटलं होतं ? आमच्या पैकीं कित्येकांच्या आया रडताहेत, बाप रडताहेत, कित्येकांचे पति रडताहेत, कित्येकांची मुलंबाळं रडताहेत— त्यांचा तो आकांत ईश्वराच्या कानीं गेला नाहीं असं का तुम्हांला वाटलं होतं ? महाराज, आतां नगरांत जाऊं नका. जंगलांत जा. माणसांच्या वस्तींत आतां यापुढं तोंड दाखवूं नका. एक गोष्ट ध्यानांत ठेवा—धर्म म्हणून कुठं तरी आहे ! ”

तिला कांहीं उत्तर न देतां राजा घोड्यावर बसला आणि घोड्याला चाबूक मारून वायुवेगानें दुर्गद्वाराकडे निघाला. त्या बायका त्याच्या मागोमाग धांवत सुटल्या होत्या. कुणी म्हणाली, ‘ चला या. राजाची राजधानी लुटूं या. सीतारामचा सर्वनाश डोळेभर बघून घेऊं या. ’

तें त्यांचें भाषण राजाच्या कानीं गेलें नाहीं.

राजानें जाऊन पाहिलें तों त्याला दिसून आलें, कीं मुसलमानांच्या फौजेनें अजून साऱ्या किल्ल्याला वेढा दिला नव्हता. ते नुकतेच येत होते. ते येत असतांनाची धूळ उडत होती. पताका फडफडत होत्या. घोडेस्वार वेगवेगळ्या दिशेनें धांवत जाऊन जागा पकडीत होते. फौजेचा मुख्य भाग किल्ल्याच्या दारा-समोर येऊं लागला होता. किल्ल्यांत प्रवेश करून सीतारामनें मोठा दरवाजा बंद करून घेतला.

राजा चोहींकडे हिंडून पहात होता. फारसे शिपाई कुठें दिसत नव्हते. बरेच दिवसांत पगार न मिळाल्यामुळें ते यापूर्वीच पळून गांवोगांवीं गेले होते. जे कांहीं शिल्लक होते ते मुसलमान येत आहेत आणि मृण्मयला त्यांनीं मारलें आहे ही बातमी कळतांच कुठें तरी पसार झाले होते.

शिल्लक राहिले होते काय, ते चारदोन ब्राह्मण आणि रजपुत. ते सच्चे राजभक्त होते. ज्याचें मीठ खाल्लें त्याला दगा द्यायचा नाहीं असें म्हणण्याइतकी नेकी ज्यांच्याठायीं होती तेवढेच काय ते टिकून राहिले होते.

इकडेतिकडे तपास केल्यावर कसेबसे पन्नासजण उभे राहिले. तेवढ्यानें काय होणार होतें ?

राजाला वाटलें, अनेक पापें केलीं, आतां एवढें तरी नको. या लोकांचा तरी जीव वांचवावा. धर्माची आठवण ठेवावी.

राजानें पाहिलें, अधिकारीवर्गापैकीं कुणीही माणूस राहिला नव्हता. सारे लोक आपापला पैसा आणि जीव घेऊन दूरदेशीं पळून गेले होते. नोकर लोकांचा पत्ता नव्हता. बऱ्याच जुन्या असलेल्या दासदासींपैकीं एकदोन माणसें जिवावर उदार होऊन धन्याला धरून राहिलीं होतीं. तीं सारीं रडत होतीं, पण राजाला टाकून जात नव्हतीं.

राजा अंतःपुरांत गेला. तिथेंही सर्वत्र शुकशुकाट झाला होता. जातीचे, नात्याचे, आपले-परावे जे जे कुणी वाड्यांत येऊन राहिले होते ते या पूर्वीच जीव घेऊन पळून गेले होते. हें एवढें मोठें राजभवन, आज अरण्यासारखें झालें होतें. जनशून्य झालें होतें. निःशब्द झालें होतें. जिकडे तिकडे औदासीन्याची छाया पसरली होती.

राजाच्या डोळ्यांना पाणी आलें.

राजाला निश्चितपणें माहित होतें, कीं नंदा कुठें जाणार नाहीं. कुठें जायला तिला आधारच नव्हता. डोळे पुशीत पुशीत तो नंदाचा शोध करण्यासाठीं निघाला.

धडाम् धुडूम् आवाज होत होता. मुसलमानांच्या तोफा आवाज देऊं लागल्या होत्या. मुसलमानांची फौज येऊन किल्ल्याला भिडली होतीं आणि तटबंदी फोडायला त्यांनी सुरवात केली होती.

बाहेर चाललेला तो प्रचंड कोलाहल अंतःपुरापर्यंत ऐकूं येऊं लागला होता.

राजा नंदाच्या महालांत आला. नंदानें धरणीवर अंग टाकलें होतें. तिच्या आजूबाजूला तिचे मुली, मुलगे आणि रमेचा मुलगा बसून रडत होते.

राजाला पाहतांच नंदा म्हणाली, " हाय महाराज ! हें काय केलंत ? "

राजा म्हणाला, " जें नशिबीं लिहिलं होतं तेंच केलं. पहिलं घडलं तें हें, कीं मीं पतिघातिनीशीं लग्न केलं. तिच्या ग्रहदशेच्या फेऱ्यांत सांपडून ही दुर्बुद्धी झाली आणि आतां हा मृत्यूचा प्रसंग ओढवला आहे.

नंदानें विचारलें, " पतिघातिनी कोण ? श्री का ? "

राजा म्हणाला, " हो. श्रीच ! मीं बोलत होतों तो तिच्याबद्दलच. "

" आम्हीं जिला डाकिणी म्हणून समजत होतों ती श्रीच का ? " नंदा म्हणाली, " इतके दिवस मला हें कां सांगितलं नाहींत महाराज ? "

समोर मृत्यू दिसतांनाही नंदाची मुद्रा प्रफुल्लित झाली.

राजा म्हणाला, " बोललों असतों तरी काय होणार होतं ? डाकिणी असो कीं श्री असो, परिणाम झाला तो एकच. आतां समोर मृत्यू उभा ठाकला आहे."

नंदा म्हणाली, " महाराज, ज्याला शरीर आहे त्याला मृत्यू आहेच. मीं मृत्यूला भीत नाहीं. पण तुम्हीं योद्धे-लक्ष योद्धयांचे नायक होऊन तुम्हांला मृत्यू यावा आणि मीं तुमच्या मागं सती जावं, असं माझ्या नशिबांत नव्हतंच का लिहिलेलं ? "

राजा म्हणाला, " लक्षयोद्धे तर नाहींतच, पण आज माझ्यापाशीं पुरते शंभर सुद्धां लढवय्ये नाहींत ! नसेनात का—मीं कुच्याच्या मोतीनं मरणार नाहीं. मीं लढत लढतच रणांगणावर मरेन. यावेळीं आतां मला अडथळा करायची कुणाचीही छाती नाहीं. मी आतां किल्लयाचं दार खुलं करतों आणि मुसलमानांच्या सैन्यांत एकटाच प्रवेश करतों, तुला हेंच सांगायला आणि हत्यारं घ्यायला मीं आलों होतों. "

नंदाच्या डोळयांतून आसवांच्या धारा मोठ्या जोरानें वाहूं लागल्या. डोळे पुसून घेऊन ती म्हणाली, " महाराज, मीं यावेळीं जर तुम्हांला नको म्हटलं तर तुमची दासी व्हायला मीं अपात्र ठरेन. तुम्हीं आतां सावध झालां हेंच मोठं भाग्य असं मला वाटतंय. यापूर्वीच जर असं झालं असतं तर ! आतां या प्रसंगीं तुम्हींही जाल—मीही जाईन—तुमच्याबरोबर सती जाईन—पण मला काळजी वाटत्येय ती या अजाण मुलांची. यांचं काय होईल ? हीं मात्र मुसलमानांच्या हातीं सांपडतील ! "

नंदाला एकदम रडण्याचा मोठा उमाळा आला.

राजा म्हणाला, " म्हणूनच तूं मरतां कामा नये. यांच्यासाठीं तूं जगून राह्यलं पाहिजे. "

नंदा म्हणाली, " मीं राहिलें तरी यांचा बचाव व्हायचा कसा ? "

राजा म्हणाला, " नंदा, एवढे लोक पळून गेले—तूं कां गेली नाहींस ? तूं गेली असतीस तर हीं मुलं बचावलीं असतीं. "

नंदा म्हणाली, " मीं तुमची राणी. मीं कुणाबरोबर पळून जाऊं महाराज ? तुमची परवानगी न घेतां तुमचीं हीं मुलं कुण्याच्या हातीं सोपवूं ? पुत्र काय कीं कन्या काय, सारीं कांहीं धर्मासाठीं. माझा धर्म तुम्हीं — तुम्हांला टाकून मीं पुत्रकन्या घेऊन जाऊं कुठं ? "

राजा म्हणाला, " पण आतां याला उपाय काय ? "

नंदा म्हणाली, " आतां कांहीं उपाय नाहीं. अनाथ पाहून मुसलमानांनीं दया केली तरच बचाव ! नाहीं केली तर देवाच्या मनांत जसं असेल तसं होईल. महाराज, राजाच्या कुशीला यांचा जन्म झाला आहे. राजकुलाच्या भाग्यांत संपदा विपदा दोन्हींही असतात, त्याचं मला कांहीं वाटत नाहीं, पण पुढं कुणी तुम्हांला भेकड म्हणतील हेंच माझ्या मनाला लागतंय. "

राजा म्हणाला, " तर मग देवाच्या मनांत असेल तसंच होईल. या जन्मीं ही तुझी आणि माझी शेवटची भेट. " असें म्हणून राजा तिथून एकदम निघाला आणि लढाईची तयारी करण्यासाठीं शस्त्रागारांत गेला.

नंदाही मुलांमुलींना बरोबर घेऊन राजाच्या मागोमाग शस्त्रागारांत गेली. राजा लढाईच्या तयारीनें साजसज्जा करूं लागला त्यावेळीं मुलें उराशीं कवटाळून धरून डोळे पुशीत ती तें दृश्य पहात होती.

लढाईचा वेष चढवून शस्त्रें हातीं घेतलीं त्यावेळीं सीताराम आतां पूर्वीच्या सीतारामासारखा शोभिवंत दिसूं लागला. वीराच्या रुबाबांत तो मरणाला तोंड देण्यासाठीं एकटाच किल्ल्याच्या दाराकडे निघाला तेव्हां नंदा धरणीवर अंग टाकून टाहो फोडून रडूं लागली.

तो एकटाच किल्ल्याच्या दाराकडे जायला निघाला होता. ज्या मंचावर जयंतीची विटंबना करण्यासाठीं तिला चढवलें होतें, त्या मंचावर कुणीतरी दोन व्यक्ति बसलेल्या होत्या. त्यांना पाहतांच मरायला तयार झालेल्या त्या योद्ध्याच्या हृदयांतही भीतीचा संचार झाला. तो तसाच त्यांच्या जवळ गेला. पहातो तो हातीं त्रिशूळ घेतलेली, काषायवस्त्रधारी, भस्म-रुद्राक्षविभूषिता जयती तिथें पाय झुलवीत बसली होती. तिच्याच शेजारीं तशाच भैरवीच्या वेषांत श्रीही होती.

असल्या बिकट प्रसंगीं अशा वेषांत आणि अशा जागीं त्या बसलेल्या पाहून राजा थोडासा बावरला. तो म्हणाला, "माझ्या या शेवटच्या क्षणाच्या वेळीं तुम्हीं कां इथं येऊन बसलां आहां? अजूनही तुमच्या मनाचं समाधान नाहीं का झालं?"

जयंती थोडीशी हंसली. राजानें श्रीकडे पाहिलें. ती गहिंवरली होती. तिचे डोळे भरून आले होते. बोलावें असें वाटत असलें तरी तिच्या तोंडून शब्द बाहेर फुटत नव्हता. राजा तिच्या तोंडाकडे पहात होता. श्री कांहीं बोलली नाहीं.

राजा म्हणाला, "श्री, शेवटीं तुझं नशिब फळाला आलं. माझ्या मृत्यूचं कारण तूं. प्रियप्राणहंत्री म्हणून पूर्वी मीं तुला टाकून दिलं होतं तेंच बरं केलं होतं. आतां तें भविष्य खरं होतंय—आतां कशाला आली आहेस?"

श्री म्हणाली, "माझं जें जीवनाचं कर्तव्य म्हणून आहे, तें करायला मीं आलें आहे. आज तुमचा मृत्युकाल जवळ आला आहे—मीं तुमच्या बरोबर मरायला आलें आहें."

"संन्यासिनी काय सती जात असते?" राजानें विचारलें.

"संन्यासिनी असो कीं गृहिणी असो, सर्वांनांच मरायचा अधिकार आहे!" श्री म्हणाली.

राजा म्हणाला, "संन्यासी निष्कर्म असतो. तूं कर्मत्याग केला आहेस. तूं काय म्हणून माझ्याबरोबर मरायला निघाली आहेस? माझ्याबरोबर नंदा जाईल—तशी ती तयारही झाली आहे—तूं आपला संन्यासधर्म पाळ."

श्री म्हणाली, "महाराज, हा वेळपर्यंत तुम्हीं माझ्यावर राग धरला नाहीं—आज तरी राग धरूं नका. तुमचा आणि माझा आज मृत्युकाल समोर आला आहे. त्यावेळीं तुमच्यापाशीं मीं जो अपराध केला आहे त्याची मला जाणीव झाली आहे. आपल्या पायावर मस्तक ठेवून—" असें म्हणून श्री त्या मंचावरून खालीं उतरली आणि सीतारामाच्या पायावर मस्तक ठेवून गर्जून म्हणाली, "—तुमच्या पायावर हात ठेवून मीं सांगतें आहें—यापुढं मीं संन्यासिनी नाहीं. माझ्या अपराधाची मला क्षमा कराल का? पुन्हां माझा स्वीकार कराल का?"

"तुला तर मीं मोठ्या आवडीनं स्वीकारलं होतं!" सीताराम म्हणाला, "आतां पुन्हां स्वीकार करायची वेळ ही नाहीं."

"हीच वेळ आहे!" श्री म्हणाली, "यापुढं मरायला पुरेसा वेळ आहे मला."

सीताराम उद्‌गारला, "तूंच माझी पट्टराणी!"

श्रीनें राजाची पायधूळ मस्तकावर धारण केली.

जयंती म्हणाली, "माझा भिकारणीचा आशीर्वाद आहे तुम्हांला! आजपासून अनंत कालपर्यंत तुम्हीं उभयतां विजयी होऊन रहा."

"मीं तुझा अनंत अपराधी आहें माताजी!" सीताराम उद्गारला, "तूं आज माझी दुर्दशा पाहायच्या वेळीं आली आहेस खरी—तें मीं ध्यानीं घेत नाहीं—तुझा आशीर्वादच सांगतोय कीं तूं खरोखरच देवी आहेस! आतां मला सांग, मीं कोणतं प्रायश्चित्त केलं कीं तूं प्रसन्न होशील?—ऐक, ही मुसलमानांची तोफ झडते आहे—ऐक—या तोफेच्या तोंडीं आज मीं माझा देह समर्पण करणार आहें. आतां याचवेळीं मला सांग, कीं मीं काय केलं कीं तूं प्रसन्न होशील?

जयंती म्हणाली, "पूर्वी एकदां तुम्हीं एकट्यानंच या किल्ल्याचं रक्षण केलं होतं."

राजा म्हणाला, "आज ते होणं शक्य नाहीं. पाण्यांत आणि कोटकिल्ल्यांत फार मोठा फरक आहे. आज एकटाच या किल्ल्याचं रक्षण करील असा एकही मनुष्य या पृथ्वीतलावर सांपडणार नाहीं."

जयंती म्हणाली, "अजूनही पन्नास शिपाई तुमच्यापाशीं आहेत!"

"हा कोलाहल ऐकलात? "राजा म्हणाला," या एवढ्या अफाट सैन्यापुढं पन्नास शिपायांचा काय पाड? माझे प्राण मीं वाटेल तसे, वाटेल तिथं खर्ची घालीन, पण या निरपराध माणसांची हत्या मीं काय म्हणून करूं? पन्नास शिपाई घेऊन लढाईला तोंड देणं म्हणजे मृत्यूच्या जबड्यांत उडी घेणं—आतां कशाला तें?"

श्री म्हणाली, " महाराज, मीं आणि नंदा मरायला तयार झालों आहों, पण नंदा आणि रमा यांची जीं मुलं आहेत त्यांचं रक्षण करायचा कांहींसुद्धां उपाय नाहीं का ? "

आतां सीतारामाच्या डोळ्यांना पाणी आलें. तो म्हणाला, " कांहीं उपाय नाहीं ! काय करणार आतां ? "

जयंती म्हणाली, " महाराज, निरुपायालाही एक उपाय आहे—तो माहित नाहीं का तुम्हांला ! तुम्हांला तो माहित आहे—माहित होता—कळून सवरून ऐश्वर्याच्या कैफांत तुम्हीं तो विसरलां होतां—आतां तो निरुपायाचा उपाय—अगतिकाची गती, अनाथाचा नाथ, आठवत नाहीं तुम्हांला ! "

सीतारामानें मान खालीं घातली.

कितीतरी दिवसांनी त्याला आठवण झाली. हृदयाच्या आकाशांत आलेले काळे ढग वाऱ्यासरशीं उडून गेले. त्याच्या हृदयांत हळूहळू थोडाथोडा सूर्याचा प्रकाश उजळूं लागला.

तो अंतर्मुख झाला. चिंतन करतां करतां अनंत ब्रह्मांडाला प्रकाश देणारी ती महाज्योती एकाएकीं उजळली.

सीताराम मनांतल्या मनांत धांवा करूं लागला, " हे नाथ ! दीनानाथ ! अनाथनाथ ! निरूपायाचा उपाय—अगतिकाची गती—पुण्यवंतांचा आसरा—पापिष्ठाचा परित्राता—कुठं आहेस तूं ? मीं पापी आहें म्हणून तूं काय माझ्यावर दया करणार नाहींस ?—"

सीताराम निःस्तब्ध होऊन ईश्वर चिंतन करीत आहे असें पाहून जयंतीनें श्रीला खूण केली. त्या दोघीहीं त्या मंचकावर गुढघे टेंकून बसल्या. त्या दोघींनीं हात जोडले. नजर वर लावली. त्या ईश्वराचा धांवा करूं लागल्या. त्यांच्या अंतःकरणांतून पिळवटून निघणारी ती हांक ईश्वराच्या कानीं पोहोंचली नसेल का ?

किल्ल्याच्या बाहेर मुसलमानांच्या फौजेचा गलबला वादळी समुद्राच्या गर्जनेसारखा ऐकूं येत होता. किल्ल्याचा तट कोसळून घालण्यासाठीं केलेला तोफांचा भडिमार सारीं मैदानें, साऱ्या जंगलांजंगलांतून, नदी–नाल्याच्या वळणावळणांतून प्रतिध्वनित होत होता.

किल्ल्यांत चिटपांखरूंही नव्हतें. तोफांच्या आवाजाच्या कडाडणाऱ्या पडसादाखेरीज किल्ल्यांत सर्वत्र सामसूम होतें. त्या शब्दशून्य वातावरणांत साक्षात् ज्ञानरूपी जयंती आणि भक्तिरूपी श्री, ईश्वराला आळवण्यासाठीं जो स्तुतिपाठ करीत होत्या तो ऐकतांना सीतारामाच्या देहावर रोमांच उभे रहात होते.

तें स्तोत्र ऐकतां ऐकतां सीताराम भान विसरला. समोर उभें राहिलेलें संकट विसरला. तो हात जोडून उभा राहिला होता. त्याची नजर आकाशाकडे लागली होती. त्याच्या डोळ्यांतून आनंदाश्रूंचा पाझर सुरू झाला होता.

सीतारामचें अंतःकरण पश्चात्तापाच्या अग्नीनें आतां विशुद्ध झालें होतें. जयंती आणि श्री मुक्तकंठानें हरिनामाचा घोष करीत होत्या. मंत्रमुग्ध झाल्याप्रमाणें सीताराम तो ऐकत स्तब्ध होऊन उभा राहिला होता. त्या हरिनामध्वनीला विक्षेप झाला.

किल्ल्यांत एकदम गलगा झालेला ऐकूं आला. कुणीतरी गर्जना करीत होते—"जय महाराजकी जय ! जय सीतारामकी जय !"

२२

त्या किल्ल्यांत शिपाई रहात होते—पण ते पूर्वीच्या काळीं. आज ते शिपाई बहुतेक किल्ला सोडून पळून गेले होते. केवळ पन्नासएक नेकीचे प्रभुभक्त ब्राह्मण आणि रजपूत तेवढे पळून गेले नव्हते.

ते अगदीं निवडक लढवय्ये होते. ते तसे निवडक होते, म्हणूनच कित्येक दिवस वेतन मिळालें नसतांही जिवावर उदार होऊन धन्याचा बचाव करण्यासाठीं किल्ल्यांत राहिले होंते. यावेळीं ते अत्यंत अस्वस्थ झाले होते.

इकडे मुसलमानांची फौज दाराशीं आली होती. जिकडे तिकडे हलकल्लोळ उडाला होता. तोफेच्या गडगडाटानें धरणी कांपूं लागली होती. तोफेच्या गोळ्यांनीं किल्ल्याची तटबंदी ढांसळूं लागली होती, तरीही त्यांना कुणी लढाईला तोंड द्यायला हुकूम करीत नाहीं म्हणून ते अस्वस्थ झाले होते. राजेसाहेब स्वतः येऊन सारें कांहीं पाहून गेले. मग काय ? लढाईला तयार व्हायला त्यांनीं हुकूम दिला नाहीं कसा ? आज ते जे पळून न जातां किल्ल्यांत राहिले होते ते धन्याच्या संरक्षणार्थ प्राण देण्यासाठीं ! त्यांचे दुसरें कांहींच

मागणें नव्हतें,—मग तसें कुणी सांगत नाहीं काय म्हणून ? 'चला या—माझ्यासाठीं मरायला तयार व्हा !' असें कोण कां म्हणत नाहीं ? म्हणूनच ते अत्यंत अस्वस्थ झाले होते.

आतां ते सारे एका जागीं गोळा झाले. त्यांनीं एक बैठक घेतली. रघुवीर मिश्र हा त्यांच्यांतला सर्वांत वयोवृद्ध आणि अधिकारी योद्धा होता. तो पुढें सरसावला आणि सर्वांची समजूत घालण्यासाठीं म्हणाला, "भाई हो ! मुसलमान आतां घरांत शिरतील आणि उंदीर घुशी सारखे आम्हांला घुसडून मारतील—तें बरं होईल का ? चला या, मरायचं असलं तर मर्दासारखे मरूं या चला. चला, आपण आतां लढाई करण्यासाठीं तयार होऊं. कुणी हुकूम देत नाहीं—न का देईना !—मरायला कशाला कुणाचा हुकूम पाहिजे ? महाराजांचं मीठ खाल्लं आहे आपण—महाराजांसाठीं आपण लढाईला तोंड देऊं. हुकूमाची पर्वा यावेळीं कसली करायची ? महाराजांसाठींच ना आपण हातीं हत्यार धरलं आहे ? चला—हुकूम असो कीं नसो, आपण आतां लढाईला तोंड देऊं !"

या प्रस्तावाला सर्वत्रांनीं एकमुखानें संमति दिली.

तितक्यांत एका शिपायानें एक शंका काढली. तो म्हणाला, "आपण लढायचं कसं ? यावेळीं किल्ल्याचा बचाव करायचं एकुलतंएक साधन म्हणजे तोफ ! पण गोलंदाजफौज तर सारी पळून गेली आहे. तोफ कशी चालवायची हें आमच्यापैकीं कुणालाही माहित नाहीं, मग आम्हीं कोणत्या प्रकारें लढायचं ?"

या प्रश्नावर सर्वांची चर्चा सुरू झाली. निश्चितपणें कुणालाच कांहीं सांगतां येईना असें पाहून त्यांचा जमादार म्हणाला, "यावेळीं ही नसती चर्चा कशाला ? आपल्यापाशीं हत्यारं आहेत, घोडे आहेत, राजेही इथं किल्ल्यांतच आहेत—चला, आपण हत्यारबंद होऊं आणि घोड्यावर स्वार होऊन राजे-साहेबांपाशीं जाऊं. पुढं राजे सांगतील तसं करूं म्हणजे झालं."

तो प्रस्ताव सर्वत्रांना पटला. सर्वानुमतें तसेंच करावें असें ठरलें. सर्वजण तांतडीनें तयारी करूं लागले. सर्वत्रांनीं आपले पोशाख चढवले, हत्यारें घेतलीं, घोड्यावर जिनें कसलीं आणि लढाईच्या तयारीनें ते स्वार होऊन निघाले.

घोड्याच्या टापा वाजत होत्या. हत्यारांचा खणखणाट होत होता. सर्वजण एका आवाजांत काळीज फोडून ओरडले, ' जय महाराजकी जय ! जय राजा सीतारामकी जय ! '

सीतारामच्या कानीं जी जयजयकाराची गर्जना आली ती हीच !

२३

लढवय्ये लोक जयजयकार करीत करीत जिथें सीताराम, जयंती आणि श्री उभीं होतीं त्या जागीं रांगेनें येऊन उभे राहिले. आल्याबरोबर त्यांनीं पुन्हां एकदां जयध्वनी केला.

रघुवीर मिश्रानें विचारलें, " महाराजांचा काय हुकूम आहे ? महाराजांचा हुकूम झाला तर आम्हीं जे कांहीं मुठभर लोक आहोंत ते आमची मुंडी रणांगणावर वाह्यला आलों आहोंत—"

सीताराम म्हणाला, " तुम्हीं लोक थोडा वेळ इथंच थांबा. मीं जरा जाऊन येतों. " असें म्हणून तो अंतःपुराकडे निघून गेला.

जयंती आणि श्री या दोघीही संन्यासिनी ईश्वराचीं स्तुतिस्तोत्रें मुक्तकंठानें गात होत्या. आलेले शिपाई भक्तिभावानें त्यांचें तें स्तोत्रगान स्तब्ध राहून ऐकत होते. त्यांच्यापैकीं कुणीही एवढीसुद्धां हालचाल करीत नव्हता.

थोड्या वेळानें राजा एक डोली बरोबर घेऊन अंतःपुरांतून बाहेर आला. राजवाड्यांतील सर्व नोकर यापूर्वीच पळून गेले होते. जुन्या जमान्यांतले चारदोन नोकर जे निष्ठेनें राहिले होते त्यांनींच ही डोली वाहून आणली होती. या डोलींत नंदा आणि सर्व मुलें होतीं.

तिथें आल्याबरोबर राजानें शिपायांना रांगेत उभें केलें. प्राचीन पद्धतीला अनुसरून त्यानें एका सूचीव्यूहाची रचना केली. त्या व्यूहाच्या मध्यभागीं नंदा असलेली डोली होती. स्वतः राजा घोड्यावर स्वार होऊन व्यूहाच्या तोंडाशीं उभा होता.

राजानें जयंती आणि श्री यांना हांक मारून म्हटलें, " तुम्हीं बाहेर कां ? व्यूहाच्या आंत तुम्हीं दोघीही प्रवेश करा. "

जयंती आणि श्री दोघीही हंसल्या. त्या म्हणाल्या, "आम्हीं आहों संन्यासिनी. आमच्या लेखीं जगणं आणि मरणं दोन्हीं सारखींच आहेत."

त्यांचें तें उत्तर ऐकून सीताराम त्यावर कांहीं बोलला नाहीं. 'जय जगदीश्वर! जय लक्ष्मीनारायण जी!' अशी हांक ठोकून तो किल्ल्याच्या दाराकडे जायला निघाला. तो छोटासा सूचीव्यूह त्याच्या मागोमाग चालूं लागला होता. दोघीही संन्यासिनी हातांतला त्रिशूल उंचावून मोठमोठ्यानें शंकराचें स्तोत्र गात होत्या, तें पाहून राजा आश्चर्यचकित होऊन म्हणाला "हें काय चाललंय? या गर्दीत तुडवल्या जाल कीं तुम्हीं!"

श्री म्हणाली, "महाराज, राजे लोकच काय ते निर्भय असतात होय? संन्यासी काय मरणाला भीतात!"

जयंती मात्र कांहींच बोलली नाहीं. दर्पोक्ति काढणें आतां तिला मानवत नव्हतें. या बायका आपलें म्हणणें ऐकणार नाहींत अशी खात्री झाल्यामुळें तो नंतर कांहीं बोलला नाहीं.

तीं सर्व मंडळी किल्ल्याच्या दारापाशीं आली. राजानें स्वतःच्या हातानें किल्ली लावून दाराचें कुलूप उघडलें आणि दारावरची अर्गळा खुली केली, त्यासरशीं सुटलेल्या सांखळीचा मोठा झणझणाट झाला. सिंहद्वारावरच्या बुरूजावर त्या झणझणाटाचे मोठे पडसाद उठले. घोड्यांच्या टापांचे आवाजही प्रतिध्वनित होऊं लागले होते.

तितक्यांत बाहेरून दार लोटलें गेलें. समोर मुसलमानांची फौज दिसत होती. दरवाजा उघडला गेला असें पाहून सूचीव्यूहांत असलेले शिपाई थयथय नाचूं लागले.

बांध कोसळल्याबरोबर तुंबलेलें पाणी डोंगरावरून कोसळणाऱ्या धबधब्यासारखें जसें जोरानें वाहूं लागतें, त्याचप्रमाणें किल्ल्याचें दार उघडलेलें पहातांच मुसलमानांची फौज एकदम आंत घुसूं लागली.

घुसतां घुसतां ते थांबले. समोर जयंती आणि श्री या दोघींना पाहतांच मंत्र टाकलेल्या सापासारखे ते एकदम निश्चल झाले.

तें दृश्य अपूर्व होतें. भैरवीच्या अद्भुत वेषांत हातीं त्रिशूल धारण करून अत्यंत निर्भय वृत्तीनें दोघीही खड्या आवाजांत जयगान करीत असलेल्या

समोर पाहून मुसलमान चकित झाले. त्या नगररक्षण करणाऱ्या देवता असाव्या असें वाटून मुसलमान शिपायांनीं घाबरून त्यांना रस्ता करून दिला. त्रिशूलाचा फाळ पुढें करून त्या रस्ता मोकळा करीत चालल्या होत्या. मुसलमानांचें सैन्य त्यांच्यापुढें येतांच त्यांना वाट करून देत होतें. अशा रितीनें मोकळ्या झालेल्या वाटेनें सीतारामचा सूचीव्यूह पाहातां पाहातां मुसलमान सैन्याची फळी फोडून जेव्हां जाऊं लागला तेव्हां सीतारामचें हृदय भरून आलें. ईश्वरानेंच खैर केली असें त्याला वाटूं लागलें होतें.

आतां सीतारामची एकच इच्छा होती—जगदीश्वराचें स्मरण करून त्याच्या निर्देशाप्रमाणें रणांगणावर देह ठेवायचा. यावेळीं तो निष्काळजी झाला होता. दृढप्रतिज्ञ झाला होता. प्रफुल्ल चित्तानें आणि हंसतमुखानें पुढला मार्ग आक्रमण करण्यासाठीं तो बद्धपरिकर झाला होता. त्या भैरवींच्या तोंडच्या ईश्वराचा जयजयकार कानीं पडल्यामुळें त्याच्या हृदयांत वीरश्रीचा विलक्षण संचार झाला होता. त्याला वाटत होतें—या ईश्वरी तेजापुढें मुसलमानांची काय कथा !

बेडरपणें तो पुढें जात आहे—बरोबर नुसते मुठभर शिपाईच आहेत असें पाहून मुसलमानांचे शिपाई 'मार मार' म्हणून ओरडत पुढें सरसावले. पुढें जाणाऱ्या दोघां संन्यासिनींना कुणी अडवलें नाहीं. त्यांना जरी ते रस्ता मोकळा करून देत होते तरीही सीताराम आणि त्याचे शिपाई पुढें येतांच त्यांना ते चारी बाजूनें घेरूं लागले होते.

सीतारामच्या शिपायांनीं त्याचा हुकूम तंतोतंत पाळला होता. कोणत्याही प्रकारें लढायला उद्युक्त झाल्याचें घोरण न दाखवितां ते तडक पुढें चालूं लागले होते. त्यांतले कांहीं मुसलमानांच्या फटक्यानें खालीं पडले, कांहीं घोड्यावर स्वार झालेले जखमी झाले, पण एक माणूस पडतांच दुसरा त्याच्या जागीं उभा राही आणि कोणत्याही रीतीनें लढायचा आवेश न आणतां पुढें चालू लागे.

अशा प्रकारें सीतारामचा सूचीव्यूह अभेद्य राहून हळूहळू मुसलमान सेनेचा मध्यभाग भेद करून चालला होता. समोर श्री आणि जयंती वाट करून देत होत्या. बरोबरच्या शिपायांवर भयंकर आक्रमण होत होतें तरीही ते निश्चल

राहिले होते. सीताराम त्यांना क्षणोक्षणीं उत्साह देत होता. त्याच्या हुकूमाप्रमाणें वागत ते शिपाई सारे अडथळे टाळून पुढें जात होतो. ते मार्गें पहात नव्हते. आतां कुणी समोर आला तर त्याला लोटून देऊन, स्वार असला तर त्याला घोड्यावरून कोसळून घालून, क्वचित् एकाद्याला घोड्याच्या टापांखालीं तुडवीत ते पुढला रस्ता काटीत होते.

हा अद्‌भुत प्रकार मुसलमानांचा सेनापती पहात होता. सीतारामला पुढें जातां येऊं नये म्हणून त्यानें सूचीव्यूहाच्या समोर एक तोफ पाठवून दिली. यापूर्वी किल्ल्याची तटबंदी कोसळून घालण्यासाठीं मुसलमानांनीं सर्व तोफा वेगवेगळ्या जागीं नेऊन ठेवल्या होत्या. त्यामुळें सेनापतीनें हुकूम केला तरीही सूचीव्यूहासमोर तोफ आणून ठेवायला त्यांना फार वेळ लागला.

राजा आणि राणी पळून जात आहेत, याचा सेनापतीला पत्ता लागला होता. म्हणूनच त्यानें तोफ आणून ठेवण्याची घाई केली. तोफ आणून ठेवायला सर्वत्रांना मोठे कष्ट पडले.

स्वतः सेनापतीला सूचीव्यूहासमोर येणें शक्य झालें नाहीं. किल्ल्याचें दार मोकळें झाल्यामुळें सैन्यांतले बरेचसे लोक लूटमार करण्याच्या लोभानें शहरांत घुसूं लागले होते. सेनापति तसा गेला नसता तर राजभांडार लुटून सर्व शिपायांनीं तें आत्मसात् केलें असतें.

सीतारामच्या सूचीव्यूहासमोर तोफ आणून उभी करण्यांत आली. तोफ समोर आलेली पाहतांच बरोबरच्या शिपायांचें अवसान खचलें, पण त्या दोघी मैरवी मात्र डगमगल्या नाहींत. श्री आणि जयंती या दोघीही जाऊन तोफेच्या तोंडासमोर उभ्या राहिल्या.

श्री जयंतीकडे पहात होती आणि जयंतीही श्रीकडे पाहून गालांतल्या गालांत हंसत होती. तोफेच्या तोंडाशीं ती विजयश्रीच्या दर्पानें, हंसतमुखानें, निर्भयपणें उभी राहिलेली पाहून गोलंदाजही क्षणभर थिजला.

त्या दोघीही गोलंदाजाकडे पहात होत्या. पहात असतांना हंसत होत्या. जणूं काय आपण ही तोफ जिंकून घेतली आहे अशा आवेशानें त्या उभ्या राहिल्या होत्या.

बिचारा गोलंदाज हताश झाला. तोफ डागण्याचा पलिता त्यानें हातांतून फेंकून दिला आणि तोफ सोडून तो एका बाजूला जाऊन उभा राहिला.

इतक्यांत सीतारामनें घोड्यावरून खालीं उडी घेतली. तलवार उपसून त्या गोलंदाजाचा शिरच्छेद करण्यासाठीं तो पुढें धांवला.

जयंती एकदम ओरडली, "थांबा थांबा ! हें काय करतां महाराज ? रक्षण करा त्याचं."

"शत्रूचं रक्षण कसलं करायचं ?" असें म्हणून सीतारामनें उपसलेल्या तलवारीच्या एका फटक्यासरशी गोलंदाजाचें शिर धडापासून दूर केलें आणि ती तोफ त्यानें आपल्या ताब्यांत घेतली.

तोफ हातीं येतांच सीतारामला अवसान आलें. तोफ डागण्यांत तो किती निष्णात होता याचा पुरावा पूर्वी एकदां मिळालाच होता. त्यानें तोफ एकदम फिरवून घेतली आणि सूचीव्यूहासाठीं तो रस्ता मोकळा करून घेऊं लागला.

सीतारामच्या हातीं तोफ येतांच त्यानें प्रलयकालाला सुरवात केली. वादळी मेघासारखा प्रचंड गडगडाट करीत तोफ सारखी झडत होती. तोफेंतून सुटणाऱ्या प्रत्येक गोळ्याबरोबर मुसलमानांचें सैन्य छिन्नविछिन्न होऊन आघाडी सोडून चोहींकडे पळूं लागलें होतें.

सूचीव्यूहाचा रस्ता आतां मोकळा झाला होता.

आतां सीताराम आपली राणी, पुत्र, कन्या आणि शिल्लक राहिलेले शिपाई घेऊन अनायासें मुसलमान नसलेल्या स्थानापर्यंत जाऊन पोहोंचला.

मुसलमानांनीं किल्ला लुटायला सुरवात केली. आतां तो किल्ला त्यांच्या ताब्यांत गेला होता.

अशा प्रकारें सीतारामच्या राज्याचा विध्वंस झाला.

२४

संध्याकाळ उलटल्यावर श्री जयंतीला भेटली. ती त्या दोघींची स्वतंत्र भेट एका बाजूला झाली होती. श्रीनें विचारलें, "जयंती, तो गोलंदाज कोण ?"

जयंती म्हणाली, "महाराजांनीं ज्याला छाटलं तोच का?"

"हो—तोच!" श्री म्हणाली, "त्याला मारूं नका असं तूं कां म्हणालीस?

जयंती म्हणाली, "त्याची उठाठेव संन्यासिनीला कशाला?"

"म्हटलं, थोडं डोळ्यांतलं पाणी सांडलं तर पहावं!" श्री म्हणाली, "त्यानं संन्यासधर्म कांहीं भ्रष्ट होत नाहीं!"

"डोळ्यांतलं पाणी सांडायचं कां म्हणून?" जयंतीनें विचारलें.

श्री म्हणाली, "तो जिवंत होता त्यावेळीं मी त्याला ओळखलं नाहीं, पण तूं त्याला 'मारूं नकोस' असं म्हणालीस म्हणून मीं तो मेल्यानंतर त्याचा चेहरा एकदां नीट न्याहाळून पाहिला. माझ्या मनांत एक शंका आलीय—ती व्यक्ति कुणीही असो, त्याच्या मृत्यूला कारण झालें ती मीं! मीं जाऊन तोफेच्या तोंडीं उभी राहिलें नसतें तर त्यानं अवश्य तोफ डागली असती अन् मग महाराजांसकट सारेच नाश पावले असते! तसं झालं असतं तर मग त्या गोलंदाजाला मारणार होतं कोण?"

जयंती म्हणाली, "तो मरून गेला—महाराज वांचले—तुम्हां आम्हांला जसं हवं होतं तसंच हें झालं—मग आतां त्याची उठाठेव हवी कशाला?"

श्री म्हणाली, "तरी पण मनांत एक संशय आला आहे त्याचं निराकरण व्हावं असं वाटतंय."

जयंती म्हणाली, "संन्यासिनीला एवढी उत्कंठा कां?"

"संन्यासी असो कीं कुणीही असो, माणूस हा केव्हांही माणसासारखाच राह्यचा." श्री म्हणाली, "मीं तुला देवी म्हणून ओळखतें, पण त्या दिवशीं लोकसमुदायापुढं उभं राह्यचा जेव्हां प्रसंग आला त्यावेळीं लोकलज्जा तुला जाणवलीच ना? मग माझ्या संन्यासधर्माला बाध येईल असं मला कां म्हणतेस?"

जयंती म्हणाली, "तर मग चल, एकदां मनांतल्या संशयाचं निराकरण करून घेऊं. मीं त्या जागेवर एक खूण ठेवून आलेंय. रात्रींसुद्धां मला ती जागा सहज सांपडेल. मात्र जातांना दिवा घेऊन गेलं पाहिजे."

गवताच्या पेंडीची मशाल करून त्या दोघीही लढाईच्या मैदानाकडे निघाल्या. खूणेची जागा शोधून काढून त्या तिथें जाऊन पोहोंचल्या.

मशालीच्या उजेडांत त्या प्रत्येक मुडद्याचा चेहरा न्याहाळीत निघाल्या होत्या. शेवटीं त्यांना गोलंदाजाचा मृत देह सांपडला.

श्रीनें त्याला पाहून घेतलें, पण तिचा संशय दूर झाला नाहीं. जयंती हंसली आणि तिनें त्या मुडद्याचें पांढरेशुभ्र केंस धरून ओढले—

ते केंस तिच्या हातीं आले. दाढीमिशीचे केंसही तसेच निघाले. ते खोटे केंस होते.

आतां श्रीचा संशय दूर झाला.—तो गंगाराम होता.

श्रीच्या डोळ्यांतून आसवांच्या धारा लागल्या. जयंती म्हणाली, "हें काय ग, असा मनावर परिणाम करून घ्यायचा, शोकानं असं चुरडून जायचं, तर संन्यासधर्म कशाला पत्करलास ?"

डोळे पुसून श्री म्हणाली, "महाराजांनी मला उगीच दोष दिला. मीं त्यांची प्राणहंत्री झालें नाहीं—मीं प्राणघातिनी झालें ती प्रत्यक्ष माझ्या भावाची ! विधात्याचं भविष्य इतक्या दिवसांनीं खरं झालं !"

"विधाता कुणाच्या द्वारें कुणाला शिक्षा करतो तें सांगतां येत नाहीं." जयंती म्हणाली, "तुझ्यामुळंच गंगारामचा जीव दोन वेळ बचावला गेला. आणि शेवटीं तुझ्यामुळंच त्याचा नाश झाला. कसं का असेना, गंगारामनं एकदां पाप केलं होतं, त्याच पापीबुद्धीनं तो पुन्हां पाप करण्यासाठीं आला होता. रमा मरण पावली हें बहुधा त्याला कळलं नसावं, म्हणूनच वेषांतर करून तिची प्राप्ती करून घेण्यासाठीं मुसलमानांच्या फौजेंत गोलंदाज बनून तो आला होता. रमेनें त्याला ओळखलं असतं तर ती त्याच्या बरोबर जायला तयार झाली

नसती याची त्याला जाणीव होती. मला वाटतं, डोलींत रमा आहे असा समज करून घेऊन तो तोफ घेऊन मार्ग रोखायला आला होता. झालं तें होऊन गेलं. आतां त्याच्यासाठीं रडूं नकोस. आतां त्याचा योग्य तो अग्निसंस्कार करूंया चल. ”

त्या दोघींनीं गंगारामचा मृत देह उचलून स्मशानांत नेला आणि त्याला यथारीती अग्नि दिला.

त्यानंतर जयंती आणि श्री यांची आणि सीतारामची भेट केव्हांच झाली नाहीं.

त्या रात्रीं त्या दोघीही काळोखांतून कुठं गेल्या आणि कशा नाहींशा झाल्या तें कुणालाच कळलें नाहीं.

●●●

ग्रंथ संग्रहालय
अनुक्रम 29626
वि.भाषा वा.वा.
क्रमांक 7996
नों. दि. 3-7-67

म. ग्रं. सं. ठाणे. वाचनालय शाखा.
वा. क्र. 96995 नों दि
वि. वा.वा.

IRBK-0105645
IRBK-0105645

परिशिष्ट

आपले जुने दोस्त रामचांद आणि श्यामचांद यापूर्वीच पळून नलडांग्याला जाऊन राहिले होते. एके दिवशीं ते आपल्या ओटीवर बसून गप्पागोष्टी करीत होते.

रामचांद म्हणाला, " काय रे भैय्या, महमदपूरची कांहीं खबर कळलीय का तुला ! "

श्यामचांद म्हणाला, " ती तर कळलीच आहे म्हणायची. किल्लाबिल्ला सारा मुसलमानांनीं काबीज केला. सारं गांव लुटून नेलं. "

रामचांदनें विचारलें, " राजाराणीचं काय झालं तें कळलंय का तुला ? "

श्यामचांद म्हणाला, " कुणी कुणी म्हणतात, कीं त्यांना पकडून बांधून मुर्शिदाबादला नेण्यांत आलं होतं. त्यांना म्हणे तिकडे सुळीं दिलं वाटतं ! "

" मीं सुद्धां तसेंच ऐकलं होतं. " रामचांद म्हणाला, " पण कुणी कुणी म्हणतात, कीं बाटींतच त्यांनीं विष खाऊन जीव दिला. त्यांचे मुडदे नेऊन बेट्यांनीं सुळीं दिले असं कुणी सांगितलं मला. "

" कोण काय सांगतात, कोण काय सांगतात ! " श्यामचांद म्हणाला, " विश्वास कुणावर ठेवायचा ? कुणी कुणी म्हणतात कीं राजाराणी यापैकीं कुणीच पकडले गेले नाहींत. त्या देवता येऊन त्यांना कुठं तरी घेऊन गेल्या. त्यानंतर त्या बेट्या नोडग्यांनीं कुणीतरी बनावट राजा-राणी उभीं करून मुर्शिदाबादला नेऊन सुळीं दिलीं ! "

" तुझं आपलं कांहींतरीच गाणं ! " रामचांद म्हणाला, " ही सारी हिंदूंनीं रचलेली दंतकथा—नुसती कल्पित गोष्ट ! "

" कल्पित गोष्ट ही, कीं कल्पित गोष्ट ती, हें ठरवायचं कुणी ? " श्यामचांद म्हणाला, " ही जशी हिंदूंनी रचलेली, तशीच ती मुसलमानांनी रचलेली नसेल कशावरून ? जाऊं दे ! आम्हीं खुष्कीचे व्यापारी, जहाजाची खबर आम्हांला कशाला ? आम्हीं आपला जीव बचावून अजून जिवंत राहिलों आहों हेंच भाग्य म्हणायचं ! चल, एकदां गुडगुडी भर पाहूं ! "

रामचांद आणि श्यामचांद गुडगुडी भरीत आहेत तोंवर आपण हा ग्रंथ पूर्ण करूं.

समाप्त

नवभारत प्रकाशन संस्था
मुंबई ४